कृषीवल

रायगड, रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹

## मुंबई-पुणे मार्गावर वाहतूक कोंडी

**खोपोली :** विकेंण्ड साजरा करण्यासाठी मुंबईकर मोठ्या संख्येने बाहेर पडले आहेत. त्यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर शनिवारी (दि.१३) मोठी वाहतूक कोंडी झाली होती. बोरघाट परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्यामुळे प्रवाशांना तासनतास अडकून पडावे लागले. सलग सुट्ट्यांमुळे मुंबईकर मौजमजा करण्यासाठी बाहेर पडले. त्यामुळे शनिवारी सकाळपासूनच मुंबई-पुणे महामार्गावर वाहनांची संख्या वाढली होती. घाट परिसरात पुणे मार्गिकेवर वाहतुक अतिशय धिम्यागतीने सुरू होती. वाहनांच्या सात ते आठ किलोमीटरच्या रांगा लागल्याचे दिसून येत होते. घाट परिसरात वाहने बंद पडण्याच्या घटनाही घडत होत्या. पान २ वर

## नागपुरात तरुणांचे आंदोलन चिघळले

**नागपूर :** राज्य विधीमंडळाचे सध्या हिवाळी अधिवेशन सुरु आहे. हिवाळी अधिवेशन आता अंतिम टप्प्यात आले आहे. परंतु, आपल्या आंदोलनाची दखल घेतली जात नाही म्हणून प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. त्यांनी शनिवारी विधान भवनाच्या दिशेला थेट मोर्चाच काढला. हा मोर्चा पोलिसांनी अडवला. त्यानंतर पोलीस आणि आंदोलक यांच्यात तणाव निर्माण झाल्याचे चित्र बघायला मिळाले. नागपुरात मुख्यमंत्री युवाकार्य आणि प्रशिक्षणार्थी तरुणांचे ९ डिसेंबरपासून आंदोलन सुरु आहे. परंतु, आपल्या या आंदोलनाची प्रशासन आणि सरकारकडून दखल घेतली जात नसल्याने आंदोलक प्रचंड आक्रमक झाले. आंदोलकांनी अखेर विधान पान २ वर

# सुखाच्या उंबरठ्यावर नियतीचा घाला

## नवरदेवासह परदेशातून आलेल्या वडिलांचाही मृत्यू

**| रोहा | प्रतिनिधी |**

लग्नाच्या आनंदी तयारीत असलेल्या नवरदेवावर अचानक नियतीचा घाला घातला. सुखाच्या उंबरठ्यावर असतानाच काळाने घातलेला हा आघात कुटुंबियांसह परिसरात शोककळा पसरवणारा ठरला. आनंदाच्या क्षणांवर दुःखाची सावली पडत लग्नघरात एकच शांतता पसरली. परदेशात नोकरी करणाऱ्या वडिलांना मुंबई विमानतळावरून घरी परत नेत असताना नवर देवासहित वडिलांवर


नियतीने घाला घातला. मुंबई-गोवा

महामार्गावर एका कंटेनर चालकाने पुई गावाजवळ येताच अचानक ब्रेक दाबल्याने मागून भरधाव येणाऱ्या कारचालकाचे गाडीवर नियंत्रण सुटल्याने समोरील कंटेनरला जोदार धडक दिल्याने अपघात घडला. ही हृदयद्रावक घटना शनिवारी (दि.१३) सकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली. माणगांव तालुक्यातील गोरेगाव येथील सज्जाद अब्दुल शुकूर सरखोत (५५) व ओवेस सज्जाद सरखोत (२५) असे मृतांचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका खासगी गॅस एजन्सी कंपनीत काम करणाऱ्या ओवेस सरखोत याचे येत्या २९ डिसेंबरला लग्न होणार होते. लग्नाच्या अनुषंगाने ओवेस याचे वडील दोहा-कतार येथील एअरपोर्टवर नोकरी करित असल्याने त्यांनी सुट्टी टाकून ते शनिवारी मायदेशात परतले. तर, मुंबई विमानतळावर त्यांना आणण्याकरिता त्यांचा मुलगा ओवेस आणि सरजिल हे दोघे गेले होते. घरी परतत असताना मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड जवळील पुई येथे आल्यावर समोर धावत असणाऱ्या कंटेनर चालकाने गाडीला अचानक ब्रेक लावला. त्यामुळे मागुन भरधाव वेगाने धावत असलेल्या सरखोत यांच्या चारचाकीने कंटेनरला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की चारचाकी गाडीचा चेंदामेंदा झाला असून अपघातात नवरदेव ओवेस सरखोत व सज्जाद सरखोत या बाप-लेकाचा दुर्देवी मृत्यू झाला. तर, दुसरा मुलगा सरजिल व कारचालक हे किरकोळ जखमी झाले आहेत.

दरम्यान, गाडीत अडकलेल्या मृतदेहांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकांना पाचरण करण्यात आले. या घटनेची माहिती समजताच कोलाड पोलिसांनी घटना स्थळी धाव घेतली. शवविच्छेदनसाठी दोन्ही मृत्यूदेह रोहा उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. या घटनेची माहिती समजताच स्थानिक नागरिकांनी शासकीय उप जिल्हा रुग्णालयात धाव घेत मदतीचा हातभार लावला.

### वेधक

## लाडक्या बहिणींना दिलासा

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चालवली जाते. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडक्या बहिणींना ई-केवायसी दुरुस्तीची एकच संधी मिळणार असल्याचे जाहीर केले आहे. ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३१ डिसेंबर २०२५ ची मुदत देण्यात आली आहे. ज्या लाडक्या बहिणींनकडून ई-केवायसी करताना चुकीची माहिती नोंदवली गेली असल्यास ती दुरुस्त करण्याची संधी मिळणार आहे. मंत्री आदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत ई- केवायसी पान २ वर

## पोसरीतील तरुणाचा जागीच मृत्यू

**खोपोली :** खालापुर तालुक्यातील घोडीवली नावंढे रस्त्यावर शुक्रवारी (दि.१२) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास अपघाताची घटना घडली. या अपघातात दुचाकीने झाडाला जोरदार धडक दिल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. तरुणाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याचे बोलले जात आहे. घोडीवली नावंढे रस्त्यावरून एक तरूण पोसरी येथे जात असताना त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि तो रस्त्याशेजारी असणाऱ्या झाडाला जोरदार धडकला. या धडकेत त्याचा जागीच मृत्यू झाला. अनिरुद्ध खानविलकर असे या मृत तरूणाचे नाव आहे. तरुणाचा या अपघातात जागीच मृत्यू झाल्याने अनेकांनी हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बालमृत्यूच्या मुद्यावरुन सरकारवर टिका

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी बालमृत्यूच्या मुद्यावरुन राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. कुपोषणामुळेच बालमृत्यू होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. कोट्यवधी रुपये खर्च होऊनही यातून नेमके कुणाचे पोषण होते, असा सवाल करत त्यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला आहे. राज्यात गेल्या तीन वर्षांत तब्बल १४.५ हजार बालमृत्यू हे केवळ कुपोषणामुळे झाले आहेत. महाराष्ट्रासाठी ही अत्यंत लज्जास्पद बाब आहे. कुपोषण निर्मुलनावर राज्य सरकारचा दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च होऊनही यातून नेमके कुणाचे पोषण होते, असा गंभीर प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

### पनवेल पाालिकेतील भ्रष्टाचाराविरोधात

# शेकाप आक्रमक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेमध्ये सत्ताधारी भाजप आणि प्रशासन अधिकारी यांच्या एकमताने पनवेल महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे, जे रस्ते जानेवारी-फेब्रुवारीमध्ये बनवले गेले ते रस्ते पहिल्याच पावसात वाहून गेले आहेत. आता त्याच रस्त्यावर संपूर्ण डांबरीकरण न करता फक्त खड्डे बुजवण्याचे काम केले जात आहे. तसेच ठेकेदार शासनाचा निधी वापरत असतानाही स्वखर्चाने काम करीत असल्याचे भासवत आहे, असे मत शेकाप नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांनी व्यक्त केले आहे. पनवेल येथील काँग्रेस भवनात शुक्रवारी (दि.१२) महाविकास आघाडीच्यावतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.




- शेकाप नेते माजी आ. बाळाराम पाटील यांनी केली प्रशासनाची पोलखोल

यावेळी पनवेल शहरातील विविध महत्त्वपूर्ण नागरी प्रश्न, महापालिकेची धोरणे आणि नागरिकांवर वाढत असलेला ताण याबाबत पत्रकार परिषदेत आघाडीतील नेत्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील यांच्यासह पनवेल काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शेकापचे ज्येष्ठ नेते नारायण घरत, शेकाप विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, माजी नगरसेवक हरेश केणी, मनसे प्रवक्ते तथा पनवेल महानगराध्यक्ष योगेश चिले, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, माजी नगरसेविका लीना गरड यांच्यासह महाविकास आघाडीतील घटकपक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भव्य मोर्चाचे आयोजन

भ्रष्टाचाराविरोधात महाविकास आघाडी तर्फे मंगळवारी (दि.१६) पनवेलमध्ये भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा पनवले पालिकेवर धडकणार आहे.

यावेळी आपल्या प्रास्ताविकात काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांनी पनवेल महानगरपालिकेचा वाढीव मालमत्ता कर, शहरातील रस्ते, पाणीटंचाई, तळोजा एमआयडीसी परिसरातील गंभीर प्रदूषण यांसह अनेक तातडीच्या समस्यांकडे लक्ष वेधले. तसेच, महापालिका क्षेत्रात उभारण्यात आलेल्या अवास्तव आणि बस थांब्यांबाबतही मविआने तीव्र नाराजी व्यक्त केली. या सर्व प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी मंगळवारी (दि.१६) पनवेलमध्ये भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा देखील यावेळी करण्यात आली. हा मोर्चा सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला वळसा घालून पनवेल महानगरपालिकेवर येणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच, या मोर्चात महाविकास आघाडीतील राज्यपातळीवरील प्रमुख नेतेही सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## टाटा प्रकल्पाच्या खोदकामामुळे घरांना तडे

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील भिवपुरी येथे टाटा कंपनीकडून जलविद्युत प्रकल्प साकारत आहे. या ठिकाणी असलेल्या टाटा कंपनीच्या मालकीच्या २०० एकर जमिनीवर मोठा खड्डा खोदून त्यात पाणी अडकले जाणार आहे. दरम्यान, या ठिकाणी खोदकाम करताना मोठ्या प्रमाणात सुरुंग स्फोट केले जात आहेत. त्यामुळे तापकीर वाडी आणि धनगरवाडा येथील घरांना तडे जात असून स्थानिक रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.




तसेच, या दोन्ही गावांचे पुनर्वसन करण्यात यावे, या मागणीसाठी ग्रामस्थांकडून १८ डिसेंबरपासून उपोषण केले जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे यांच्या नेतृत्वाखाली हे उपोषण ग्रामस्थ करणार आहेत.

टाटा कंपनीकडून भिवपुरी येथे जलविद्युत प्रकल्प उभारला जात असून या प्रकल्पासाठी कंपनीच्या मालकीच्या जमिनीवर खोदकाम करून पाणी साठवले जाणार आहे. त्या खोदकामासाठी स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात सुरुंग लावून स्फोट केले जात आहेत. परिणामी संबंधित डोंगराच्या बाजूला आलेल्या तापकीर वाडी आणि धनगरवाडा ग्रामस्थांच्या घराला तडे जाऊ लागले आहेत. तसेच, संपूर्ण परिसरातील बोअरवेलचे पाणी देखील गेले आहे. त्यामुळे पिण्याच्या पान २ वर

## मुरूडमधील कुटुंबियांवर सामाजिक बहिष्कार

### रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यातील वळके येथे गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक बहिष्कार केल्याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची तक्रार मधुकर भगत (६६) यांनी गुरूवारी (दि.११) रोजी रेवदंडा पोलीस ठाण्यात दिली आहे.

मधुकर भगत यांनी रेवदंडा पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, सन २०१६ पासून ते ८ सप्टेंबर २०२५ पर्यंत त्यांच्या कुटुंबाला बेकायदेशीरपणे वाळीत टाकण्याचे प्रकार सुरू होते. संबंधितांनी गावातील महिलांन संबंधित अन्यायकारक निर्णय, गाव पंचांचे दंड, वर्गणी, फंड आणि बेकायदेशीर वसुली यास विरोध केल्याने त्यांना वाळीत टाकण्यासह सामाजिक बहिष्कार आणि दहा वर्षांची दंडाची मागणी केली, असा आरोप मधुकर भगत यांनी केला आहे. पान २ वर

## तळा तालुक्यात बिबट्याचे दर्शन

**तळा :** तालुक्यातील सोनसडे बौद्धवाडी गावाशेजारी प्रशांत माळी यांना पहाटेच्या सुमारास रस्ता ओलांडताना बिबट्या नजरेस पडला. त्यांनी तात्काळ आरडा-ओरडा केला असता बिबट्या पुढे निसटला. त्यांनी ही माहिती ग्रामस्थांना व त्यानंतर इंदापूर वनविभागात दिली. सध्या सर्वत्र बिबट्याने दहशत माजवली असून तळा तालुक्यात देखील बिबट्याचे दर्शन झाल्याने तालुक्यात सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात वन खात्याकडून खबरादी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## करंजा बंदरात शेकडो बोटी रुतल्या

**| उरण | प्रतिनिधी |**

राज्य शासनाकडे करंजा मच्छीमार बंदराचा गाळ काढण्याचा व इतर तत्सम कामांचा १८३ कोटी खर्चाचा प्रस्ताव वर्षभरापासून धुळ खात पडून आहे. त्यामुळे या बंदरातील गाळाच्या समस्येमुळे मच्छीमार पुरते हवालदिल झाले असुन करंजा बंदरात ३०० मच्छीमार बोटी पुन्हा गाळात रुतून बसल्या आहेत. त्यामुळे मच्छीमारांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. रायगड जिल्ह्यातील हजारो मच्छीमारांसाठी २५६ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले करंजा मच्छीमार बंदर मागील वर्षभरापासून गाळाने भरण्यास सुरुवात झाली आहे.



बंदरात मासळी उतरविण्यासाठी आलेल्या मच्छीमारांना ओहोटीच्या वेळी बंदरात अडकून राहावे लागते. त्यांना मासळी उतरवून पुन्हा बाहेर जाण्यासाठी चार-पाच तासांची वाट पाहावी लागते. त्यामुळे सुमारे ३०० बोटी बंदरात अडकून पडतात. या गाळाच्या समस्येमुळे मासळी व्यावसायिक संकटात सापडले आहेत.

## शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांची गुंडगिरी

### पोलिसांकडून कठोर कारवाई करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

मुरूड तालुक्यामध्ये शिंदे गटातील काही कार्यकर्त्यांनी गुंडगिरी करीत भर पोलीस ठाण्याच्या आवारात शेकाप कार्यकर्ते नरेश दिवेकर यांना मारहाण केली. मात्र मारेकऱ्यांविरोधात कठोर कारवाई न करता, अदखलपात्र गुन्हा दाखल करून त्यांना सोडून देण्यात आल्याचा आरोप होत आहे. या प्रकारामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला असून या प्रकाराबाबत पोलीस अधीक्षक काय भूमिका घेणार, याकडे लक्ष लागून राहिले आहे. यशवंत पाटील यांच्यासह अविनाश शिंदे यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेकापकडून करण्यात आली आहे.



- मुरूड पोलीस ठाण्याच्या आवारातच हाणामारी
- पोलीस अधीक्षकांच्या भूमीकेकडे लक्ष

मिळालेल्या माहितीनुसार, शिंदे गटातील आ. दळवी यांचा एक आक्षेपार्ह व्हीडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला. तो व्हीडीओ तक्रारदार नरेश दिवेकर यांनी मुरूड जंजिरा सिटीझन फोरम या सोशल मिडीयाच्या ग्रुपवर बुधवारी सायंकाळी पाठविला होता. मुरूडमधील शिंदे गटातील काही कार्यकर्त्यांनी दिवेकर यांना टारगेट करीत पान २ वर

## शालेय सहलीसाठी दोन हजार गाड्या

### महसुलात १०.८५ कोटींची भर

**| रायगड | प्रतिनिधी |**

शालेय सहलींसाठी नोव्हेंबरमध्ये तब्बल २,२४३ बस राज्याच्या विविध आगारांतून देण्यात आल्या. त्यातून महामंडळाला १० कोटी ८५ लाखांचा महसूल प्राप्त झाला आहे. एसटी महामंडळाने यंदा शालेय सहलींना नवीन बस उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा सकारात्मक परिणाम शालेय सहलींवर झाला आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांच्या शालेय सहलीला एसटी महामंडळ बस उपलब्ध करून देते. शासनाने एसटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शालेय सहलीला ५० टक्के सवलत दिली आहे. यंदा परिवहनमंत्री प्रताप पान २ वर

> डिसेंबर आणि जानेवारीतदेखील विविध शाळा आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सहलीसाठी नव्या बस उपलब्ध करून देण्याचे एसटी महामंडळाचे नियोजन आहे. स्वस्त, सुरक्षित आणि आनंददायी सहलीसाठी सर्व शाळांनी एसटीच्या बसेस आरक्षित कराव्यात.
> – प्रताप सरनाईक, परिवहनमंत्री.



### सिडकोच्या घरांच्या किमती १० टक्क्यांनी कमी | १७ हजार घरांच्या किमती घटणार

# नवी मुंबईत घर घेण्याचे स्वप्न होणार पूर्ण

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबईत घर घेणाऱ्यांसाठी एक मोठी बातमी आहे. सिडकोंच्या घरांसाठी असलेल्या किमती आता १० टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सिडकोच्या आणि या घटकांसाठी असलेल्या घरांच्या किमती त्यामुळे कमी होणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे १७ हजार घरांच्या किमती कमी होणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केली.

सिडकोसाठी आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या आणि एलआयजी घरांसाठी असलेल्या किमती करण्यासंदर्भात अनेक मागण्या होत्या. त्यावर अनेक बैठका झाल्या. विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील आणि शशिकांत शिंदे यांनीही तशी मागणी होती. त्यावर सिडकोच्या घरांच्या किमती या १० टक्क्यांनी कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सिडकोच्या लॉटरीमधील जवळपास १७ हजार घरांच्या किमती यामुळे कमी होणार आहेत.



सर्वांसाठी घरे हे पंतप्रधान नरेंद्र मोदींचे स्वप्न असून त्याला बळ मिळणार आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना परवडणाऱ्या दरात घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

सिडकोच्या घरांच्या किमती या अव्वाच्या सव्वा होत्या. त्यामुळे सर्वसामान्यांना त्या परवडणाऱ्या नव्हत्या. परिणामी सिडकोच्या लॉटरीला हवा तितका प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे सिडकोच्या घरांच्या किमती कमी कराव्यात, अशी मागणी सातत्याने केली जात होती. राज्य सरकारने आता त्यासंदर्भात निर्णय घेतला आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबई झोपडपट्टी पान २ वर

### महाग किमतीमुळे अल्प प्रतिसाद

शहर व औद्योगिक विकास महामंडळ अर्थात सिडकोनं नवी मुंबईतील २६५०० घरांच्या विक्रीसाठी 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' ही योजना आणली होती. या योजनेसाठी बुकिंग शुल्क भरणाऱ्यांची संख्या देखील २६००० हा आकडा पार करु शकला नव्हता. म्हणजेच सिडकोनं जितक्या घरांच्या विक्रीसाठी मागवले तितके देखील अर्ज आले नव्हते. प्रत्यक्ष बुकिंग शुल्क भरणाऱ्या अर्जदारांची संख्या २१३९९ इतकी होती. १९ फेब्रुवारी २०२५ ला मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये सोडतीचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये १९५१८ अर्जदारांना घरं लागली. सिडकोनं उरलेल्या १८८१ अर्जदारांना देखील घरं देण्याचा निर्णय घेतला. मात्र, त्यातील काही जणांनी घरं नाकारण्याची भूमिका घेतल्याचं समोर आलं होतं.

## 'देवेंद्र फडणवीस मोठे ब्लॅकमेलर'

**पंढरपूर :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सर्वात मोठे ब्लॅकमेलर आहेत, अशी टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. गेल्या सहा दिवसांपासून पंढरपूर तालुक्यातील वाखरी येथे ऊस दरासाठी सुरु असलेले आमरण उपोषण राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांच्या उपस्थितीत सुटले. त्यानंतर बोलताना राजू शेट्टींनी सरकारवर टीका केली. मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १५ रुपये द्या, नाहीतर काटामारी बाहेर काढू असे म्हणणारे मुख्यमंत्री हेच सर्वात मोठे ब्लॅकमेलर आहेत, असे राजू शेट्टी म्हणाले आहेत.



# साप्ताहिक राशिभविष्य दि. १४ ते २० डिसेंबर २०२५

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ–अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

## आर्थिक लाभ होईल

**मेष :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात तुम्ही कुटुंबातील बऱ्याच जबाबदाऱ्यांना पूर्ण कराल. ज्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल. तसेच तुमचा समाजातही मान सन्मान वाढेल आणि तुम्ही एक प्रसिद्ध व्यक्ती म्हटले जाल. शिक्षणाच्या क्षेत्रात मिश्रित परिणामांची प्राप्ती होईल. तुम्ही जितकी मेहनत कराल, तितकाच तुम्हाला आर्थिक लाभ होईल. करिअरमध्ये विदेशी स्त्रोतांनी चांगला लाभ मिळेल आणि तुमच्या कामासाठी तुमचे कौतुक होईल. तुम्हाला आपल्या मनासारख्या स्थानावर स्थानांतरण मिळू शकते. या आठवड्यात आपल्याला चांगल्या गोष्टी होण्याचे संकेत देत आहे. जुने काही आजार असतील तर त्यातून तुम्हाला मुक्ती मिळेल. प्रेम जीवनासाठी कालावधी अनुकूल राहील आणि तुमच्यातील काही लोकांना विवाहाची वार्ता ऐकण्याची संधी मिळेल. तुम्ही तुमच्या प्रियतमला आपले बनवण्यास यशस्वी राहाल. **महिलांना–** विवाहित लोकांच्या दाम्पत्य जीवनात चढ उताराची स्थिती राहू शकते. तुम्हाला काळजी घ्यावी लागेल की, तुम्ही तुमच्या कामाव्यतिरिक्त जीवनसाथीला पर्याप्त वेळ द्या. **शुभ दिनांक** –१४,१५.

## आव्हानांना सामोरे जावे लागेल

**वृषभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विविध प्रकारच्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे व त्यातून मार्ग काढा. आठवड्याच्या पूर्वार्धात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे, पण त्यानंतर मात्र कामे मनासारखी होऊ लागतील. कौटुंबिक वातावरण चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. घरातील व्यक्तींकडे जास्त लक्ष द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. आर्थिक बाजू ठीक राहील. नोकरदारांना दिलासा मिळेल. अनावश्यक खर्च टाळा. प्रकृतीस्वास्थ्य जपा. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपल्या कामाला चालना मिळेल. आपल्या खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरेल. प्रवासात सावध राहा. स्थावर–जंगम बाबतीतील प्रश्नांना चालना मिळेल. बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल व उद्योगधंद्याला चालना मिळेल. **महिलांना–** धार्मिक कार्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त होईल. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. प्रत्येक बाबतीत जुळवून घेण्याचा प्रयत्न करा. विविध प्रकारच्या, विशेषतः कार्यालयीन व कौटुंबिक प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. उद्योग–व्यवसायात प्रगती करण्याची संधी प्राप्त होईल. **शुभ दिनांक** –१६,१७.

## प्रलोभनांपासून दूर रहा

**मिथुन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिविकासाचे ध्येय बाळगावे. सरकारी नियमांचे पालन करा. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विरोधकांना संधी देऊ नका. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची शक्यता राहील. जोडीदाराची उत्तम साथ मिळेल. आपणास कार्यालयातील व कौटुंबिक गोष्टींबाबतचे महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागणार आहे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना उत्तम प्रतिसाद मिळेल. हितशत्रूंच्या कारवायांवर कडक नजर ठेवा, त्यांना संधी मिळणार नाही, याची दक्षता घ्या. जमीन–जुमल्याच्या कामांना गती मिळेल. कोर्टकचेरीच्या कामांना चालना मिळेल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. नोकरदारांना दिलासा मिळेल व सरकारी नियमांचे कटाक्षाने पालन करा. **महिलांना–** सर्व कामांचे नियोजन केल्यास आपण सर्व बाबतीत यशस्वी होण्याची शक्यता राहील. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवावे. प्रलोभनांपासून दूर राहा. अचानक प्रवासाचे योग संभवतातमुलांकडून सुवार्ता समजू शकतात. **शुभ दिनांक** – १८,१९.

## वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा

**कर्क :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात बऱ्यापैकी अनुकूलता लाभल्याने पुष्कळशा बाबतीत आपण सफलता मिळवू शकाल व आनंद घ्याल. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. उद्योग–व्यवसायात प्रगती करता येईल. प्रकृतीस्वास्थ्य जपा, विशेषतः खाण्याची पथ्ये व उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. प्रवासात सावधानता बाळगा. जागेसंबंधीचे प्रश्न सोडविता येतील. घरगुती वातावरण चांगले ठेवा. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. पाहता आपण सर्व बाबतीत जिद्द व आत्मविश्वासाने वागल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते–जुळते घेण्याचे धोरण स्वीकारावे. स्थावरसंबंधीच्या प्रश्नांची उकल करता येईल. राजकीय क्षेत्रातील मंडळींना हा काळ छान राहील. थोरामोठ्यांच्या गाठीभेटीचे योग संभवतात. आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. आर्थिक बाजू ठीक राहील. **महिलांना–** सामाजिक क्षेत्रात आपली वाहवा संभवते. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपल्या परिश्रमाचे चीज झाल्याचे समाधान मिळेल. सर्वसाधारण स्वरूपाचा राहण्याची शक्यता राहील. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. हितशत्रूंना संधी देऊ नका. **शुभ दिनांक** – १४,२०.

## निर्णय विचारपूर्वक घ्या

**सिंह :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात व्यवसाय क्षेत्रात प्रगती साधता येईल. अनावश्यक खर्च मात्र टाळा. महत्त्वाच्या योजना अथवा गोष्टी यांची गुप्तता बाळगावी. भावी काळासाठी गुंतवणूक करण्याचा प्रयत्न करा. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावे. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल आपण घेत असलेल्या परिश्रमांना चांगला प्रतिसाद मिळून चीज झाल्याचे समाधान मिळेल. संगणक, तांत्रिक क्षेत्र व्यवसायातील व्यक्तींना चांगला काळ राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. आपल्या कामाची, प्रगतीची नोंद ठेवणे हितकारक राहील. अडचणींतून मार्ग काढण्याचे तंत्र स्वीकारा व ध्येयाचा पाठपुरावा करा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. कामाचा ताण आपल्या प्रकृतीवर होणार नाही याची दक्षता घ्या. आपण आपल्या कामाला योग्य प्रकारे न्याय देण्याचे धोरण स्वीकारल्यास हा आठवडा सर्व दृष्टीने चांगला जाईल. सत्याचा मार्ग स्वीकारून आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. **महिलांना–** कोणताही निर्णय विचारपूर्वक घ्या, चुकीचा निर्णय घेण्याचे टाळा. आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होतील. **शुभ दिनांक** –१६,१९.

## कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या

**कन्या :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. उद्योग–व्यवसायात नवे काही करण्यापेक्षा आहे तेच सांभाळणे महत्त्वाचे राहील. आर्थिक बाजू ठीक असली तरी अनावश्यक खर्च टाळावा. मित्रमंडळी व आप्तेष्टांशी सामंजस्याने वागावे. प्रलोभनांपासून दूर राहावे. सरकारी नियम व कायदा यांचे पालन करावे. प्रकृतीकडे अधिक लक्ष द्यावे. हाती घेतलेली कामे पार पाडता येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. विशेषतः पूर्वार्धात विविध प्रकारचे प्रश्न आपल्यापुढे उभे ठाकतील, पण त्यांची आत्मविश्वासाने उकल केल्यास उत्तम राहील. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवा. संतानसाठी हे दिवस अधिक अनुकूल नाही म्हणून वेळोवेळी त्यांची काळजी घ्या आणि त्यांना प्रोत्साहित करा. **महिलांना–** कौटुंबिक जीवन बऱ्याच अंशी चांगले राहील आणि तुम्हाला मान सन्मानाची प्राप्ती होईल. भाऊ बहिणीची काळजी घेणे उत्तम राहील. शिक्षणाच्या क्षेत्रात तुम्हाला कठीण परिश्रम करावे लागेल, तेव्हाच तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. **शुभ दिनांक** – १५,१६.

## नोकरदारांना दिलासा मिळेल

**तुळ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात आर्थिक दृष्टीकोनाने हा आठवडा थोडा कमजोर राहू शकतो. म्हणून पैशाचा हिशोब चांगल्या पद्धतीने ठेवा म्हणजे तुम्हाला कुठल्याही प्रकारच्या आर्थिक समस्यांचा सामना करावा लागणार नाही. बेरोजगार लोकांना एक स्थायी नोकरी मिळण्याची शक्यता आहे. आपण योजलेली कामे मनाप्रमाणे पार पाडता येतील. मात्र आपल्या रागावर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सरकारी कामकाजात सफलता मिळू शकेल. आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा प्रयत्न करा. आर्थिक बाजू सावरता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. व्यापारात मात्र सावधानता बाळगावी. आपली मानसिकता स्थिर ठेवल्यास उत्तम. घरगुती वातावरण चांगले राहील. महत्त्वाच्या कागदपत्रांवर वाचूनच स्वाक्षऱ्या करा. अध्ययनातील अडथळे दूर करता येतील. **महिलांना–** आपण घेत असलेल्या परिश्रमांचे योग्य चीज झाल्याचे समाधान मिळू शकेल. आर्थिक बाबतीत मात्र खर्चावर योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक ठरू शकते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी चातुर्य व बळाचा वापर करून यशाची वाटचाल करू शकाल. **शुभ दिनांक** – १७,१८.

## प्रवासाचे योग संभवतात

**वृश्चिक :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात बौद्धिक क्षेत्राला वाव मिळेल. स्थावर–जंगमविषयक कामांना गती मिळेल. प्रवासात सावधानता बाळगा. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. प्रकृतीमान ठीक राहील, पण खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आपणास बऱ्यापैकी अनुकूलता मिळू शकते व आपले ध्येय साध्य करू शकाल. महत्त्वाच्या कामात आपणास सफलता मिळू शकेल. आर्थिक बाजू सावरता येईल. काही जुने येणे वसूल होण्याची शक्यता आहे. विवाहइच्छुकांच्या अपेक्षा पुऱ्या होण्याची शक्यता राहील. आपल्या भावनांवर योग्य नियंत्रण ठेवा. विरोधकांची धास्ती बाळगू नका. सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहाल. सरकारी नियमांचे पालन करा. कामाचे योग्य नियोजन केल्यास आपणास सर्व गोष्टी साध्य करता येतील. कलाक्षेत्राला चांगला प्रतिसाद मिळेल. महिलांच्या कलागुणांना उत्तम प्रोत्साहन मिळेल. प्रवासाचे योग संभवतात. कामाचा उत्साह वृद्धिंगत होईल. आपली बलस्थाने कोणती आहेत याचा आढावा घ्या व भविष्याच्या योजना आखा. **महिलांना–** स्थावर–जंगमबाबतचे प्रश्न सोडविता येतील. लहान–सहान गोष्टींवरून वादविवादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घेतल्यास हा आठवडा चांगला जाईल. **शुभ दिनांक** – १९,२०.

## विवाहच्छुकांचे लग्न जुळेल

**धनु :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात वादाचे प्रसंग सामंजस्याने व शांततेने सोडविण्याचा प्रयत्न करा. मुलांकडे अधिक लक्ष द्या. नको त्या प्रलोभनात अडकू नका. जोडीदाराशी सहकार्याने वागा. नातेसंबंध जपा. अनावश्यक खर्च टाळा. आपण आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. बेकारांना नोकरीची संधी प्राप्त होईल. येणाऱ्या लहान–सहान अडचणींतून मार्ग काढा व ध्येयाकडे जाण्याचा मार्ग स्वीकारा. विशेषतः उष्णतेच्या विकारांपासून सावध राहा. शेतीविषयक कामांना गती मिळेल. वैवाहिक जोडीदाराची साथ मिळेल. हा आठवडा कौटुंबिक व कार्याच्या कर्तव्यांचा पाठपुरावा करणारा असणार आहे. आतापर्यंत केलेल्या कार्याचा आढावा घेऊन आपण कुठे कमी पडलो, याचा विचार करून वागणे सर्व दृष्टीने योग्य राहणार आहे. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाही याची दक्षता घ्या. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. **महिलांना–** आर्थिक बाबतीत सावधानता बाळगावी. जोडीदाराशी सामंजस्याने वागणे हितकारक राहील. आपण बऱ्याच गोष्टी साध्य करू शकाल व आपली घोडदौड चालू राहील. **शुभ दिनांक** – १५,१७.

## सरकारी नियमांचे पालन करा

**मकर :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. आपल्या कर्तृत्वाला चांगला वाव मिळेल. जीवनात योग्य व्यवस्थापनांची जरूरी असते, त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करा. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. महिलांना त्यांच्या कलागुणांना चांगला वाव मिळेल. हितशत्रूंची काळजी करू नका. खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. गुंतवणूक करताना तज्ञांचा सल्ला घ्या. अनावश्यक खर्च टाळा. कुटुंबाकडे अधिक लक्ष द्या. आपल्या कामकाजाचा व्याप वाढल्याने व कौटुंबिक गोष्टींकडेही लक्ष द्यावे लागणार असल्याने आपण व्यस्त राहाल. क्रीडा व तांत्रिक क्षेत्रातील व्यक्तींना हा काळ उत्तम राहील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या व त्यांच्या अपेक्षांना न्याय द्या. प्रलोभनांपासून दूर राहा. व्यापार–उद्योगाला चालना मिळेल. आपल्याकडील अतिरिक्त पैसा नीट सांभाळून ठेवा. सरकारी नियमांचे पालन करा. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवा. **महिलांना–** आपण परिस्थितीनुसार विचार बदलल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. गैरसमज होणार नाही याची दक्षता घ्या. कोणत्याही कारणांनी भावनेच्या आहारी जाऊ नका. **शुभ दिनांक** –१६,१८.

## धार्मिक कार्यात सहभाग

**कुंभ :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात विरोधकांना संधी मिळणार नाही याची दक्षता घ्या. प्रवासाचे योग संभवतात. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. घरगुती वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. आपण सर्व बाबतीत सामंजस्याने वागल्यास बऱ्याच अपेक्षा पूर्ण होतील व समाधान मिळेल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचे धोरण स्वीकारावे. प्रलोभने टाळा. आर्थिक व्यवहारात सावधानता बाळगा. आप्तेष्ट व मित्रमंडळींशी सामंजस्याने वागणे हितकारक ठरेल. सरकारी नियमांचे पालन करा. विरोधकांना संधी देऊ नका. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, आर्थिक बाजू ठीक राहील. आपण सर्व बाबतीत नियोजनाची साथ घेतल्यास अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील. उद्योग–व्यवसायात प्रगती करता येईल. काही मंडळींना प्रसिद्धीचे वलय प्राप्त होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य देऊन त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करा. **महिलांना–** बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. कोणाशीही नाराजी पत्करू नका. प्रकृतीस्वास्थ्य जपा. आर्थिक बाजू ठीक राहील. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कामांचा विस्तार करता येईल. **शुभ दिनांक** –१८,२०.

## विचारपूर्वक निर्णय घ्या

**मीन :** एकूण ग्रहमान पाहता या सप्ताहात कामाचे नियोजन केल्यास कामाचा भार कमी होऊ शकेल. खरेदीचे बेत साध्य होतील. शाब्दिक चकमकी मात्र कटाक्षाने टाळा. आर्थिक गुंतवणूक मात्र तज्ञांच्या सल्ल्याशिवाय करू नका. प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक सावध राहा, विशेषतः उष्णतेचे विकार व अपचन विकार. आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक ठेवा. जोडीदाराची अपेक्षित साथ मिळू शकेल. कोणालाही शब्द अथवा आश्वासने देण्याचे टाळल्यास हा आठवडा बऱ्यापैकी चांगला जाईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा. काम काजात घाईगडबड टाळा. विचारपूर्वक निर्णय घ्या. महिलांना अंगभूत कलागुणांना चांगले प्रोत्साहन मिळेल. आपला प्रभाव इतरांवर पाडू शकाल. प्रकृतीमान ठीक असले तरी मोसमी आजारांपासून सावध राहा. **महिलांना–** जोडीदाराची अपेक्षित साथ मिळेल. आपणास दैनंदिन कामकाजात येणारे प्रश्न वादविवाद न करता चर्चेने सोडविणे अधिक हितकारक ठरेल. नको त्या प्रलोभनात अडकू नका. आपल्या प्रकृतीस्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये, उष्णतेचे विकार याबाबत सावध राहा. **शुभ दिनांक** – १४,१७.

पान १ वरून

## टाटा प्रकल्पाच्या खोदकामामुळे घरांना तडे

पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्याचबरोबर या खोदकामामुळे नाल्याला दुषित पाणी येत असल्याने अनेक साथीचे आजार पसरण्याचा धोका वाढला आहे. यासह प्रकल्प परिसरातील झाडे तोडल्यामुळे येथील माकडे गावाच्या दिशेने मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळे घरांचे मोठे नुकसान करतात. त्याची पाहणी करून नागरिकांना नुकसान भरपाई देण्यात यावी. ग्रामपंचायत हद्दीतील व परिसरातील स्थानिक भूमिपुत्रांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार हक्काचा रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. प्रकल्पामुळे स्थानिक शेतकरी यांच्या शेतजमिनीचे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्यात यावी, आदी मागण्यांसाठी ग्रामस्थांच्या पाठीशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उभा राहिला आहे. मात्र, कंपनी प्रशासनाकडून काहीही प्रतिसाद मिळत नसल्याने शेवटी ग्रामस्थांनी उपोषण करण्याचा मार्ग अवलंबण्याचा निर्णय घेतला आहे.

## मुरूडमधील कुटुंबियांवर सामाजिक बहिष्कार

तसेच, त्यांच्या कुटुंबाचे मानसिक खच्चीकरण करण्याच्या उद्देशाने, प्रत्येकी ५ हजार रुपये दंड आणि १ हजार रुपये व्याज अशी रक्कम वसूल करण्याचा दबाव आणला असल्याचे देखील भगत यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

## शालेय सहलीसाठी दोन हजार गाड्या

सरनाईक यांनी शालेय सहलीसाठी नवीन बस उपलब्ध करून देण्याच्या सूचना स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या होत्या. नव्या कोऱ्या एसटीतून राज्यभरातील हजारो विद्यार्थी गड–किल्ले, नयनरम्य समुद्रकिनारे, धार्मिक स्थळे यांच्या सहलीला जाऊ लागली. नोव्हेंबरमध्ये तब्बल २,२४३ एसटी बसमधून सुमारे १ लाख विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सहलीचा आनंद घेतला. एसटीच्या ३१ विभागांपैकी कोल्हापूरने ३७५ एसटी बस शालेय सहलीसाठी उपलब्ध करून देऊन सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवून १ कोटी ७७ लाख रुपयांचा महसूल मिळवला आहे. त्यानंतर सांगली (२११ बस) व रत्नागिरी (२०१ बस) यांनी चांगली कामगिरी केली.

## नवी मुंबईत घर घेण्याचे स्वप्न होणार पूर्ण

मुक्त करण्यासाठी सरकारन मोठे पाऊल उचलले आहे. ५० एकरापेक्षा जास्तीच्या भूखंडावर पुर्नविकास योजना राबवण्यात येणार आहे. या ठिकाणी अत्यावश्यक सुविधा आपण देणार आहोत. मुंबईतील १७ ठिकाणी ही योजना आपण राबवण्यात येणार आहे. त्यामध्ये घाटकोपरमधील रमाबाई नगरचाही विकास केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नागपुरात तरुणांचे आंदोलन चिघळले

भवनावर मोर्चा काढला. यावेळी पोलिसांनी त्यांना अडवल्याने परिसरात मोठा तणाव निर्माण झाला. पोलिसांकडून आता आंदोलकांची धरपकड सुरु आहे.आंदोलक पोलिसांचे सुरक्षाकवच तोडून बाहेर जाण्याचा प्रयत्न करत आहेत. या प्रशिक्षणार्थी यांनी ११ महिने प्रशिक्षण घेतले. त्यानंतर सरकारने शब्द पाडला नाही, असा आरोप विद्यार्थ्यांकडून केला जात आहे. आंदोलकांकडून आधी शांततेत आंदोलन सुरु होते. परंतु, आपल्या आंदोलनाची दखल घेतली जात नाही म्हणून त्यांनी लोटांगण मोर्चा विधान भवनाच्या दिशेला काढला. मात्र, हा मोर्चा पोलिसांनी अडवला. आम्ही प्रशिक्षणार्थी आहोत. आमची मागणी आहे, आमचा जीआर निघालाच पाहिजे, असे आंदोलक तरुण म्हणाले. ११ महिने प्रशिक्षण घेऊन आम्हाला योग्य नोकरी मिळाली नाही. त्यामुळे आमचे ११ महिने वाया गेले, अशी तक्रार आंदोलक तरुणांची आहे. सरकार या तरुणांना प्रशिक्षणाचे पैसे देणार होते. परंतु, त्यांना पैसे मिळाला नसल्याचा आरोप या तरुणांनी केला आहे. दरम्यान, आंदोलक इतके आक्रमक झाले की, पोलीस आणि आंदोलक यांच्यात झटापटी होताना दिसली. तर, पोलिसांनी आंदोलकांची धरपकड सुरु केली. राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या आंदोलनावर प्रतिक्रिया दिली. याबाबत विस्तृत माहिती घेतली जाईल. त्यांच्या नेमक्या काय मागण्या आहेत, तसेच त्यांच्या मागण्या कुठे अटकल्या आहेत, याची सविस्तर माहिती घेतली जाईल. त्यांच्यासोबत बैठक घेऊन त्यांची समस्या सोडवण्यात येतील. तरुणांची अडचण सोडवली जाईल, अशी प्रतिक्रिया भोयर यांनी दिली.

## लाडक्या बहिणींना दिलासा

दुरुस्तीची केवळ एक संधी दिल्या संदर्भातील माहिती दिली आहे. त्या पोस्टमध्ये त्यांनी, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील बहुतांश लाभार्थी या दुर्गम, ग्रामीण भागातील आहेत. ई–केवायसी प्रक्रिया करत असताना त्यांच्याकडून काही चूक होणे स्वाभाविक आहे. या चुका दुरुस्त करण्याची संधी मिळावी, अशा आशयाची अनेक निवेदने विभागास प्राप्त झाल्याचे म्हटले आहे.

## शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांची गुंडगिरी

त्यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी हा प्रश्न सामंजस्याने सोडविण्याचा प्रयत्न केला. परंतु, शिंदे गटातील काही कार्यकर्त्यांनी पोलीस निरीक्षक कांबळे यांच्या समोरच दिवेकर यांच्यावर अरेरावीची भाषा करीत तुझा न्याय आम्ही आमच्या पद्धतीने करतो, अशी धमकी दिली. कायदा हातात घेऊन मुरूड नगरपरिषदेच्या एका कंटेनर खोलीमध्ये नेऊन त्यांना जबरदस्तीने माफी मागण्यास भाग पाडले. त्यानंतर तो व्हीडीओ काढून सोशल मिडीयावर व्हायरल केला. दरम्यान, दिवेकर यांना पोलीस ठाण्याच्या आवारातच हाताबुक्क्याने मारहाण करण्यात आली. तसेच, ठार मारण्याची धमकी दिली. हा प्रकार मुरूडमधील पोलिसांसमोर घडला. तरीदेखील मारेकऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात आली नसल्याचा आरोप शेकापकडून केला जात आहे. नरेश दिवेकर यांना मारहाण करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या यशवंत पाटील व अविनाश शिंदे यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. गुंड प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांवर तात्काळ कारवाई करावी, आचारसंहिता भंग केल्याचे गुन्हे दाखल करावे, अशी मागणी मुरुड पोलीस व जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने केली आहे. संबंधित कायदा सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांना कायद्यानेच आता योग्य धडा शिकवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## मुंबई-पुणे मार्गावर वाहतूक कोंडी

त्यामुळे वाहतुक कोंडीची समस्या अधिक बिकट होत होती. वाहतुक पोलिसांकडून महामार्गावरील वाहतुक सुरळीत व्हावी यासाठी कसोशिने प्रयत्न सुरू होते. मात्र, वाहनांची संख्या प्रचंड असल्याने वाहतुक नियमन करणे अवघड झाले होते. मुंबई मार्गावर छोटे ब्लॉक घेऊन पुणे मार्गावरील वाहतूक मंबई मार्गावर वळवून पुढे पाठवली जात होती.

# वाहतूक पोलिसांचा दणका

### नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना वाहतूक पोलिसांनी दणका दिला आहे. तीन दिवसांत ६६६ चालकांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून ९ लाख १० हजार ७५० रुपयांचा दंड वसूल केला आहे. रायगड जिल्हा वाहतूक शाखेची स्वतंत्र यंत्रणा आहे. पोलीस निरीक्षक अभिजीत भूजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षकांपासून सुमारे ९० पेक्षा अधिक पोलीस कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत. जिल्ह्यात औद्योगिकीरण झपाट्याने वाढत असल्याने नागरिकीकरणदेखील वाढू लागले आहे. गावांसह शहरांचा विस्तार प्रचंड वाढल्याने वाहनांची संख्याही वाढली आहे. दुचाकी वाहनांसह वेगवेगळ्या प्रकारची उल्लंघन करीत वाहने चालवित आहेत. त्यामध्ये अपघात होऊन काहींना मृत्यूला सामोरे जावे लागते. तर, काहींना जखमी होऊन कायमचे अपंगत्व येते. अपघात रोखण्याबरोबर बेशिस्त वाहन चालकांना शिस्त लावण्यासाठी वाहतूक पोलिसांनी जिल्ह्यात कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. वाहन वेगाने चालविणे, वाहन चालविण्याचा परवाना नसणे, टीबल शीट असणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी अथवा मालाची वाहतूक करणे, अशा अनेक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६६६ वाहन चालकांविरोधात वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईचा बेशिस्त वाहन चालकांना दणका देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. बुधवारी (दि.१०) २९६ चालकांवर कारवाई करून त्यांच्याकडून ३ लाख ६ हजार ५५० रुपयांचा दंड वसूल केला. गुरुवारी (दि.११) ३२२ चालकांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून ३ लाख ४१ हजार २०० रुपयांचा दंड वसूल केला. तसेच, शुक्रवारी (दि.१२) २४८ चालकांविरोधात कारवाई करून २ लाख ६३ हजार रुपयांचा दंड वसूल केल्याची माहिती पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# ‘शेती जगविण्यासाठी मातीचे संवर्धन अपरिहार्य’

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मातीला जिवंत परिसंस्था मानून तिचा ऱ्हास टाळणे, आरोग्य शाश्वत ठेवणे, सुपीकता, उत्पादकता टिकवून ठेवणे आवश्यक असल्याने माती व्यवस्थापनाच्या पद्धती अवलंबविणे गरजेचे आहे. त्यामुळे शेती जगविण्यासाठी मातीचे संवर्धन अपरिहार्य आहे, असे प्रतिपादन प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जतचे सहयोगी संशोधन संचालक डॉ.भरत वाघमोडे यांनी येथे केले. संशोधन केंद्राच्या प्रशिक्षण सभागृहात थायलंडचे राजे दिवंगत भूमीबोल अदुल्यदेज यांची जयंती जागतिक मृदा दिन म्हणून साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

भरत वाघमोडे म्हणाले की, मृदा ही आपली जननी आहे. मृदाच्या महतीची जाणीव प्रत्येकाला असायला हवी. मातीची निर्मिती होण्यास शेकडो वर्षे लागतात म्हणून तिची काळजी घेणे काळाची गरज आहे.शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकू नये. शेती किफायतशीर होण्याचे मार्ग उपलब्ध असून आता व्यावसायिक शेतीकडे वळण्याची गरज आहे, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांनी मागणी केल्यास रब्बीसाठी बियाणे उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच, संशोधन केंद्राला गतिमान भात पैदास प्रकल्प मंजूर झाल्याने नव्या तंत्रज्ञानाने शेतकऱ्यांच्या गरजेनुरूप भात बियाणे चार ते पाच वर्षात उपलब्ध करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रगतशील शेतकरी चंद्रकांत मांडे यांनी वातावरणातील बदल व शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा उहापोह करीत शासकीय धोरणांची अंमलबजावणी तळमळीने करण्याची गरज प्रतिपादित केली. यावेळी कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर, वनस्पती शरीरक्रियाशास्त्रज्ञ डॉ. मीनाक्षी केळुस्कर, कनिष्ठ संशोधन सहायक महेशकुमार, प्रगतशील शेतकरी निलिकेश दळवी व हेमंत कोंडीलकर यांनी मनोगत व्यक्त केले.

दिनांक : १४ डिसेंबर २०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे आशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धामोते, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आर.चौ.मी. | रुपये | पैसे |
| कांचन सुधीर मोरे | ११२ | ९ | २०६.२५ | २० | ६० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १४/१२/२०२५

दिनांक : १४ डिसेंबर २०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे आशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे सुगवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.- पॉ. | रुपये | पैसे |
| अशोक वाळकू पांडव | ७९ | ६/अ | ०-३६-०० | ० | १८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १४/१२/२०२५

# फळपीक विमा हप्ता भरमसाठ

## • विमा कंपनी मालामाल, शेतकऱ्यांचे हाल

| रायगड | प्रमोद जाधव |

जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे, म्हणून शासनाने आंबिया बहार फळपिक विमा योजना सुरू केली आहे. प्रति हेक्टरी १४ हजार ४५० रुपये विमा हप्ता जिल्ह्यासाठी आहे. मात्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात हा हप्ता सात हजार रुपये इतका असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांवर शासनाने मोठे अन्याय केल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. जिल्ह्यात बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमीनी गुंठावारी असून बोटावर मोजण्याइतक्या शेतकऱ्यांची जमीनी एकरीत आहेत. शासनाच्या या जाचक नियमावलीमुळे शेतकऱ्यांचे हाल आणि विमा कंपन्या मालामाल अशी परिस्थिती दिसून येत आहे

जिल्ह्यामध्ये अलिबाग, रोहा, मुरुड, श्रीवर्धन, माणगांव, म्हसळा या तालुक्यात मोठ्या प्रमाणात आंब्याची लागवड केली जाते. जिल्ह्यामध्ये १७ हजार हेक्टर इतके आंब्याचे क्षेत्र असून, १३ हजार ५०० हेक्टर उत्पादनक्षम क्षेत्र आहे. जिल्ह्यात ५६ हजाराहून अधिक आंबा उत्पादक शेतकरी आहेत. गेल्या अनेक वर्षापासून आंबा उत्पादक शेतकऱ्यांना अवकाळी



पावसाचा बसत आहे. शेतकऱ्यांना फळपीक विम्यातून आर्थिक बळ मिळावे यासाठी सरकारने पुर्नरचित हवामान अधारित फळपिक विमा योजना सुरू केली आहे. अंबिया बहार ही योजना सुरू केली. मुंबई येथील युनिव्हर्सल सम्पो जनरल इन्शुरन्स, कंपनीची यासाठी नेमणूक करण्यात आली आहे. या अंतर्गत नैसर्गिक आपत्ती व हवामान प्रतिकूल परिस्थितीमुळे फळ पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रति हेक्टरी १४ हजार ४५० रुपये विम्याचा हप्ता ठरविण्यात आला आहे.

> कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी सात हजार विमा हप्ता आहे. तर रायगडसाठी १४ हजार विमा हप्ता ठेवण्यात आला आहे. हा रायगडच्या शेतकऱ्यांवर झालेला अन्याय आहे. या बाबत जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठक घेतली आहे. आगामी काळात पाचही जिल्हासाठी आंबा फळपिक विमा हप्ता एकच ठेवण्याचा प्रयत्न राहणार आहे. त्याचा पाठपुरावा सुरू केला आहे.
>
> चंद्रकांत मोकल – अध्यक्ष महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ

उत्पादनक्षम फळबागांसाठी विमा संरक्षण लागू राहणार आहे. यासाठी आंबा पिकाचे उत्पादन क्षम वय पाच वर्षे असणे आवश्यक आहे. फळ पिकासाठीचे कमीत कमी दहा गुंठे असणे आवश्यक आहे. एक डिसेंबर ते ३१ मे या कालावधीत अवकाळी पाऊस व कमी- जास्त तापमान, वेगाचा वारा आदीचा फटका बसल्यास एक लाख ७० हजार रुपये तसेच गारपिटचा

### देखभाल दुरुस्तीचा खर्च ही निघाला नाही

गेल्या दोन वर्षांपूर्वी अवकाळी पावसामुळे सुमारे सात हजार ८५०आंबा उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसला होता. त्यामध्ये सुमारे चार हजार हेक्टरहून अधिक क्षेत्राचे नुकसान झाले होते. रायगड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपैकी सात हजार ४५६ शेतकऱ्यांनी फळ पीक विम्यासाठी नोंदणी केली होती. दिवाळीत विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले होते. परंतु ही रक्कम तुटपुंजी असल्याने शेतकरी नाराज झाले होते. अवकाळी पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे दोन लाखापासून तीन लाखापर्यंतचे नुकसान झाले. मात्र, त्यांना फक्त ७० हजारपासून ७५ हजार रुपयांपर्यंत विम्यामार्फत भरपाई मिळाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी घोर निराशा व्यक्त केली होती. देखभाल दुरुस्तीचा खर्चदेखील यातून निघाला नसल्याचे काही शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले.

### अशी करावी लागते मेहनत

झाडाच्या बाजूला असलेले गवत काढणे, सुकलेल्या फांद्या काढणे, झाडाच्या बाजूला खड्डा करून त्यावर पालापाचोळा टाकून सेंद्रीय खत तयार करणे, फवारणी करणे, आंबे काढणे, पेटीत ठेवणे, त्याची वाहतूक करणे अशा अनेक प्रकारची कामे शेतकऱ्यांना करावी लागतात. त्यामुळे साधारणः एक लाख रुपयांचा खर्च करावा लागत असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

फटका बसल्यास ५७ हजार रुपयांची विमा संरक्षित रक्कम दिली जाणार आहे. जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे, यासाठी राबविण्यात आलेली योजना चांगली असली, तरी या योजनेसाठी असणारा विमा हप्ता भरमसाठ असल्याची माहिती समोर येत आहे. हा विमा हप्ता कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी वारंवार शासनाकडे पाठपुरावा केला आहे. याकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी केली जात आहे.

# पर्यटन स्थळे गजबजली

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात पर्यटना हंगाम सुरु झाला आहे. जिल्ह्यातील अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन समुद्र किनारे, तसेच पाली, महड येथील अष्टविनायक क्षेत्रांसह ऐतिहासिक स्थळांवर पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. शनिवारी जिल्ह्यातील पर्यटन स्थळे गजबजून गेली होती. त्यामुळे वडखळ–अलिबाग प्रमुख मार्गावर वाहनांची वर्दळ प्रचंड वाढली आहे. अलिबाग तालुक्यातील अलिबाग, वरसोली, किहीम, मांडवा, मुरुड, काशिद, श्रीवर्धनमधील समुद्र किनारे येथे पर्यटकांची गर्दी होऊ लागली आहे. यामुळे किनाऱ्यांवर साहसी खेळांसह विविध प्रकारच्या व्यवसायांना पुन्हा तेजी मिळाली आहे. जिल्ह्यातील महड आणि पाली या अष्टविनायकाच्या क्षेत्रासह इतर धार्मिक स्थळांवर पर्यटक भेटी देऊ लागले आहे. याशिवाय किल्ले रायगड, मुरुडमधील जंजिरा किल्ल्यासह इतर ऐतिहासिक वास्तु पाहण्यासाठी पर्यटक आलेले पहायला मिळत आहे.

# निवडक



## जनजागृतीसाठी मोटरसायकल रॅली

**पनवेल :** पनवेल तालुका पोलिसांनी जनजागृती करण्याच्या उद्देशाने हद्दीमध्ये मोटर सायकल रॅलीचे आयोजन केले होते. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनखाली पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील केळवणे जेटी ते केळवणे गाव, बस स्टॉप, शाळा येथे मोटर सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते .सदर मोटर सायकल रॅलीमध्ये कोस्टल सेक्युरिटी हेल्पलाइन नंबर १०९३ चे बॅनर व पोस्टर ने जनजागृती करण्यात आलेले आहे. तसेच उपस्थित सागर रक्षक व नागरिक यांना सागरी सुरक्षेच्या अनुषंगाने योग्य त्या सूचना देण्यात आल्या. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कासारभट, केळवणे येथे पोलिसांच्या पथकाने भेटी देऊन सुरक्षेच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

## ग्रुपमधून काढल्यामुळे पती-पत्नीस मारहाण

**पनवेल :** सोसायटीच्या व्हॉट्सॲप ग्रुपमधून काढून टाकल्याचा राग मनात धरून मारहाण केल्याप्रकरणी युवराज उत्तम घागरे, अमृत रवींद्र बेलदार, ओमकार मोकल (तिघेही रा. बागेश्री सोसायटी, खारघर) यांच्या विरोधात तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विश्वास धनावडे हे बागेश्री सोसायटी, सेक्टर ४०, खारघर येथे राहत असून, त्यांच्या सोसायटीतील आशिष याने अमृत बेलदार व ओमकार मोकल यांना सोसायटीच्या व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲड केले. ते सोसायटीचे सभासद नसल्याने त्यांना धनावडे यांनी ग्रुपमधून काढून टाकले. त्यानंतर त्यांना ओमकार याने फोन करून बिल्डिंगच्या खाली बोलाविले. यावेळी तुम्ही ग्रुपमध्ये गैरसमज पसरवत आहेत व माझ्या नावाची बदनामी करत आहात म्हणून तुम्हाला ग्रुपमधून काढून टाकल्याचे धनावडे यांनी सांगितले. यावेळी अमृतने धनावडे यांना हाताबुक्क्यांनी डोक्यात मारहाण केली तर ओमकार व युवराज यांनी काठीने मारहाण केली. त्यांची पत्नी सोडवण्यासाठी आली असता तिचेदेखील केस ओढून आणि तिला किरकोळ दुखापत केली. यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

## भावावर चाकूचा वार करत हत्येचा प्रयत्न

**नवीन पनवेल :** मुलांच्या भांडणाचा राग मनात धरून सख्ख्या भावाने सख्ख्या भावावर चाकूने वार करत त्याच्या हत्येचा प्रयत्न केला. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात ६ डिसेंबर रोजी उसामा दस्तगीर सुबेदार (नॅशनल हॉटेलसमोर, तळोजा) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. हुजेफा दस्तगीर सुबेदार हा पत्नी आणि मुलांसह तळोजा येथे राहतो. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास त्याचा मुलगा उस्मान आणि भाऊ उसामा यांचा मुलगा हुसेन यांच्यात खेळत असताना वाद झाला. यावेळी मुलांमध्ये झालेला भांडणाचा वाद मिटवून घेतला. ६ डिसेंबर रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास हुजेफा हा मुंबई येथे जात असताना त्याचा भाऊ उसामा याने माझ्या पत्नीला शिवीगाळ का केली, तुला मारून टाकेल असे बोलून लोखंडी सूऱ्याने हुजेफा याच्या पाठीवर डाव्या हाताच्या काखेत आणि डोक्याच्या पाठीमागे वार करून त्याला गंभीर जखमी केले. त्यानंतर उसामा तेथून पळून गेला. जखमीवर खारघर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



## उत्सव हॉटेलला लागली भीषण आग

**पनवेल :** नवीन पनवेल सेक्टर १७ मधील पायल सोसायटी परिसरात असलेल्या उत्सव हॉटेलला अचानक भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच संजीवनी मित्र मंडळाचे परेश घरत, अक्षय अहिरे तसेच पंचशील नगर येथील जागरूक नागरिक तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्यात सहभागी झाले. घटनेनंतर नागरिकांनी त्वरेने अग्निशामक दलाशी संपर्क साधून मदतकार्य सुरू केले. हॉटेलमधील कर्मचारी तसेच पायल सोसायटीतील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवून मोठ्या अनर्थापासून बचाव करण्यात आला. अग्निशामक दलाला आगी-वर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थानिक नागरिक व समाजसेवकांनी विशेष सहकार्य केले. तातडीने दाखवलेल्या सतर्कतेमुळे मोठी हानी टळली. घटनेनंतर परेश घरत व अक्षय अहिरे यांनी प्रभागातील सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची मागणी केली. त्यांनी म्हटले की प्रभागातील रेसिडेन्शियल ठिकाणी चालणारी कमर्शियल दुकाने व गोडाऊन तातडीने बंद करण्यात यावीत. कमर्शियल क्षेत्रात पूर्वीपासून चालू असलेल्या हॉटेल किंवा आस्थापनांकडे वैध फायर सेफ्टी परवानग्या आहेत का याची तपासणी तात्काळ करावी. अग्निशमन टाळण्यासाठी आस्थापनांनी कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत याचा अहवाल मागवावा. दोन दिवसांत दोन ठिकाणी आग लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापुढे अशा घटना घडू नयेत यासाठी पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांनी अधिक सतर्कता बाळगून, होण्याआधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

## सौदीचे रियाल देतो सांगून फसवणूक

**नवीन पनवेल :** सौदी बँकेच्या ५० रियाल चलनाच्या २०० नोटा देतो असे सांगून चार लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी शब्बीर, अनोळखी महिला आणि सद्दाम यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात सात डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. इम्तियाज अन्सारी हे सेक्टर १७, उलवे, शब्बीर रा. कळंबोली याने अन्सारी यांच्या नातेवाईकांना सौदीचे रियाल असल्याचे सांगून ते भारतीय चलनात परिवर्तन केल्यास एक रियल चलनामागे भारतीय चलनाचा पाच रुपये फायदा होईल असे ५० रियाल नोटांच्या एकूण २०० नोटांचे पन्नास हजार रुपयांचा फायदा होईल असे सांगितले. त्यानंतर शब्बीर एका महिलेच्या घरी जाऊन पिशवी घेऊन आला आणि ती नोटा दाखवल्या. अन्सारीने चार लाख रुपये शब्बीर याच्यासोबतच्या महिलेला दिले आणि त्यांनी रियाल चलन असलेली पिशवी दिली. त्यानंतर ते तिथून निघून गेले. यांनी पिशवी उघडून पाहिली असता त्यात न्युजपेपर रोल करून ठेवलेले आणि रियाल चलनाच्या नोटा ५० रियालच्या तीन नोटा मिळून आल्या. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



• वंडारू कंबला हा कर्नाटक राज्यातील उडुपी जिल्ह्यातील ब्रह्मवर जवळील वंडारू गावातील एक प्रसिद्ध आणि ऐतिहासिक म्हशींची शर्यत. (छायाचित्र: सुधीर नाझरे)

## टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

| पनवेल | प्रतिनिधी |

पाण्याच्या टँकरने स्कूटीला धडक दिल्याने २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. या अपघात प्रकरणी तळोजा पोलिस ठाण्यात टँकर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. अमीर शेख (रा. तळोजा) हा स्कूटी (क्रमांक एमएच ४६ सीझेड ०९२८) घेऊन घरी परत येत होता. पेंधर फाटा रेल्वे पटरीच्या पुढे तळोजा फेज २ कडे जाणाऱ्या मार्गावर समोरून आलेल्या पाणी टँकर (क्रमांक एमएच ४६ बीएम २९७३) ने स्कूटीला जोरदार धडक दिली. या धडकेत अमीर जखमी झाला. त्याला एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे नेले. तेथे उपचार सुरु असताना त्याचा मृत्यू झाला.

## धावपट्टीजवळ गेल्याने मजुरावर गुन्हा

| पनवेल | प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातील इतर प्रकल्पात काम करणाऱ्या एका २५ वर्षीय मजुराने विमानतळ परिसराच्या पूर्व बाजूच्या कुंपणावरून आत उडी मारून विमानतळाच्या धावपट्टी व नियंत्रण कक्षाजवळील परिसरात वावर केला. यामुळे त्याच्यावर थेट पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल केला.

विना परवानगी प्रवेश करून चोरीच्या उद्देशाने विमानतळात प्रवेश केल्याचा ठपका त्या मजुरावर ठेवण्यात आला आहे. सीआयएसएफच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदविली. या मजुराला कामावरून काढून टाकले असून तो धावपट्टी व नियंत्रण कक्षाजवळील प्रवेश नसलेल्या ठिकाणी का गेला याची चौकशी सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांजुर्णे व पथक करत आहेत.

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळावे या मागणीसाठी २२ डिसेंबरला आंदोलन केले जाणार आहे. दिबा यांचे नाव विमानतळाला देत नाहीत तोपर्यंत विमान उडू देणार नाही, असा इशारा देण्यात येत असल्याने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची सुरक्षेसाठी नेमलेले सीआयएसएफ आणि स्थानिक पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे.

आंदोलकांचा जथा विमानतळाच्या बाहेरील एक किलोमीटर अंतरापर्यंत पोहोचू नये असे नियोजन पोलीस विभागाकडून केले जात आहे.

# ग्रामीण भागातील शेकोटी संस्कृती हद्दपार

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

आला थंडीचा महिना झटपट शेकोटी पेटवा... हे गाणे गुणगुणायला थंडी सुरु झाली आहे. या काळात आजी आजोबांसह बच्चेकंपनीला शेकोटीची अन् मायेची ऊब अनुभवायची मजा काही वेगळीच. मात्र, काळाच्या ओघात ग्रामीण भागातून शेकोटी संस्कृती हद्दपार झालेली दिसत आहे. मुलांनी शेकोटी पेटवणे, हा उपद्व्याप ठरत असून जखमी होण्याचे छोटे-मोठे अपघात घडत आहेत. यामुळे शेकोटी हि संस्कृती कालभाय होत आहे. पूर्वी थंडीचा बचाव करण्यासाठी मुबलक प्रमाणात उबदार कपडे मिळत नसल्याने शिवाय जंगलात लाकूड मोठ्या प्रमाणात मिळत असे. परंतु काळाच्या ओघात जंगले नामशेष होत चालली आहे. अंगावर परिधान करण्यासाठी गरम कपडे आल्याने या शेकोटीकडे तरुण वर्ग पाठ फिरवित आहे.

थंडी पडू लागली की, ग्रामीण भागात थंडीच्या दिवसांत ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसायच्या आजीआजोबा आणि वडीलधार्यांसोबत शेकोटीभोवती बसून लहान मुले शेकोटीची अन् मायेची ऊब अनुभवत असत. या वेळी गप्पागोष्टी, गाणी, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने संक्रमित व्हायची. काही वर्षांपासून ग्रामीण भागात आधुनिकतेचा शिरकाव झाला आहे. त्यामुळे शेकोटी संस्कृती हद्दपार झाली आहे.

# शेकाप कार्याध्यक्ष गौरव पोरवालाकडून कामोठे सेक्टर २१ परिसराची स्वच्छ

| पनवेल | प्रतिनिधी |

कामोठे वसाहतीमधील सेक्टर २१ येथील सत्यम हाइट्स आणि महाकाली निवास सोसायटीच्या परिसरात अनेक वर्षांपासून रिकामे पडलेल्या एमएसबी प्लॉटमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा, झुडपे आणि रानगवत वाढल्यामुळे सापांचा उपद्रव प्रचंड वाढला होता. रहिवाशांनी हा गंभीर प्रश्न शेकाप कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांच्याकडे थेट मांडला.

या तक्रारीनंतर शेतकरी कामगार पक्षाचे कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांनी तात्काळ पुढाकार घेत दोन दिवसांत एमएसबी आणि सिडको अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. मात्र दोन्ही



विभागांनी एकमेकांवर जबाबदारी ढकलल्याने कोणतीही अधिकृत कारवाई झाली नाही. त्यावेळी गौरव पोरवाल यांनी स्वतः च्या खर्चातून संपूर्ण प्लॉटची स्वच्छता करून घेतली, ज्यामुळे कचरा, झुडपे तसेच सापांचे संभाव्य ठिकाण असलेली सर्व घाण दूर करण्यात आली आणि संपूर्ण परिसर पुन्हा सुरक्षित बनला. स्थानिक रहिवाशांनी परिसर स्वच्छ करून दिल्याने परिसरातील नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## कारच्या धडकेत वकील जखमी

| पनवेल | प्रतिनिधी |

रस्ता क्रॉस करत असताना कारने धडक दिल्याने २८ वर्षीय वकील जखमी झाले. या अपघातप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात अनोळखी कारचालकावर गुन्हा दाखल झाला आहे. सिद्धेश शंकर साखरे हे कशेळे, कर्जत येथे राहत असून ते पनवेल कोर्टात आले होते. ते मित्रांसह पायी घरी जात असताना सातच्या सुमारास आशियाना सोसायटीच्या समोरील रस्त्यावरून रस्ता क्रॉस करत होते. पनवेल कोर्टाकडून वडाळे तलावाच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव कारचालकाने त्यांना धडक दिली. यात खाली पडून ते जखमी झाले.

पक्षी अभ्यासक, पर्यटक सुखावले | थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास

# देशी-विदेशी स्थलांतरित पाहुण्यांचे आगमन

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात लांबलेला पाऊस व प्रतिकूल हवामानाचा पक्षांच्या स्थलांतरावर परिणाम झाला होता. मात्र, आता वातावरणात अनुकूल बदल झाले आहेत. थंडीच्या हंगामात हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी व विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होत आहेत. या पक्षांसाठी वातावरण अनुकूल झाले आहे. थंडीही चांगली पडू लागली असल्याने हे स्थलांतरित व स्थानिक पक्षी स्थिरावले आहेत. त्यामुळे पक्षी अभ्यासक, निरीक्षक व पर्यटक सुखावले

स्थलांतरित पक्षांसाठी पोषक परिस्थिती निर्माण झाली असल्याने स्थलांतरित पक्षी जिल्ह्यात दाखल



झाले आहेत. गुलाबी थंडीची चाहूल लागल्याने निसर्गरम्य जिल्ह्यात परदेशी स्थलांतरित पक्षी आणि काही स्थानिक स्थलांतरित पक्षांची रेलचेल पाहायला मिळत आहे. गवतांमधील कीटक व आळ्या खाण्यासाठी आणि साठलेल्या जलाशयामधील पाण्यातील कीटक, कृमी, मृदुकाय जीव-जंतू खाण्यासाठी तसेच समुद्र किनारे, दलदलीचे भाग यामधील छोटे खेकडे, मृदुकाय प्राणी, मासे, जल कीटक हे खाऊन पर्यावरणाचे संरक्षण व जैवविविधता समृद्ध करण्यात हे पक्षी महत्वाची भूमिका बजावत असतात. या पक्षांचे

### परदेशी स्थलांतरित पक्षांचा बोलबाला

ब्ल्यू थ्रोट (शंकर) युरोपियन रोलर (तास पक्षी), युरेशियन रायनेक (मानमोडी) सायबेरियन स्टोनचाट (गप्पीदास पक्षी), बॅटिंग (भारीट पक्षी), पॅलिड हॅरिअर (पांढूरका भोवत्या) या परदेशी स्थलांतरित पक्षांचा बोलबाला येथे पहायला मिळतो.

### जगण्यासाठी प्रवास

उत्तर गोलार्धातील युरोप ,रशिया आणि उत्तर अमेरिका यासारख्या देशात थंडीच्या दिवसात पडणाऱ्या बर्फामुळे जमिनीवरील भूभाग हा बर्फाने आच्छादलेला असतो त्यामुळे पक्षांना खाद्य मिळणे कठीण होऊन जाते म्हणून हे पक्षी विविध देशात स्थलांतर करून आपली उपजीविका भागवतात. तसेच आपल्याकडे पडणारी थंडी आणि पुरेशा प्रमाणात मिळणारे खाद्य तसेच योग्य अधिवास या सर्व कारणांमुळे या पक्षांना आपली घरटी बांधून पिल्लांचे संगोपन करणे सोपे जाते. म्हणून हे बऱ्याच स्थलांतरित पक्षांचा विणीचा काळ सुद्धा हाच असतो.

### स्थानिक पक्षांचे आगमन

पॅराडाइज फ्लाय कॅचर ( स्वर्गीय नर्तक), इंडियन रोलर(भारतीय तास पक्षी),श्राईक (खाटीक), युरेशियन हुपू (हुदहुद), क्रेस्टेड बंटींग (युवराज) या स्थानिक पक्षांचे आगम सुरु झाले आहे.

> रायगड जिल्ह्यात ४०० हून अधिक पक्षी प्रजातींची नोंद आहे. स्थलांतरित पक्षांसाठी येथे अनेक प्रकारचे पोषक नैसर्गिक अधिवास आहेत. त्यामुळे चांगल्या संख्येने पक्षी दाखल होतात. समुद्रकिनारे, पाणथळीचे प्रदेश, घनदाट जंगले, माळराने अशा अधिवासांमध्ये विविध प्रकारच्या पक्षी प्रजाती जिल्ह्यात थंडीच्या मोसमात येतात. पक्षी निरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी ही गुलाबी थंडी पर्वणीच असते.
>
> -शंतनु कुवेसकर, पक्षी निरीक्षक व वन्यजीव अभ्यासक, माणगाव

दर्शन जिल्ह्यातील समुद्रकिनारे, दलदलीच्या जागा, जंगले, भातशेते, खाड्या तसेच गवताळ प्रदेशात होत आहे. परिणामी पक्षी अभ्यासक व निरिक्षकांना तसेच पर्यटकांना ही मोठी पर्वणीच आहे.

# पनवेल महानगरपालिका

## वैदयकीय आरोग्य विभाग

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -410206

दुरध्वनी कार्यालय : 022- 27458040/41/42 फॅक्स नं. : 022- 27452233 वैद्यकीय आरोग्य विभाग : 022 – 27455751
आयुक्त कार्यालय : 022- 27452339 ई-मेल : mohpmc05@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com
जा.क्र./पमपा/वै.आ.वि.का./1786/सन 2025-26 दिनांक:- 13/12/2025

# पदभरती जाहिरात

**वाचा :- 1**.मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन 2025-26 नुसार मंजुर पदे **2**.महाराष्ट्र परावैद्यक परिषद, मुंबई यांचे पत्र क्र. मपवैप/ आसे/ पदभरती/ 336/ 2022 दि.21.12.2022 **3**.मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे कडील पत्र जा. क्रं.राआसो/मनुष्यबळ कक्ष/ सुधारित पदभरती समिती /10266-10600/2023 दि.26.04.2023 **4**.मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे कडील पत्र जा. क्रं.राआसोमुं / मनुष्यबळ कक्ष/ पदभरती /10670-11016/2023 दि.27.04.2023. **5**.सहाय्यक संचालक राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र जा.क्र. रानाआअ /शैक्षणिक पात्रता/ एनयुएचएम/24004-24187/23 दि 24.05.2023 **6**.शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - 2021 / प्र.क्र. 77 / 16 क दिनांक 06.03.2024 **7**. मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे कडील पत्र जा.क्र. राआसोमुं /मनुष्यबळ/ कं.पदभरती/ 27415-663/2024 दि.3.07.2024 **8**.शासन निर्णय क्रमांक : बीसीसी - 2024 / प्र.क्र. 246(ई-848503)/ आरक्षण - 5 दिनांक: 23.09.2025 **9**.मा. आयुक्त महोदय यांची दि. 11.12.2025 मंजुर टिपणी.

पनवेल महानगरपालिका, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग, हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व पॉलिक्लिनिक अंतर्गत खालील तक्यात दर्शविल्याप्रमाणे रिक्त असलेल्या पदांवर निव्वळ कंत्राटी स्वरूपात करार पध्दतीने मानधन तत्वावर नियुक्ती करावयाची आहे. सदरची पदभरतीची प्रक्रिया पनवेल महानगरपालिकास्तरावर राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यात येणार आहेत. यानुसार पुर्णवेळ वैद्यकीय अधिकारी, अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट (Microbiologist) व विशेषतज्ञ (Specialist) या रिक्त पदांकरीता थेट मुलाखत (Walk in Interview) दिनांक 22.12.2025 व 23.12.2025 रोजी सकाळी 10.00 वाजता पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206 येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, LHV, स्टाफ नर्स (स्त्री), स्टाफ नर्स (पुरुष) व बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW)-पुरूष ही पदे गुणांकन पद्धतीने (Merit) भरण्यात येणार असल्याने इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग, सिडको समाज केंद्र, सेक्टर 21, कामोठे, पनवेल 410206, येथे दिनांक 13.12.2025 ते 26.12.2025 या कालावधीत सादर करावेत.पनवेल महानगरपालिकेकरीता मंजुर प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार व शासनाकडील रिक्त कंत्राटी पदांच्या पदभरतीच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, 15 वा वित्त आयोग, हिंदु हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व पॉलिक्लिनिक अंतर्गत रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात महानगरपालिकेच्या https://www.panvelcorporation.com या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

### राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी** | अजा -2<br>अज - 1<br>भजब - 1<br>एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 08** | MBBS with MMC Reg Preference will be given to for bond completion and experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | 60,000/- |
| 2 | **अर्धवेळ वैदयकीय अधिकारी** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 06** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | 30,000/- |
| 3 | मायक्रोबायोलॉजिस्ट | एकाकी पदास बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | MD Microbiology Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | 75,000/- |
| 4 | **LHV** | अज - 1<br>एकुण - 01- | B.SC. Nursing / GNM with MNC Registration. Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 20,000/ |
| 5 | **औषधनिर्माता** | एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>**एकुण - 03** | 12th + Diploma (D Pharm) / B Pharm with MSPC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 17,000/- |
| 6 | **प्रयोगशाळा तंत्रज्ञ** | अजा - 1<br>एस.ई.बी.सी - 2<br>आदुघ - 1<br>**एकुण - 04** | 12th + Diploma with Maharashtra Paramedical Council Registration Preference will be given to experienced Candidates सदर पदाकरीता खालील संस्थेमधुन शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करावे. 1) DPU Dr.D.Y. Patil Vidyapeeth, Pune (Deemed University) (Under Section 3 of the UGC Act, 1956)2) Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik (Established by Govt. Of Maharashtra ) 3) Maharashtra State Board of Technical Education, 49, Kherwadi, Bandra (E) Mumbai. 4) Shreemati Nathibai Damodar Thackersey, Women's University, Mumbai- 400049. 5) Maharashtra University of Health Sciences, Nashik, India. 6) Tata Institute of Social Science, Devnar, Mumbai. | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 17,000/- |
| 7 | **मानसोपचार तज्ञ Psychiatrist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 03** | 1) MBBS with MD Psychiatric / DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |
| 8 | **स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ** Obstetrician & Gynaecologist | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | 1) MBBS with MD / MS Gyn / DGO / DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | To visit once in every week. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs.100 per patient checked of his/her speciality to maximum Rs.5000/ visit. |

### 15 वा वित्त आयोग (15 th Fc)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैदयकीय अधिकारी | अजा - 1<br>अज - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>**एकुण - 04** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | 60,000/- |
| 2 | स्टाफ नर्स (स्त्री) | अजा - 1<br>अज - 1<br>इमाव - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>अराखीव - 2<br>**एकुण - 07** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 20,000/- |
| 3 | स्टाफ नर्स (पुरूष) | एकाकी पदास बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 20,000/- |
| 4 | बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) पुरूष | अजा - 1<br>अज - 1<br>विजाअ - 1<br>एस.ई.बी.सी - 1<br>आदुघ - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 06** | 12th pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 18,000/- |

### हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना (HBT)

| अक्र | पदाचे नाव | प्रवर्गानुसार रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | प्रतिमहा एकत्रित मानधन (रूपये मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **वैदयकीय अधिकारी** | अजा - 1<br>**एकुण - 01** | MBBS with MMC Reg Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | 60,000/- |
| 2 | **स्टाफ नर्स (स्त्री)** | अज - 1<br>अराखीव - 1<br>**एकुण - 02** | B.SC. Nursing / GNM with MNC Registration Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 20,000/- |
| 3 | **बहुउद्देशिय आरोग्य कर्मचारी (MPW) पुरूष** | अराखीव - 1<br>**एकुण - 01** | 12th pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course Preference will be given to experienced Candidates | उच्चतम वयोमर्यादा 64 वर्षे | 18,000/- |
| 4 | **मानसोपचार तज्ञ Psychiatrist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 02** | 1) MBBS with MD Psychiatry / DPM/DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |
| 5 | **त्वचारोग तज्ञ Dermatologist** | बिंदुनामावली लागु नाही<br>**एकुण - 01** | 1) MBBS with MD (Skin / VD), DVD, DNB 2) Maharashtra Medical Council Registration (Preference will be given to experienced Candidates) | उच्चतम वयोमर्यादा 69 वर्षे | To visit once in every fortnight. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs. 100 per patient checked his/her speciality, maximum to Rs.5000/ per visit |

उपरोक्त तक्यात नमुद केल्यानुसार अर्जदारांच्या थेट मुलाखतीद्वारे व गुणांकन पद्धतीनुसार निवड सुचीमधील पात्र उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार जाहिरातीत प्रसिध्द केलेल्या रिक्त पदांवर नियुक्ती दिली जाईल व उर्वरीत पात्र उमेदवारांची पदनिहाय प्रतिक्षायादी ठेवण्यात येईल. भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवर पदनिहाय प्रतिक्षायादी मधील उमेदवारांमधुन त्यांच्या गुणवत्ते प्रमाणे नियुक्ती दिली जाईल. सदर प्रतिक्षायादीचा वैधता कालावधी निवड यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन केवळ 01 वर्ष राहील. तसेच उमेदवारास एका पदापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावयाचा आहे. जाहिरातीमधील सर्व सुचनांचे व निकषांचे काळजीपुर्वक वाचन करून अर्ज विहित केलेल्या पद्धतीनुसारच सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व मुलाखतीदरम्यान सादर केलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.**अर्जदाराची वयोमर्यादा**-1) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक 25 एप्रिल 2016 चे शासन निर्णयानुसार अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत उमेदवाराचे वय जाहिरातीमध्ये विहित केलेल्या वयोमर्यादेत असणे आवश्यक आहे. 2) मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दिनांक २५ मे २०१९ रोजीच्या पत्रानुसार वैद्यकीय अधिकारी (MBBS), विशेषतज्ञ, अतिविशेषतज्ञ यांची वयोमर्यादा 70 वर्षे पर्यंत राहील. तसेच वय वर्ष ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कडुन प्राप्त केलेले शारिरीक दृष्ट्या व मानसिक दृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील. 3) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानात सद्यस्थितीत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. तथापि, कागदपत्रे पडताळणी दरम्यान सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संबंधित कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीचे तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाच्या मंजुर मनुष्यबळ धोरणानुसार (HR Policy) वयोमर्यादा खालीलप्रमाणे राहील.•

**The calculation of age for the contractual year shall be on date of publishing of advertisement.** (a) Minimum Age: No person shall be eligible for employment under National Health Mission, Maharashtra unless he/she has completed 18 years of age. (Annexure 1-2 & 3 NHM Circular dated 29.9.2018 & 28.05.2019) (b) Maximum Age for entry: Maximum age for entry shall be (1) 69 years for MO MBBS and specialists (2) 64 years for Nursing and Paramedical Staff and (3) For remaining posts 38 years for open category and 43 years for reserved category candidates. (c) No age bar for the employees already working under NHM and wish to apply for another post within NHM (d) Applicants above 60 years are mandated to produce physical fitness certificate certified by civil surgeon (Annexure 1- 2.NHM Circular dated 29.9.2018). (e) All NHM employees should not have any administrative or financial proceedings, penal proceedings, criminal or any other type of serious crime against him during previous government service period. (Annexure I - 2.NHM Circular dated 29.9.2018).• **Age limit for end of contractual service:** (1) The age limit for end of contractual service shall be (1) 70 years for MO MBBS and specialists (2) 65 years for Nursing and Paramedical Staff and (3) 60 years for remaining posts. (Annexure I-3.NHM Circular dated 28.05.2019) **अर्ज भरण्याबाबतच्या सुचना** –1) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्दयांची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी. 2) उमेदवाराने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शालांत प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.3) जन्माचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला किंवा माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली जन्मतारीख अर्जात अचुक नमूद करावी. 4) जाहिरात प्रसिध्द केलेल्या शेवटच्या दिनांकापर्यंत असणारे उमेदवाराचे वय (दिवस, महिने व वर्ष ) अचूक नमुद करावे.5) अर्जदार ज्या कार्यक्रमा अंतर्गत व ज्या पदासाठी अर्ज करत आहे त्या कार्यक्रमाचे व पदाचे नाव विहित नमुन्यातील अर्जावर सुस्पष्ट नमुद करणे आवश्यक आहे.6) उमेदवारांस एका पदापेक्षा अधिक पदांकरीता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावयाचा आहे.7) अर्जात उमेदवाराचे लिंग व वैवाहिक दर्जा या बाबतची माहिती नमूद करावी.8) महिला अर्जदार विवाहित असल्यास व नावात बदल असल्यास **विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) किंवा** नावात बदल झाल्यामुळे (Govt. Gazette) मध्ये असा बदल जाहीर केल्याचे शासकीय राजपत्रामधील (Govt. Gazette) अर्जदाराचे नाव असलेल्या पानाची स्व - साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. 9) अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:चा वैध ई-मेल आयडी/पर्यायी ई-मेल आयडी, सुरू असलेल्या भ्रमणध्वनीचा क्रमांक/पर्यायी भ्रमणध्वनीचा क्रमांक नमूद करणे बंधनकारक आहे. 10) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी आहे किंवा कसे हे नमूद करणे आवश्यक आहे, असल्यास त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र (Domicile Certificate) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.11) उमेदवाराने अर्जामध्ये आपला जात, धर्म हा तपशील अचूकपणे नमूद करावा.12) इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत त्यांचे जात-प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र व वैध असलेले नॉन क्रिमिलेअर (Non Cremelayer) प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा अशा उमेदवारांचे अर्ज रद्द करण्यात येतील.13) अर्जदाराने आपला सध्याचा पत्ता व कायमस्वरूपी पत्ता तसेच ई- मेल व मोबाईल नंबर अर्जामध्ये अचूक नमूद करावा.14) अर्जदाराविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. त्याबाबतचे अर्जासोबतचे विहित नमुन्यातील अर्जदाराने स्वाक्षरी केलेले हमीपत्र सादर करावे. अर्जासोबत हमीपत्राचा नमुना देण्यात आलेला आहे.15) अर्ज विहित नमुन्यात टंकलिखीत / स्वहस्ताक्षरात, स्वसाक्षरीने व सर्व दृष्टीने पुर्ण असावेत. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपुर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत

**शैक्षणिक अर्हता/पात्रता**-1) अर्जामध्ये शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशील नोंद करावा.2) अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेला उमेदवाराकडे जाहिरातीमध्ये नमुद केलेली शैक्षणिक अर्हता व पात्रता असणे आवश्यक आहे.3) अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेले गुण व गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुण व गुणांची टक्केवारी नमूद करणे अनिवार्य आहे. प्रमाणपत्रामध्ये नमूद गुण व गुणांची टक्केवारी ही अर्जातील नमुद टक्केवारी व गुण यांच्याशी न जुळल्यास, असे अर्ज नामंजूर करण्यात येतील. 4) अंतिम वर्षाच्या मिळालले गुण ग्रेड किंवा श्रेणी यांचे मध्ये असल्यास त्याचे रूपांतर गुणांच्या टक्केवारीमध्ये करून त्याबाबतचे संबंधित शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, शैक्षणिक परिषद किंवा विद्यापिठ यांचे प्रमाणपत्र (Conversion Certificate) अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे. 5) अर्जदारांनी अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिकेची छायांकित स्वसाक्षांकित प्रत व इतर आवश्यक ती सर्व प्रमाणपत्रे सादर न केल्यास संबंधित उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.6) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही शासकीय मान्यताप्राप्त शिक्षण मंडळ, शैक्षणिक संस्था, शिक्षण परिषद व विद्यापीठ यामधुनच प्राप्त केलेली असणे बंधनकारक आहे..7) अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केलेल्या माहितीनुसार अर्जाची छाननी करण्यात येईल. त्यामुळे सदरची माहिती अपुरी किंवा चुकीची असु नये याची दक्षता घ्यावी.**8) वैदयकीय अधिकारी,मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांसाठी पात्र उमेदवारांनी थेट मुलाखती दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या मुळ गुणपत्रिका सादर न केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल**.

**अनुभव** –1) शैक्षणिक अर्हता व आवश्यक अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच फक्त शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थांमधील केवळ पदाशी निगडीत अनुभव ग्राह्य धरण्यात येईल. त्यामुळे अर्जदाराने शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करू नये. त्या अनुभवाची परिगणना करण्यात येणार नाही.2) अर्जदाराने अनुभवाचा तपशील नमूद करीत असताना शासकीय, निम शासकीय व खाजगी संस्थेच्या अनुभव प्रमाणपत्रामधील रूजु दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. सदर अनुभवाचा कालावधी अनुभव प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची तफावत आढळल्यास सदर प्रमाणपत्र अवैध ठरविले जाईल.3) अर्जदाराने ज्या पदाकरीता अर्ज केलेला आहे त्या पदाशी निगडित अनुभवच ग्राह्य धरण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर अनुभव असल्यास ग्राहय धरण्यात येणार नाही. **संगणक अर्हता**-1) MS - CIT प्रमाणपत्र किंवा तत्सम पात्रता धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा व त्याबाबचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे. **लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र**-1. लहान कुटुंबाची अट दिनांक २३/०७/२०२० रोजी पासुन लागू करण्यात आलेली आहे. यानुसार दिनांक २३/०७/२०२० रोजी पासुन दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्जकरण्यास अपात्र ठरतील. 2. लहान कुटुंबाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अर्जदारानेअर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. **अर्ज शुल्क** – १) अर्जदाराने अर्जा सोबत अर्ज शुल्कासाठी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (DD) जोडणे आवश्यक आहे.खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.700/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांकरीता रू.500/-असे अर्जाचे शुल्क राहील. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष पुढील नावे काढावा. A/c Name :- **Corporation Integrated Health and Family Welfare Society,** Bank Name :- Bank Of India A/C No :- 121210110080348 IFSC Code :- BKID0001212 2) अर्जदाराला ज्या ज्या पदासाठी अर्ज करावयाचाआहे, त्या प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे उपरोक्त नमुद केल्यानुसार धनाकर्ष अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. 3)राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षा व्यतिरिक्त इतरकोणत्याही बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) स्विकारला जाणार नाही. धनाकर्षा शिवाय प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. असे अर्ज अपात्रकरण्यात येतील, याची प्रकर्षाने नोंद घ्यावी. **उमेदवाराचा फोटोव स्वाक्षरी-** १) उमेदवाराने अर्जावरील फॉर्मवर फोटोकरीता राखीव ठेवलेल्या जागेवरत्यांचा अलीकडील काढलेला सुस्पष्टफोटो चिकटवावा. फोटो स्टेपल करू नये. २) अर्जदाराने स्वाक्षरीसाठीराखीव ठेवलेल्या जागेत स्वाक्षरी करावी .**निवड प्रक्रिया-** सदर कंत्राटी पदभरतीच्या अनुषंगाने निवड प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे जा. क्रं. राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/ पदभरती/10670-11016/2023 दि.27.04.2023 रोजीचे पत्राद्वारे प्राप्त सुचना पुढील प्रमाणे आहेत.1) वैदयकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांचीनिवड थेट मुलाखतीद्वारे (Walk in Interview) करण्यात येईल. सदर थेट मुलाखतीकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

### गुणांकन पद्धती (थेट मुलाखतीसाठी)

| अ.क्र | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|
| 1 | Subject Knowledge | 10 |
| 2 | "Research & Academic Knowledge " | 10 |
| 3 | Leadership Quality | 10 |
| 4 | Administrative Abilities | 10 |

| अ.क्र | | विवरण | अधिकत्तम गुण |
|---|---|---|---|
| 5 | Experience<br>a) For Govt. Experience<br>b) For Private Experience | 2 Marks for one year.<br>1 Marks for one year | 10<br><br>**एकुण गुण 50** |

जा.क्र. पमपा / जनसंपर्क / ३१२५/ प्र.क्र.७१३/७३७/२०२५ दिनांक - १२/१२/२०२५

पुढे पहा

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१४ डिसेंबर**

१) श्री. रमाकांत दगडूजीराव गोळे अलिबाग, १४-१२-१९४१

२) श्रीम. अरूणा बळवंत वालेकर अलिबाग, १४-१२-१९५२

## महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

स्त्री शक्ती फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य आणि एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाआरोग्य शिबीर' आयोजित करण्यात आले आहे. हे शिबीर मंगळवार दि.१६ ते बुधवार दि.१७ डिसेंबर यादिवशी सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत समाज मंदिर, कळंबोली प्लॉट क्र. १, सेक्टर-५ ई येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरांतर्गत सर्वसाधारण आरोग्य तपासणी, बालरोग तपासणी, कान-नाक-घसा व त्वचारोग तपासणी, स्त्रीरोग तपासणी, डोळ्यांची तपासणी, हाडांच्या व्याधी तपासणी, दंत चिकित्सासारख्या तपासण्या होणार आहेत. शिबिरात सहभागी होताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत.

# गॅस सिलेंडरचा अवैध साठा जप्त

## मुंबई रेशनिंग विभागाची धडक कारवाई

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**कोणत्याही विभागाची परवानगी न घेता सिलेंडरची साठवणूक व विक्री करणाऱ्या डोंबिवलीच्या पाच गॅस कंपन्यांवर मुंबई रेशनिंग विभागाच्या दक्षता पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत ६७ लाख १४ हजार ८३३ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी गॅसची अवैध साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुध्द शिधावाटप अधिकारी दिपक डोळस यांनी मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली एम.आय.डी.सी., जिल्हा ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



ठाणे शिधावाटप क्षेत्रात पेट्रोल, डिझेल, पेट्रोलियम द्रव पदार्थ व लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस यांचे वितरण सुरळीत होणे तसेच त्यामध्ये कोणताही गैरप्रकार होणार नाही, याकरीता नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा यांचे मार्गदर्शनाखाली दक्षता पथक गठित करण्यात आलेले आहे. या दक्षता पथकामार्फत ही कारवाई करण्यात आली आहे. गुरुवारी (दि.११) मुंबई रेशनिंग विभागाचे दक्षता पथक गस्तीवर असताना त्यांना सर्वे नंबर ८०/२, पिंपळेश्वर महादेव मंदिरजवळ, एम.आय.डी.सी. फेज-२, डोंबिवली (पूर्व) या ठिकाणी बंद पडलेल्या वाहनांमध्ये तसेच अवैध गोदामवजा शेडमध्ये विविध कंपन्याचे घरगुती व व्यावसायिक वापराचे गॅस सिलेंडर साठवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले.

हा परिसर डोबिंवली एम.आय.डी.सी. झोनमध्ये असून मोकळ्या जागेत कोणत्याही विस्फोटक विभागाची, अग्निशमक विभागाची अथवा कोणत्याही कंपनीची परवानगी घेतली नसल्याचे तसेच कोणतीही कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. अवैध, विनापरवाना, अतिज्वलनशील पदार्थाची साठवणूक होत असल्याचे व ज्वालाग्राही गॅसची गळती होऊन मोठ्या प्रमाणात वित्तहानी व जिवीतहानी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अधिकारी व पंचानी याबाबत पंचनामा करुन अक्षया गॅस एजन्सी, मधुकृष्ण गॅस एजन्सी, स्वराज गॅस डिस्ट्रीब्युटर, तृप्ती गॅस एजन्सी व लकी एंटरप्राईजेस यांचे एकूण १८३९ गॅस सिलेंडर व ७ बंद अवस्थेतील वाहने असा मोठा साठा जप्त केला. तसेच मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली एम.आय.डी.सी., जिल्हा ठाणे येथे संबंधित एजन्सीचे मालक/गोदाम कीपर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करुन एकूण रुपये ६७ लाख १४ हजार ८३३ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या कारवाईमध्ये गॅसची अवैध साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुध्द शिधावाटप अधिकारी दिपक डोळस यांनी मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली एम.आय.डी.सी., जिल्हा ठाणे येथे फिर्याद नोंद केली. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालयाचे फिरते पथकातील शिधावाटप निरीक्षक रामराजे भोसले, चंद्रकांत कांबळे, राजेश सोरते, विकास नागदिवे, देवानंद थोरवे, पवन कुंभले व रविंद्र राठोड तसेच शिधावाटप कार्यालय क्र. ३९ फ डोंबिवली (पूर्व) येथील शिधावाटप अधिकारी दिपक डोळस, सहायक शिधावाटप अधिकारी संदिप चौधरी, शिधावाटप निरिक्षक संतोष संसारे व राजीक शेख तसेच मानपाडा पोलिस ठाणे, ठाणे शहर येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी होते.

# महावितरणकडून ३५ हजार अर्जांना स्वयंचलित मंजुरी

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

वीज ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी कटीबद्ध असलेल्या महावितरण कंपनीने वाढीव जोडभार, रूफटॉप सोलर योजना तसेच नावात बदल या सारख्या योजनेत अर्ज केलेल्यांच्या अर्जाला स्वयंचलित मंजुरी देण्याचे धोरण स्वीकारले. परिणामी मागील दिड महिन्यात कोकण प्रादेशिक कार्यालय अंतर्गत येणाऱ्या विविध ठिकाणी सुमारे ३५ हजार अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात आली.

या अगोदर नावात बदल करणे, वाढीव जोडभार मंजूर करणे या प्रक्रियेत साधारणपणे एक महिना लागायचा, पण स्वयंचलित मंजुरी प्रक्रियेत हा कालावधी आता ३ ते ७ दिवसांवर आला आहे. यासाठी वीज ग्राहकांना आवश्यक कागदपत्रे आणि शुल्क महावितरणच्या संकेतस्थळावर जमा करणे आवश्यक आहे.

महावितरणकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, मागील दीड महिन्यात रूफटॉप सोलर योजनेत एकुण २६,१२० अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात आली. यात भांडूप परिमंडळात १५०८, जळगाव १२,३६९, नाशिक १०६७७, कल्याण ८८९, कोकण परिमंडळ रत्नागिरी ६७७ अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात आली. नावात बदल करण्यासाठी आलेल्या ६८३७ अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात आली. यात भांडूप परिमंडळातील सर्वाधिक २१२५ अर्ज, कल्याण परिमंडळातील ४४९, जळगाव परिमंडळात २५६, नाशिक ६५७, कोकण परिमंडळ रत्नागिरी येथील २३७ अर्जांचा समावेश आहे. कोकण प्रादेशिक कार्यालय अंतर्गत येणाऱ्या परिमंडळात एकुण १९१७ वाढीव जोडभार अर्ज मंजूर करण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री मा. ना. देवेंद्र फडणवीस यांनी वीजग्राहकांना तत्पर व घरबसल्या सेवा देण्यासाठी महावितरणच्या डिजिटल सेवेत ग्राहकाभिमुख बदल करण्याचे निर्देश दिले आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी बिलावरील ग्राहक नावात बदल करण्याच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजूरी देण्याचा निर्णय घेतला.

# पनवेल महानगरपालिका

**वैदयकीय आरोग्य विभाग**

कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल -410206

## पदभरती जाहिरात

2) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी या पदाकरीता बंधपत्र (Bond) पुर्ण करण्यासाठी इच्छुक पात्र उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. 3) अर्जदाराच्या अर्जाची छाननी करून थेट मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची यादी त्याच दिवशी सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. 4) सदर प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त होणाऱ्या अर्जदारांच्या अर्जामधील गुणवत्तेनुसार / गुणांकन पद्धतीने (Merit) निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. या संदर्भात सर्व अधिकार मा. अध्यक्ष, निवड समिती यांनी राखून ठेवले आहेत. 5) उमेदवाराची निवड शासनाकडील प्राप्त मार्गदर्शक सुचनांनुसार गठित करण्यात आलेल्या निवड समितीच्या मान्यतेने व मा. अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांच्या दि.१७/०३/२०२२ रोजीच्या पत्रातील निकषानुसार १:३ व १:५ या प्रमाणामध्ये उमेदवारांची निवड गुणांकन पद्धतीने (Merit) करण्यात येईल. उमेदवाराची निवड करताना पदवी/पदविका परीक्षेतील अंतिम वर्षाचे गुण, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन खालील तक्त्यानुसार गुणांकन यादी तयार करण्यात येईल. **6) वैदयकीय अधिकारी, मायक्राबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांव्यतीरिक्त जाहिरातीतील इतर पदांकरीता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.**

### गुणांकन पद्धती (Merit)

| अ.क्र | विवरण | तपशील | अधिक्तम गुण |
|---|---|---|---|
| 1 | पदासाठी आवश्यक Qualifiying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारी 50 प्रमाणे Propottion काढावे. (उदा. 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 50% प्रमाणे Proportion= 60*50/100=30)[ अधिकतम 50 गुण ] | 50 गुण |
| 2 | पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हते पेक्षाअधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी) | [ अधिकत्तम 20 गुण ] मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे Propottion काढावे. (उदा. अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षात 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 20% प्रमाणे Propottion = 60*20/100=12 गुण) | 20 गुण |
| 3 | संबंधित पदाशी निगडित अनुभव | प्रत्येक वर्षासाठी 6 गुण. (1 वर्षाकरिता 6 गुण या प्रमाणे जास्तीत जास्त 30 गुण देता येतील) | 30 गुण |
| | | | एकुण 100 गुण |

7) उपरोक्त गुणांनुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येणार असुन त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश E- Mail द्वारे / टपालाद्वारे पाठविणेत येतील. **8) गुणांकन पद्धतीनुसार (Merit) भरण्यात येणाऱ्या पदांकरीता कोणत्याही प्रकारची मुलाखत** घेण्यात येणार नाही. 9) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास, ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवाराचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधित पदाशी निगडित अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. 10) गुणांकन पद्धतीने निवड झालेल्या उमेदवारांची **निवड यादी** व निवडीस पात्र असलेल्या उमेदवारांची **प्रतिक्षा यादी** पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. 11) उमेदवाराने अर्जामध्ये नमुद केलेला ई-मेल आयडी पदभरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुरू राहील याची दक्षता घ्यावी व त्यासाठी वेळोवेळी ई-मेल तपासण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील. **सर्वसाधारण सुचना-** 1) सदर पदभरती प्रक्रिये बाबतच्या सर्व आवश्यक सुचना व माहिती पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरच वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. या करीता उमेदवारांनी www.panvelcorporation.com या अधिकृत संकेतस्थळास वेळोवेळी भेट देऊन माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत अर्जदाराची राहिल. पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही उमेदवारास वैयक्तिक संपर्क साधण्यात येणार नाही. 2) जाहीरातीत नमूद केलेली पदे ही पूर्णत: कंत्राटी स्वरुपाची असून ती राज्यशासनाची नियमित पदे नाहीत. तसेच या कंत्राटी पदांचा राज्य शासनाच्या पदांशी काहीही संबंध नसून उमेदवार भविष्यात राज्य शासनाच्या नियमित पदांवर समायोजन करण्याची मागणी करु शकणार नाही 3) जाहीरातीत नमूद केलेल्या पदांचे मानधन हे **एकत्रित मासिक ठोक मानधन** आहे. 4) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर सुट्टीचे दिवस वगळुन ७ दिवसांच्या आत नियुक्तीचे ठिकाणी सेवेमध्ये रूजु होणे अनिवार्य राहिल. उमेदवाराने निवडीसाठी कोणत्याही प्रकारच्या दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल व प्रतिक्षाधिन यादीमधील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल. 5) अर्ज भरतांना अराखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १4) कागदपत्रे जोडावीत व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी फॉर्म सोबत खालील (१ ते १6) कागदपत्रे जोडावीत.1) वयाचा पुरावा 2) शैक्षणिक अर्हतेसंबंधी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रे - उदा. पदवी/पदविका प्रमाणपत्र (Diploma / Degree Convocation ) 3) शैक्षणिक पात्रतेच्या गुणपत्रिका (सर्व वर्षांच्या गुणपत्रिका) 4) संबंधित महाराष्ट्र कौन्सिल (Medical / Paramedical) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र अनिवार्य 5) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्रे व कागदपत्रे 6) आधारकार्डची झेरॉक्स प्रत, PAN Card उपलब्ध असल्यास त्याची छायांकित प्रत 7) अलिकडील फोटो (2 प्रती) 8) विवाहित महिला अर्जदाराने नावात बदल केला असल्यास त्याबाबत राजपत्राची (Govt.Gazette) छायांकित प्रत. 9) पुरुष उमेदवाराच्या बाबतीत नावामध्ये काही कारणांमुळे बदल केलेला असल्यास शासनाच्या राजपत्राची (Govt. Gazette) छायांकित प्रत.10) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)11) अर्जदारावर फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र12) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) 13) राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) 14) MS – CIT Certificate प्रमाणपत्र15) जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र सर्व राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे. 16) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (अजा, अज प्रवर्ग वगळुन इतर राखीव प्रवर्गातील) उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक आहे.

### थेट मुलाखतीचे वेळापत्रक

| अ. क्र | पदाचे नाव | मुलाखत वार | वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | **पुर्णवेळ / अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी** | दि 22.12.2025 रोजी | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी 11 ते 01 थेट मुलाखत 02 ते 04 | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206, |
| 2 | **मायक्रोबायोलॉजिस्ट / विशेषतज्ञ** | दि 23.12.2025 रोजी | मुळ कागदपत्र तपासणी सकाळी 11 ते 01 थेट मुलाखत 02 ते 04 | पनवेल महानगरपालिका वैदयकीय आरोग्य विभाग देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी पनवेल -410206, |

उपरोक्त तक्यात नमुद केल्यानुसार कंत्राटी पुर्णवेळ / अर्धवेळ वैदयकीय अधिकारी मायक्रोबायोलॉजिस्ट व विशेषतज्ञ या पदांकरीता थेट मुलाखतीसाठी एच्छुक व पात्र उमेदवारांनी दिलेल्या दिनांक व वेळेनुसार उपस्थित राहावे. तसेच उपरोक्त नमुद पदांव्यतिरिक्त जाहिरातीमधील इतर कंत्राटी पदांसाठी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज व त्या संबंधीची कागदपत्रे व प्रमाणपत्रे उपरोक्त वरील अटी व शर्तीनुसार पनवेल महानगरपालिका, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, वैद्यकीय आरोग्य विभाग, सिडको समाज केंद्र, सेक्टर 21 कामोठे, पनवेल 410206 (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) या पत्त्यावर दिनांक 13.12.2025 ते 26.12.2025 या कालावधीत सकाळी 10.00 ते सायं 6.00 वाजेपर्यत सादर करावेत. विहित मुदतीत टपालाने, कुरीअरने व स्वहस्ते अर्ज स्विकारले जातील. **सदर कंत्राटी पदभरतीमध्ये नमुद पदांच्या संख्येमध्ये कमी अधिक बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पदभरती प्रक्रियेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्याचे व अंशतः किंवा पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, निवड समिती, पनवेल महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत, कृपया याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.**

**अर्जाचा नमुना**

कार्यक्रमाचे नाव ---------------------------------------- व पदाचे नाव----------------------------------------

उमेदवाराचा नजीकच्या काळातील (रुंदी ३.५ से.मी व उंची ४.५. से.मी) आकाराचा फोटो चिकटवून स्वत: साक्षांकीत करावा

प्रति,
मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका

१. संपूर्ण नाव :------------------------------------------------------
(प्रथम आडनाव )

२. वडिलांचे / पतीचे नाव :------------------------------------------------------

३. कायमस्वरूपी राहण्याचा पत्ता :------------------------------------------------------

४. भ्रमणध्वनी क्रमांक :(१)-----------------------------(२)----------------------

५. जन्मतारीख :------------------------ दिनांक : / /२०२५ रोजीचे वय ----------
राष्ट्रीयत्व --------------------

६. उमेदवार विवाहीत / अविवाहित :--------------------------------------------

७. (अ ) जात :--------------------------------- (ब) जात वैधता प्रमाणपत्र : आहे/ नाही.

८. धर्म :------------------------------------------------------------------------

९. ई- मेल आयडी :------------------------------------------------------------------------

१०. खाली नमुद केलेल्या प्रवर्गापैकी योग्य चौकोनात ( ✓ ) अशी खुण करावी.

| अ.जा (SC) | अ. ज (ST) | वि.जा (अ) (VJ-A) | भ.ज (ब) (NT-B) | भ.ज (क) (NT-C) | भ.ज (ड) (NT-D) | वि.मा.प्र (SBC) | इ.मा.व (OBC) | ई.डब्ल्यु.एस (EWS) | एस.ई.बी.सी (SEBC) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

११. शैक्षणिक अर्हता :

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१२. अतिरिक्त अर्हता :-जसे पदवीत्तर

| उत्तीर्ण केलेली व्यवसायिक परिक्षा | विद्यापीठ/ मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (एकुण) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३. अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्षे | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१४.अवगत असणाऱ्या भाषा :

| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| बोलणे | | | |
| लेखन | | | |

१५. आपणा विरुद्ध न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालु आहे काय ?(असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा)

१६. अर्जासोबत खालील छायांकित सत्य प्रती जोडलेल्या आहेत. (जात वैद्यता प्रमाणपत्र व स्त्री उमेदवारांनी विवाहानंतर नावात बदल झाला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ नावात बदल झाल्याचे राजपत्र जोडणे बंधनकारक आहे.)

| | |
|---|---|
| १. | २ |
| ३. | ४. |

१७.वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असनु ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुद्ध कायदेशिर कारवाई होईल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : (अर्जदाराची स्वाक्षरी व नाव )

**फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे हमीपत्र**

मी.श्री./श्रीमती/कुमारी.....................................................................
वय.............. वर्ष.............................सध्या राहणार असे लिहुन देते/देतो की, या पत्त्यावर .............वर्षापसून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझेविरुद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

**प्रतिज्ञापन**

**नमुना अ**

मी श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................
श्री..................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी
वय....... वर्ष, राहणार,..............................................................
याद्वारे असे जाहिर करतो/करते की,

(१) मी ........................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ..............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै, २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............ आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

(३) दिनाक २३ जुलै, २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै, २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-
सही/-
दिनांक:-

**(डॉ. आनंद गोसावी)**
**वैदयकीय आरोग्य अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# आपत्ती व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन



| कोर्लई | प्रतिनिधी |

मुलांनी आपल्या घरामध्ये आई-वडील नसताना गॅस सिलेंडरचा वापर, इतर वीजेवर चालणाऱ्या वस्तूंचा वापर आणि आई बाबांची वाहने रस्त्यावर घेऊन जाऊ नये. वाहन परवाना आपल्या जवळ नसल्यामुळे आई-बाबांवर गुन्हा दाखल होतो. यासाठी आपत्तीबाबत नेहमी सतर्क राहून आई-वडीलावर खर्चाची आपत्ती आणि आपला अनमोल जीवन उध्वस्त होणार नाही, यासाठी कायम काळजी घ्यावी, असे प्रा. डॉ. जयपाल पाटील यांनी सांगितले. ते अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील आय.ई.एस. हायस्कूलने आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी आपत्ती व्यवस्थापन तज्ञ प्रा.डॉ. जयपाल पाटील, मुख्याध्यापक किरण पाटील, दर्शन प्रभु, सुनील प्रधान, राजिप प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुभाष पाटील उपस्थित होते.

स्वच्छतेची काळजी घेणे, त्याचबरोबर सर्व भाषाचे शिक्षण घ्यावे, असे भाषातज्ज्ञ सुनील प्रधान यांनी सांगितले. त्याचबरोबर सध्या मुले मोबाईल वर जास्त भर देत आहेत त्याचा वापर गरजेनुसार अभ्यासासाठीच करावा. मैदानी खेळांमुळे शरीर मजबूत व काटक होईल, असे दर्शन प्रभु यांनी सांगितले. घर, वाडीमधे साप, विंचु दंश झाल्यास अथवा अपघात झाल्यास १०८ रुग्णवाहिकेस बोलवावे तसेच आपल्या गावातील कोणाही महिलेस बाळंतपणास नेण्यास आरोग्य खात्यात १०२ क्रमांकावर मोबाईल करावा. डॉ. निर्मला डांगे यांनी १०८चा वापर कसा करावा, याची माहिती दिली. यानंतर घरामधे छोटीशीच आग लागली ती कशी विझविण्यात येते, त्याचे प्रात्यक्षिक डॉ. जयपाल पाटील यांनी दाखविले.

## एड्स दिनानिमित्त विविध उपक्रम

| रसायनी | प्रतिनिधी |

रिलायन्स लोधीवली येथे जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून जनजागृती व आरोग्यविषयक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रसायनी परिसरात ट्रक ड्रायव्हर आणि कामगारांत गेटसमोर पथनाट्य सादर करण्यात आले. तसेच पार्किंग परिसरात स्वेच्छेने एचआयव्ही तपासणी, डोळ्याची तपासणी शिबीर आणि आरोग्य विषयक विषयावर प्रश्न मंजुशा घेण्यात आली. योग्य उत्तरे देणाऱ्यास बक्षीस देण्यात आले. रिलायन्स केंद्रात हाडांची खनिज घनता तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. ऑटिओपेनिया व ऑस्टिओपोरेसेस असलेल्या रुग्णांना आवश्यक औषधे देण्यात आली. मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दि.५ डिसेबर २०१५ रोजी, रिलायन्स एआरटीद्वारे टि. बी.मुक्त भारत अभियाना अंतर्गत निक्षय पोषण योजना कार्यक्रमाचे उद्घाटन झाले या प्रसंगी डॉ. प्राची नेहुलकर (साहाय्यक संचालक आरोग्य सेवा कृष्ठरोग व क्षय रोग विभाग) अक्षराज राठोड हे मान्यवर उपस्थित होते.

पोषण आहार योजनेचे मुख्य उद्दीष्ट कुपोषणाची जोखीम कमी करणे, उपचार कालावधीतील सहनशक्ती वाढवणे, रुग्णांचा बरा होण्याचा वेग बाढवणे व आरोग्यदायी समाजनिमित्त मदत करणे. रिलायन्स या प्रकल्पा अंतर्गत सुमारे ५० क्षयरुग्णांना रिलायन्सकडून उपचार काळात प्रोटीनयुक्त आहार कीट आणि आहार मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

## महानगरपालिकेकडून स्वच्छतेविषयी जनजागृती



(छायाचित्र – राजेश डांगळे)

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिका स्वच्छतेवर विशेष भर देत आहे. स्वच्छता निरीक्षक महेंद्र भोईर व कर्मचारी वर्गाने पनवेल भाजी मार्केट परिसरात स्वच्छतेविषयी जनजागृती केली. यावेळी व्यापारी व रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्यांना दुकानासमोर कचरा न टाकण्याचे आवाहन करण्यात आले. कचरा साठवण्यासाठी डस्टबिनचा वापर करण्याचे महत्व समजावून सांगितले. शनी मंदिर, उरण नाका येथे ओलाऊसमेंटद्वारे स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. तसेच, स्वच्छ पनवेलसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत श्रवण अव्वल

| नेरळ | प्रतिनिधी |

विद्या मंदिर मंडळ मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस कला व वाणिज्य महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत १७महाविद्यालयांचा सहभाग होता. रायगड, पालघर, पुणे मुंबई, ठाणे अशा विविध जिल्ह्यातून स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धे साठी समाजातील दैनंदिन घडामोडी यांच्याबाबतचे अनेक विषय ठेवण्यात आले होते. त्यात शेतकरी कर्जमुक्त कधी होणार? सध्याच्या राजकारण लोकशाहीचा उत्सव की ढोंग, समाजमाध्यम अभिव्यक्ती स्वातंत्र्य व्यासपीठ आणि अफवांचा बाजार, भारतीय कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक बांधिलकी आणि आरक्षण जातीनिहाय की आर्थिक निकषांवर असे पाच वषय देण्यात आले होते. या स्पर्धेचे प्रथम क्रमांक पुणे येथील एस पी महाविद्यालयाचा श्रवणवामनकदमयानेपटकावला. तर द्वितीय क्रमांक मुंबई विद्यापीठमधील अभय कृष्णकुमार आळशी याने



मिळविले. नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालयाची दक्षता संतोष डुकरे तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. तर कौस्तुभ शैलेश गोसावी आणि रेवती चंद्रकांत मुंढे यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे जांभिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. मधुकर नंदकुमार बोडके यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६५ | ४ | ०-२४-०० | ०=६६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १३/१२/२०२५

**अॅड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असनु त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे वरवठणे, ता. रोहा, जि.रायगड येथील .......**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| कविता दिनेश अग्रवाल, जयंतीलाल प्रताममल जैन, विकास सुरेश जैन, विकास वसंतलाल शहा | ४५९ | ०-९०-०० | १.५० | खालसा/ गवतपड |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१४) चौदा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.१४/१२/२०२५
सही
**अॅड. पी. जी. दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी.विंग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे डॉस्पिटल जवळ, ता.रोहा, जि.रायगड
पिन नं.४०२१०९ मोबा नं. ९२७२७१३९५६

दिनांक:- १३/१२/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-गुंजीस, ता.अलिबाग, जि.रायगड खालील नमुद वर्णनाची जमिन मिळकत अवधुत जयराम गोसावी रा.नवगाव दांडा, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीची असून सदरील जमिन मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| गुंजीस, ता.अलिबाग | ३४/१/८/अ | क्षेत्र ०-३७-५० पो.ख. ०-०५-१० एकूण क्षेत्र ०-४२-६० | ०.६४ |

वर नमुद मिळकतीमधील ०-०२-०० हे.आर. जमिन मिळकत या नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, मृत्यूपत्र वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १३/१२/२०२५

**अॅड. जितेंद्र विठोबा भगत**
फ्लॅट नं.०१ श्री साधना सोसायटी, मयेकरवाडी समोर,
अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९०७५२२८५६१/९१६८४३९६६९

**चौकशीची जाहीर नोटीस**
**नियम ७ अ प्रमाणे**

नोंदणी शाखा
जा.क्र. २८०९/२०२५
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि. रायगड
दि. १२/१२/२०२५

अर्ज क्रमांक :- ६०५/२०२५

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:-HFC CRICKET TRUST बाबत

Shri. CHANDAN KEWAL MAHAJAN अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेला नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम ३०००/- रुपये

(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहिनिशी व मी सहायक धर्मादाय आयुक्त रायगड अलिबाग यांचे शिक्कयानिशी आज दिनांक १२.१२.२०२५ रोजी दिली.

सही/-
**प्र.अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकती तिचे मालक श्री. विजय हरकिसन देसाई रा. ए २१, पल्लवी बिच एन्जेल, जे.आर.म्हात्रे मार्ग, रूला पार्क, जुहू, मुंबई-४०००४९ यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे भानसोली, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| १५ | २ | ०.४२.५० | ३.७५ |
| १५ | ४ | ०.२१.२० | १.८७ |
| १६ | ३ | ०.४४.८० | २.६२ |
| १७ | १ | ०.८९.५० | ९.९३ |
| २४ | १ | ०.४४.०० | ७.०७ |
| २४ | २ | ०.३७.४० | ६.०० |
| २४ | ३ | ०.१४.९० | २.३७ |
| २४ | ५ | ०.१२.२० | १.९४ |
| २४ | ६ | ०.११.४० | १.८१ |

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. १४/१२/२०२५

**अॅड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं.४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी पुढे नमुद केलेली मिळकत तिचे विद्यमान मालक अलका शांताराम पाटील व इतर १६ यांचेकडुन कायम खरेदी करण्याचे ठरवले असुन त्याबाबत विद्यमान मालक व आमचे आशिलांमध्ये बोलणी चालु आहेत. मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

| अनु. क्र. | गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे खंडाळा, ता.अलिबाग | १४/१/फ/४/अ/१२ | ०.५३.७० पैकी ०.३७.७० | ७.३९ |

सदर मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा, कोणत्याही संस्थेचा, बँकेचा गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, खरेदी, साठेकरार, कोणताही करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, पोटगी, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, ताबा बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, दिवाणीदावा, महसुलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकतीसह व कागदोपत्री प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत प्रत्यक्ष येवुन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वर नमुद मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी आहे असा भरवसा जमिन मालकांनी आमचे आशिलांना दिलेला आहे. सबब विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहीत न आल्यास सदरहु मिळकतींबाबत आमचे आशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १३.१२.२०२५

**श्री.अमित महेश्वर देशमुख**
ॲडव्होकेट आणि नोटरी,
सृष्टी बिल्डींग, वेधशाळेसमोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

दिनांक १३/१२/२०२५

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झाप ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे-झाप ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट नं./स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.देऊ झांजु ठोंबरे व ११ | ३३५ | १-५२-८० पैकी ०-३२-०० | २५-६० |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्रीबाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहिवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक १३/१२/२०२५
सही /-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मो.बा.नं.८१४९६५१५०८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ. अनिता अनंत विचारे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गोंधळपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र आर. चौ.मी. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| ३३/ब | २-८०-०० | २८.०० |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला आमचे अशिलांना देण्यात येईल. तसेच मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील आणि त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दिनांक :- १३/१२/२०२५

**अॅड.(डॉ.) दिपक विश्वनाथ नागे**
सदनिका क्र. १, तळ मजला,
लक्ष्मी को.ऑप.हौ.सोसायटी, कामत आळी,
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहेत.

**मौजे-बेकरे, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| किशोर रामचंद्र खरे | ३० | ३ | ०-५०-०० | ०-४१ |
| सुप्रिया सुरेश सहस्त्रबद्धे | ६८ | ७ | ०-२०-०० | ०-१९ |

सदरची जमीन मिळकत या वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्‌गभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकतीं संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १४/१२/२०२५

खरेदीदारातर्फे वकील
**अॅड.स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

### पनवेल महानगरपालिका

पनवेल महानगरपालिके करिता आवश्यकतेनुसार अतिरिक्त हार्डवेअर साहित्यांचे दर मंजूर करणेकामी जाहिर ई निविदा प्रसिद्ध करुन दर निश्चित करणेबाबत या कामासंबंधीचा सविस्तर तपशिल www.mahatender.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जा.क्र.पमपा/भांडार/२३२५/प्र.क्र./१०८८/२०२५
दिनांक १२/१२/२०२५

सही/-
**(गणेश शेटे)**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळिवण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे सुतारपाडा, ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक शंकर हिरु पाटील, रा.सुतारपाडा, पो.कामार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड, यांच्याकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. तसा करार आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये झालेला आहे. सदरच्या मिळकती निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| सुतारपाडा, ता.अलिबाग, जि. रायगड | १७/१ | एकूण ०-३६-९० | ५.५७ |
| सुतारपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड | १८/१ | एकूण ०-१०-१० | १.०६ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. १४.१२.२०२५
सही/-
**अॅड. मच्छिंद्र एस.म्हात्रे**
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- बोअरवेल, विहीरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन म्हात्रे - ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- शुभमूर्हत विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय प्रथमद्वितीय वधूवंराची नावनोंदणीसाठी ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६
- प्रथम, पुर्नविवाह सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- SALE OF BAGAYATI WADI. 13 GUNTHE, @26 Lakh per Guntha, 200 Mtr. (meter) from. sea Beach. Village-THAL, Gunjal Ali, Alibag, M. 8779805353
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview
- सर्वप्रकारचे आजार/विवाह (१८-८०) घरबसल्या पिढ्यांपिढ्या उत्पन्नासाठी गुंतवणुकीनुसार वेळ ठरवूनच डॉ.नथुराम शिहु (पोयनाड-नागोठणा) रायगड ४०२१०६/ ७५०७१६६०१५
- लीफ एक्सोटिका विला वाडगाव येथे राहण्यासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे त्यासाठी पुढील नंबर वर संपर्क करावा ९८२२९३८४४४
- HP गॅस हाशिवरे इथे कामासाठी मुलगा पाहिजे शिक्षण बी.कॉम ग्रॅज्युएट (इंग्रजी मिडीयम) काम अकाऊन्टंट २ वर्षी अनुभव असल्यास प्राधान्य संपर्क : ९७०२६७४५५५
- घरकामासाठी बाई पाहिजे अर्धवेळ साठी,स्थळ-पंतनगर, संपर्क क्र-८०९७२०५९३९/९४२२३७५१२४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५




## राशीभविष्य

- **मेष** : धार्मिक, सामाजिक कार्यात समाधान मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. बाकी चिंता नसावी.
- **वृषभ** : स्पर्धांमध्ये यश मिळेल. गूढ विद्येत प्रगती होईल. अचानक धनलाभाचे योग आहेत. सुखी रहावे.
- **मिथुन** : कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. उपजत कला-गुणांचा विकास होईल. प्राप्तीचं प्रमाण वाढेल.
- **कर्क** : स्थावर प्रश्न वाढवू नका. सरकारी कामं मनासारखी होतील. गेलेल्या संधी पुन्हा येणार आहेत.
- **सिंह** : नव्या कामांना गती मिळेल. वाहन सौख्य लाभेल. विवाहविषयक कार्यात अनुकूलता वाढेल.
- **कन्या** : कार्यक्षेत्राबाबतच्या चिंता कमी होतील. खर्च विचारपूर्वक करावेत. अडचणींवर मात करू शकाल.
- **तूळ** : नव्या विचारांना चालना मिळेल. प्रतिकूलतेवर मात करू शकाल. स्वमताग्रह टाळायला हवा.
- **वृश्चिक** : प्रकृतीच्या तक्रारी कमी होतील. चिंता दूर होत जाईल. उत्साहवर्धक घटना घडणार आहेत.
- **धनु** : आवडीच्या क्षेत्रात काम करण्याची संधी लाभेल. मित्रांचं चांगलं सहकार्य लाभेल. उत्कर्ष होईल.
- **मकर** : सरकारी कामं मनासारखी होतील. कृषी, वैद्यकीय क्षेत्रात अनुकूलता लाभेल. चिंता करू नका.
- **कुंभ** : आर्थिक विकासाच्या संधी लाभतील. नव्या योजना मार्गी लागतील. कला-गुणांचा विकास होईल.
- **मीन** : एखादी गोष्ट मनाविरूध्द घडेल. हितशत्रूंपासून सावध रहा. दैनंदिन कामात अधिक लक्ष द्यावं

## १४ डिसेंबर
### दिन विशेष

**१९६२** : नासाचं मरिनर २ शुक्राजवळ जाणारं पहिलं मानवनिर्मित यान ठरलं.
**१९७७** : प्रख्यात कवी ग. दि. माडगूळकर यांचं निधन.
**२०१२** : अमेरिकेच्या न्यू टाऊन शहरातील प्राथमिक शाळेत माथेफिरुचा गोळीबार. २० मुले आणि अन्य आठ व्यक्ती ठार.
**२०१३** : सरकार स्थापन करण्यासाठी आम आदमी पक्षाने भाजप आणि काँग्रेसपुढे १८ अटींचा मसुदा ठेवला.
**२०१५** : ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार यांना पद्मविभूषण पुरस्कार प्रदान.

## आरोग्यमंत्र
### उपयुक्तता खूप मोठी

लिंबाच्या झाडातील विविध भागांचे लाभ जाणून घेत असताना त्याच्या पानांमधील औषधी आणि उपयुक्त घटकांची नोंद घेणं गरजेचं ठरतं. लिंबाच्या पानांच्या वापरानं अनेक प्रकारचे लाभ मिळत असल्याचं संशोधनांती सिद्ध झालं आहे. म्हणूनच त्याची दखल घेणं गरजेचं ठरतं. याविषयी अधिक माहिती घेऊ या.



✻ केसांमधील कोंडा नाहीसा करण्यासाठी लिंबाच्या पानांचा उपयोग होतो. त्यासाठी लिंबाची पाने वाटून पेस्ट करावी आणि केसांच्या मुळाशी लावून हलक्या हाताने मसाज करावा. ही पेस्ट आठवड्यातून एक ते दोन वेळा लावल्यास केसातील कोंडा नाहीसा होतो. ✻ पोटात जंत झाले असतील तर या पानांचा वापर गुणकारी ठरतो. विशेषत: लहान मुलांच्या पोटात जंत झाले तर लिंबाच्या पानांचा पाच मिली रस घेऊन त्यात हलका मध घालून मुलाला पाजावा. यामुळे त्यांच्या पोटातील जंत मरतील आणि आराम वाटेल. मोठ्या माणसांसाठी १० मिली रस आवश्यक आहे. ✻ कावीळ झाली असल्यास लिंबाच्या पानांचा १० मिली रस काढून तो ताकात मिसळून सेवन करावा. हा रस सलग १० ते १२ दिवस घेतल्यास कावीळ ठीक होते. हा काविळीसाठी रामबाण उपाय समजला जातो. ✻ गॅस, पोटदुखी, बद्धकोष्टता यासारखा त्रासांवरही हा उपाय प्रभावी आहे. ✻ लिंबाच्या पानांचा काढा रक्त शुद्ध करतो. ही पाने घालून तुम्ही आरोग्यदायी चहा घेऊ शकता.

## स्मार्ट फन
### स्मार्टफोन नव्हे, वायरलेस माऊस

कॉम्प्युटरवर काम करताना माऊसचा वापर होतो. बाजारात वायरवाले आणि वायरलेस अशा दोन्ही प्रकारचे माऊस उपलब्ध आहेत. पण वायरलेस माऊस थोडे महाग असल्याने त्यांचा वापर कमी प्रमाणात केला जातो. छोट्या दोस्तांनो, तुम्ही घरच्या घरीही माऊस तयार करू शकता. घरी जुना अँड्रॉइड स्मार्टफोन असेल तर त्याचा माऊससारखा वापर करता येईल. यासाठी काय करायला हवं? समजून घेऊ या.

✻ की-बोर्ड किंवा अँड्रोमाऊस ३.० ॲप डाउनलोड करू घ्या. पीसीतही हे ॲप डाउनलोड करून घेता येईल. अँड्रोमाऊस सर्व्हर ३ या नावाने ते पीसीसाठी उपलब्ध आहे. ✻ पीसीमध्ये डाउनलोड केलेलं ॲप ओपन करा. इथे तुम्हाला आयपी ॲड्रेस दिसेल. प्रत्येक कॉम्प्युटरमध्ये वेगळा आयपी ॲड्रेस येईल. त्याची नोंद करून ठेवा. आता अँड्रॉइड स्मार्टफोनमधलं ॲप ओपन करा. इथे वायफाय आणि ब्लू टूथ असे दोन पर्याय दिसतील. यातल्या वायफायची निवड करा. ✻ आता तुम्ही आयपी ॲड्रेसची नोंद करा. कॉम्प्युटर आणि मोबाईल ॲप जोडलं गेल्यामुळे माऊस म्हणून स्मार्टफोनचा वापर करता येईल.

## स्मार्ट शॉपिंग
### लिपस्टिकची खरेदी?

✻ आपल्याला प्रत्येक शेड शोभून दिसतेच असं नाही. त्यामुळे खरेदी करण्याआधी लिपस्टिक ट्राय करून बघा.

✻ तुम्हाला टेस्टर्स दाखवले जातात. ते ओठांवर लावू नका. यामुळे जंतूसंसर्ग होऊ शकतो.

✻ लिपस्टिकचं आयुष्य तीन वर्षांपर्यंत असतं. त्यामुळे एक्सपायरी डेट तपासून मगच खरेदी करा.

✻ बजेट ठरवून घ्या. बाजारात महागड्या लिपस्टिक्सही मिळतात. तुमच्या बजेटमध्ये बसणारं, चांगल्या ब्रँडचं उत्पादन विकत घ्या.

✻ न्यूड शेड्च्या लिपस्टिक्स ऑनलाईन खरेदी करू नका. त्यातले घटक तपासून घ्या. पेराबेन्सयुक्त उत्पादन घेऊ नका.

## पंचांग

**रविवार, १४ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष कृ. १०, चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : हस्त, योग : सौभाग्य, सूर्योदय ७.०५, सूर्यास्त १८.०१

## फॉरवर्डस

**ख़्वाब मन्ज़िलों क़े मत दिखाओं ये यारां हमें...**

**बस्स.. कहाँ तक़ साथ आओगें ये बतां हमें...!**

## वेगळ्या वाटा

देशात पायाभूत सोयीसुविधा आणि बांधकाम क्षेत्राचा वेगाने विकास होत आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पांमुळे तज्ज्ञ मंडळींसाठी बऱ्याच नामी संधी उपलब्ध झाल्या आहेत. तुमच्याकडेही कल्पकता आणि नव्या गोष्टी शिकण्याची तयारी असेल तर या क्षेत्रात करीअर करता येईल. सेंटर फॉर इकॉनॉमिक बिझनेस ॲण्ड रिसर्चच्या अहवालानुसार २०३० पर्यंत भारत ही जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असेल. सहाजिकच रिअल इस्टेट क्षेत्रावरही सकारात्मक परिणाम होईल आणि कामाला वेग येईल. रीॲल्टीशी संबंधित अनेक क्षेत्रं आहेत. स्टील, सिमेंट, इलेक्ट्रॉनिक्स आदी क्षेत्रांच्या माध्यमातूनही तुम्ही देशाच्या प्रगतीशी जोडले जाऊ शकता. **(क्रमश:)**

## करिअरवाटा
### परीक्षांमधील उत्तम यशासाठी...

आता लवकरच परीक्षांचा काळ सुरू होईल. पुढील उत्तम कारकिर्दीच्या दृष्टीने परीक्षेत चांगलं यश मिळणं गरजेचं असतं. त्यासाठी अनेकजण कसून मेहनत घेतात. मात्र, काही महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्यायला हवं. सर्वप्रथम आपल्या अभ्यासाचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. स्वत:च स्वत:चं परिक्षण केल्यास वेळापत्रक बनवणं सोपं जातं. वेळापत्रक बनवताना न समजलेल्या



विषयासाठी जास्त वेळ द्यावा. शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नपत्रिका सोडवून होतील तेवढा जास्त सराव होईल हे लक्षात ठेवावं. स्पर्धा परिक्षांसाठी पेपर सोडवण्याचे वेगळे नियम असतात. शिक्षकांकडून या सर्वांबाबत सूचना मिळतच असतात. तरी काही वेळा काही गोष्टी विसरल्या जातात. त्या पुन्हा पुन्हा लक्षात घ्याव्या. थेअरीच्या पेपरमध्ये मुद्देसूद आणि परिपूर्ण उत्तरांना महत्त्व असते तर प्रॅक्टिकल प्रश्नांना नेमके आणि कमीत कमी विवेचनात अचूक उत्तर अपेक्षीत असते. काही ठराविक प्रश्नपत्रिकेत चुकीच्या उत्तराला मार्क कापले जातात. काही नियम न पाळल्यास मार्क कमी होतात. लॉजिकने सोडवण्यात येणाऱ्या प्रश्नांना नेमका विचार करण्याची गरज असते. हे लक्षात घेता या सरावासाठी हा काळ बराच महत्त्वाचा असते. एकट्याने अभ्यास करताना त्याच त्याच चुका होण्याचा संभव असतो. ग्रुपमध्ये अभ्यास करताना एकमेकांच्या चुकांकडे लक्ष जाते. हेही लक्षात घ्या.

## खेचाखेची
### चेकबुक्स

मी माझ्या गर्लफ्रेंडला विचारलं, तुला कोणती बुक्स जास्त आवडतात?
.
.
.
.
ती म्हणाली, सही केलेली चेकबुक्स!

## वेगळं काही

बाळ जन्मल्यावर नाळ कापून टाकतात. पण या नाळेचा वापर करून लाखो रुपयांची कमाई करता आली तर? ऑस्ट्रेलियामधील मेलबर्न इथे राहणारी २३ वर्षीय कियारा नोबेल नाळेपासून विविध वस्तू तयार करते आणि विकते. या व्यवसायातून ती वर्षाला लाखो रुपये कमावते. कियारा परिचारिका आहे. ती गेल्या दोन वर्षांपासून अधिकृतपणे हा व्यवसाय करते. प्रसूतीनंतर बाळांची नाळ चक्क कचऱ्यात टाकली जाते. पण कियाराने उत्पन्नासाठी त्यांचाच वापर करायचं ठरवलं. नाळेपासून एनर्जी कॅप्सूल, फेस क्रीम, भेटवस्तू आदी उत्पादनं तयार केली जातात. यातून तिला वर्षाला तब्बल ८,५०० पाऊंडच्या आसपास उत्पन्न मिळतं. **(क्रमश:)**

## महिलायन
### वेळीच सावध व्हावं

माझी दहा वर्षांची मुलगी बुद्धिमत्ता, शारीरिक आणि मानसिक क्षमता या बाबत चारचौघींसारखी आहे. पण तिच्या काही मर्यादांकडे दुर्लक्ष करुन पती अवाजवी अपेक्षा बाळगतो. अभ्यासाबरोबर खेळ, कला यातही तिने अव्वल असावं असा त्याचा अट्टाहास आहे. चांगली कामगिरी दाखवली नाही तर तो तिच्याशी अबोला धरतो. गरजेच्या वस्तू आणून न देण्याचं धोरण ठेवतो. ही अपमानास्पद वागणूक तिला बेचैन करते. बरेचदा ती काही न खाता-पिता रडत झोपी जाते. त्याला समजावून सांगितलं तर मलाच चार गोष्टी ऐकवतो. हा प्रश्न कसा सोडवावा काही कळत नाही.



– मुलीशी अशा निष्ठूर पद्धतीने वागून तुझा नवरा मोठी चूक करत आहे. याबाबत सोनाराने कान टोचलेले चांगले. हे घरातल्या वडीलधाऱ्याने, मुलीच्या वर्गशिक्षकांनी अथवा समुपदेशकाने त्याला सांगितल्यास योग्य ठरेल. मुलीला विश्वासात घेणं, तिच्या मनात अभ्यासाप्रती-खेळाप्रती आवड निर्माण करणं, त्यातून आधी तिने आनंद घेणं आणि नंतर जिंकण्यासाठी स्पर्धेत उतरणं असा प्रवास व्हावा. अन्यथा या सगळ्याबाबत, प्रामुख्याने पित्याबाबत तिच्या मनात आढी निर्माण होईल जी त्यांच्यातील हळव्या संबंधांसाठी योग्य नाही. वेळीच सावध हो.

## सुडोकू ४१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ | | ७ | | | |
| | १ | | ३ | ४ | ५ | | ९ | ८ |
| | | ५ | ६ | | ९ | ३ | | |
| | ७ | १ | | ६ | | | ८ | ४ |
| | ५ | | | | | | १ | |
| ६ | ३ | | | ५ | | ९ | २ | |
| | | ३ | ९ | | ६ | ८ | | |
| ५ | ८ | | ४ | १ | २ | | ३ | |
| | | | ५ | | ८ | | | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ४० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ५ | १ | ७ | ६ | २ | ८ | ४ | ३ |
| ८ | ३ | २ | ९ | ५ | ४ | ६ | १ | ७ |
| ७ | ४ | ६ | ३ | १ | ८ | ५ | ९ | २ |
| ३ | ७ | ५ | १ | ४ | ६ | ९ | २ | ८ |
| ४ | २ | ९ | ५ | ८ | ७ | ३ | ६ | १ |
| १ | ६ | ८ | २ | ३ | ९ | ७ | ५ | ४ |
| २ | १ | ३ | ६ | ७ | ५ | ४ | ८ | ९ |
| ६ | ८ | ७ | ४ | ९ | १ | २ | ३ | ५ |
| ५ | ९ | ४ | ८ | २ | ३ | १ | ७ | ६ |

## शब्दकोडे क्रमांक ४१



**आडवे शब्द :-**
१) शिवाचे रुद्र स्वरुपे
५) पक्षांचा समूह
८) चिंतन
१०) विश्वातील सर्वभाग
१२) सरसकट
१५) धनी
१७) नासलेला
१९) थोडे, वृद्धत्व
२१) चौक
२२) त्वरित, चटकन
२४) छोटा, बारीक
२६) बेफिकीर
२८) पळवून नेणे
२९) चाळ, पैंजण
३०) हात
३१) गवत, कडबा इ.खाद्य
३२) नृत्य
३३) चक्र
३४) सापाची एक जात
३६) पोलिस
३८) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
३९) फणसाची पोळी
४१) समुद्र
४३) हाताचा तळवा
४५) श्रेष्ठ पुरुष
४७) मध
४९) शिरा, सांज्यातील गव्हाचा पदार्थ
५०) रजत, रौप्य
५१) सेवा करणारा
५२) फळातील मगज
५३) खुंट, धस, तांदूळ कांडणे
५४) इंद्रिय, गात्र
५५) दिवा
५७) केर
५९) वजन
६०) तात्काळ
६५) लोकर, लव(इं.)
६६) थंड झालेले अन्न
६७) कलावंत

**उभे शब्द :-**
१) कापूस भरलेली बिछाईत
२) धाक, दरारा
३) चांदणी
४) सजावट करणारा
६) मुक्काम, गंध
७) स्तुती करणारा, चारण
८) सुसरी असलेला समुद्र
९) अभिनेता
११) आवड, द्रवपदार्थ
१३) अंगातील बारीक ताप
१४) स्वत:चे
१६) मध्यस्थ
१८) वेळ घालविणे
२०) पर्ण
२१) स्वीकार न करणे
२३) तूर डाळीचे गरगट
२५) चलनवलन
२६) नोकरी न करणारा, निरोपयोगी
२७) दागदागिने
२९) भेग वाढविणारी खुंटी
३२) सुसंस्कृत
३५) वसुंधरा
३६) पालिकेतील लोकप्रतिनिधी
३७) एक पालेभाजी, सांभाळणारा
३८) कबूतर
४०) हजार किलो
४१) सज्जन, प्रामाणिक
४२) जेवणे
४३) नवाकोरा
४४) मागे लागलेले शुक्लकाष्ठ
४६) रमापती
४७) थडगे, कबर
४८) वर्ण
५३) मंत्रीमंडळ
५६) निर्लज्ज
५८) व्यसन, नाद
६१) एक चर्मवाद्य
६२) पोपट
६३) कर्ज
६४) हट्ट, दुराग्रह

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बा | व | टा | | क | | म | धु | क | र | | भा | क | र |
| र | जा | | स | मा | ई | क | | स | वि | स्त | र | | क्ष |
| दा | | ध | व | ल | | रं | ग | | वा | | त | ब | क |
| न | व | नी | त | | उ | द | र | भ | र | ण | | र | |
| | द | | | रा | मा | | ज | | | | आ | वा | ज |
| ज | न | मा | न | स | | स | वं | ग | डी | | य | | |
| व | | क | स | | प | रा | त | | र | ज | त | प | ट |
| स | व | ड | | प | प | ई | | रा | | ड | | द | |
| | स | | पा | | न | त | म | स्त | क | | म | क | र |
| अ | ति | श | य | | स | | लू | | ढ | गा | ळ | | ट |
| | गृ | | ल | ता | | ह | ल | वा | ई | | व | खा | र |
| मो | ह | न | | ले | ख | क | | र | | क | ट | क | ट |
| द | | वा | न | वा | | ना | य | क | | ळ | | री | |
| क | पा | र | | र | ज | क | | री | त | स | र | | जू |

**पाच दशकांची संसदीय राजकारणाचा अनुभव असलेले फारच मोजके नेते भारतात आहेत. त्यात शिवराज पाटील चाकूरकर हे एक होते. लिंगायत समाजाची महाराष्ट्रातील लोकसंख्या सुमारे ऐंशी लाख असली, तरी ती विखुरलेली आहे. तसा तो अल्पसंख्य समाज म्हणावा लागेल. या समाजाचे असलेल्या शिवराज पाटील यांनी प्रदीर्घ काळ राजकारणात जम बसवणे हा त्यांच्या संघटनकौशल्याचा आणि त्यांच्या पक्षावरील निष्ठेचा ही परिपाक होता. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष तसेच लोकसभेचे अध्यक्ष होणारे ते एकमेव व्यक्ती आहेत. यावरून त्यांच्या कर्तृत्वाची कल्पना येते.**

# शालीन, सुसंस्कृत नेता

प्रा. अशोक ढगे

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहमंत्री शिवराज पाटील यांनी त्यांच्या जन्मभूमी लातूरमध्येच अखेरचा श्वास घेतला. लातूर जिल्ह्याने महाराष्ट्राला दोन मुख्यमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्री दिला. सक्रिय राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर शिवराज पाटील चाकूरकर ते दिल्लीत स्थायिक झाले होते. एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी लातूरला आले असताना त्यांची तब्येत खालावली. त्यांना उपचारासाठी दिल्लीला हलवण्याची तयारी सुरू होती; परंतु त्यांनीच नकार दिला. घरीच उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालावली. १९७० च्या दशकात त्यांनी राजकारणात प्रवेश केला. लातूरचे नगराध्यक्ष, आमदार ते खासदार, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, लोकसभेचे अध्यक्ष, राज्यपाल आदी विविध पदे त्यांनी भूषवली. मराठी, हिंदी, इंग्रजी अशा भाषांवर त्यांचे प्रभुत्त्व होते. विविध संसदीय समित्यांतील कामकाजावर त्यांचा प्रभाव होता. शेवटच्या श्वासापर्यंत काँग्रेसच्या राजकारणात ते सक्रिय राहिले.

राजकारणात त्यांनी श्रीमंतीपासून श्रीमंतीपर्यंत प्रवास केला आणि राजकीय यशाच्या शिखरावर पोहोचले. त्यांना स्वच्छ प्रतिमेचे नेते मानले जाते.१९७३ ते १९८० पर्यंत त्यांनी महाराष्ट्रातील लातूर ग्रामीण मतदारसंघातून आमदार म्हणून काम केले. १९८० नंतर त्यांनी लातूर संसदीय मतदारसंघातून अनेक वेळा निवडणूक जिंकली आणि लोकसभेत पोहोचले. शिवाय, त्यांनी केंद्रात मंत्री म्हणून काम केले आणि राज्यपाल म्हणूनही काम केले. शिवराज पाटील यांची कौटुंबिक पार्श्वभूमी शेतकऱ्याची होती. मध्यम वर्गीय कुटुंबातून पुढे येऊन स्वकर्तृत्वावर त्यांनी मजल मारली. गांधी कुटुंबावरची अविचल निष्ठा आणि कोणत्याही गटबाजीत न रमणारे हे त्यांचे वैशिष्ठ्य होते. अतिशय स्वच्छ चारित्र्य ही त्यांची आणखी एक जमेची बाजू. चाकूरने महाराष्ट्राला एक शिवाजीराव निलंगेकर यांच्यासारखा मुख्यमंत्री आणि शिवराज पाटील यांच्यासारखा गृहमंत्री देशाला दिला. शिवराज पाटील चाकूरकर यांचा जन्म साध्या शेतकरी कुटुंबात झाला. कुटुंबाची आर्थिक स्थिती मर्यादित असली, तरी शिक्षणाबाबत घरात नेहमी सकारात्मक वातावरण होते. लहानपणापासूनच शिस्त, मेहनत आणि प्रामाणिकपणा या मूल्यांचा त्यांच्या स्वभावावर खोलवर परिणाम झाला. ग्रामीण भागातील सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांनी शिक्षणाची वाटचाल केली; पण शैक्षणिक गुणवत्तेबाबत ते सदैव कटाक्षाने प्रयत्नशील राहिले. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण चाकूर तालुक्यातील स्थानिक शाळांमधून पार पडले. महाविद्यालयीन काळात त्यांना सामाजिक कामांची विशेष आवड निर्माण झाली. युवक मंडळे आणि विद्यार्थी संघटनांमध्ये काम करताना नेतृत्वाची ताकद त्यांच्यात विकसित झाली. ग्रामीण भागातील बेरोजगारी, पायाभूत सुविधांची कमतरता आणि शिक्षणात जाणवणाऱ्या अडचणी त्यांनी जवळून पाहिल्या. याच काळात समाजासाठी काहीतरी करायचे हे ध्येय त्यांच्या मनात घट्ट रुजले. उस्मानिया विद्यापीठातून विज्ञान विषयात पदवी आणि मुंबई विद्यापीठातून कायद्याचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश केला.

शिवराज पाटील यांनी १९६७-६९ दरम्यान लातूरचे नगराध्यक्ष म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी १९७३ ते १९८० पर्यंत लातूर ग्रामीण मतदारसंघातून आमदार म्हणून काम पाहिले. १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघ जिंकला आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये संरक्षण राज्यमंत्री म्हणून पहिल्यांदाच मंत्री झाले. १९८० ते १९९९ पर्यंत सलग सात वेळा लोकसभा जिंकून शिवराज पाटील यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर राष्ट्रीय राजकारणातही आपले स्थान निर्माण केले. त्यानंतर त्यांचे यशाचे शिखर उंचावत गेले. शिवराज पाटील यांचा राजकीय प्रभाव केवळ इंदिरा गांधींच्या सरकारमध्येच नव्हे, तर डॉ. मनमोहन सिंग सरकारमध्येही दिसून आला. इंदिरा आणि राजीव गांधी यांच्या सरकारमध्ये त्यांनी संरक्षण, वाणिज्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स आणि अवकाश राज्यमंत्री अशी महत्त्वाची पदे भूषवली. त्यानंतर, त्यांनी पी.व्ही. नरसिंह राव यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली यूपीए सरकार स्थापन झाल्यावर ते सर्वात शक्तिशाली मंत्री बनले. संरक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अणुऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश आणि महासागर विकास आदी मंत्रालयांची जबाबदारी त्यांनी सांभाळली. १९८३ मध्ये पाटील यांची 'सीएसआयआर इंडिया'चे उपाध्यक्ष म्हणून निवड झाली. त्यांनी संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, वित्त आणि संसद सदस्यांचे वेतन आणि भत्ते यासह विविध समित्यांवरही काम केले. राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये त्यांना कार्मिक आणि संरक्षण उत्पादन मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यानंतर त्यांनी नागरी विमान वाहतूक आणि पर्यटनाचा स्वतंत्र कार्यभार सांभाळला. त्यांनी लोकसभेचे आधुनिकीकरण, संगणकीकरण, संसदीय कामकाजाचे थेट प्रक्षेपण आणि नवीन ग्रंथालय इमारत यांना गती दिली. त्यांनी देशांतर्गत आणि परदेशात अनेक संसदीय परिषदांमध्ये भारताचे नेतृत्व केले. सभापती म्हणून काम करत असताना त्यांनी १९९२ मध्ये उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराची स्थापना केली.

त्यांनी संसद सदस्यांना माहितीचे वितरण, संसद ग्रंथालय इमारतीचे बांधकाम आणि संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये प्रश्नोत्तराच्या तासाचे थेट प्रक्षेपण यासारखे निर्णय त्यांनी घेतले. २००४ च्या लोकसभा निवडणुकीत शिवराज पाटील यांचा पराभव झाला, तरीही सोनिया गांधी यांनी त्यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवला. ते राज्यसभेवर निवडून आले आणि डॉ. सिंग यांच्या सरकारमध्ये त्यांना केंद्रीय गृहमंत्रालयाची जबाबदारी सोपवण्यात आली. तथापि, २००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यानंतर, त्यांनी सुरक्षेतील त्रुटींची नैतिक जबाबदारी स्वीकारून ३० नोव्हेंबर २००८ रोजी राजीनामा दिला. केंद्रीय गृहमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर आणि राज्यसभेचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर त्यांची पंजाबचे राज्यपाल म्हणून नियुक्त करण्यात आली. त्यांनी २०१० ते २०१५ पर्यंत पंजाबचे राज्यपाल म्हणून काम पाहिले आणि चंदीगड या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक म्हणूनही काम पाहिले. ते काँग्रेसच्या जाहीरनामा समितीचे अध्यक्ष होते.

शिवराज पाटील हे सत्य साई बाबा यांचे कट्टर अनुयायी मानले जातात. विविध मंत्रालयांमध्ये काम करणे आणि लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम करणे यासह सुमारे पाच दशकांचा संसदीय आणि प्रशासकीय अनुभव असलेले शिवराज पाटील हे भारतीय राजकारणातील एक महत्त्वाचे आणि ज्ञानी व्यक्तिमत्व होते. लातूरचे नगराध्यक्ष असताना त्यांनी येथील शैक्षणिक आणि इतर क्षेत्रात चांगला ठसा उमटवला. ते एक शालीन सुसंस्कृत पिढीतील नेते होते. व्यर्थ बडबड करणे, नाहक टीका करणे ते नेहमी टाळत. राजकीय मूल्य जपण्यात त्यांची हयात गेली. काँग्रेसच नाही तर विरोधकांमध्ये पण त्यांचे मित्र होते. राजकीय टीका टिप्पणी होत असली, तरी या मैत्रीत कधी अंतर आले नाही. त्यांनी टाऊन हॉलमध्ये ग्रंथालय उभारले. लातूरमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले. त्या वेळी अनेक दिग्गजांनी या ग्रंथालयाला आवर्जून भेट दिली. ते पंतप्रधानपदाच्या प्रमुख दावेदारांपैकी एक होते. देशाच्या राजकारणातील स्वच्छ, अभ्यासू आणि संयमी नेतृत्वासाठी ते ओळखले जात. त्यांच्या अनुभवी नेतृत्वाची, साधेपणाची आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीची ओळख आजही कायम आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामीण विकास आणि शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमांमुळे त्यांचे नाव चर्चेत आहे.

शांत स्वभाव, स्पष्ट बोलणे आणि सातत्याने कामाला प्राधान्य देणारी वृत्ती ही त्यांच्या नेतृत्वशैलीची ओळख मानली जाते. राजकारणात प्रवेश केलेल्या अनेक नव्या चेहऱ्यांमध्ये शिवराज पाटील चाकूरकर हे व्यक्तिमत्त्व वेगळे ठरते, कारण त्यांनी सत्ता किंवा पदापेक्षा कामाला अधिक महत्त्व दिले. एक विश्वासार्ह समाजनेते म्हणूनही त्यांची ओळख होती. भारतीय राजकारणातील स्वच्छ, प्रामाणिक आणि अभ्यासू नेत्याचे ते प्रतीक मानले जात. राज्यापासून दिल्लीतील सत्ता, केंद्रापर्यंत त्यांनी उच्च पदे भूषवली; पण तरीही त्यांनी कधीही आक्रमक राजकारण केले नाही. काँग्रेसकडून राष्ट्रपतिपदासाठी त्यांचे नाव निश्चित झाले होते, ऐनवेळी प्रतिभाताई पाटील यांचे नाव पुढे आल्याने त्यांची संधी हुकली होती. सर्वच पक्षात त्यांचा सन्मान होता.

लातूर येथे ते भाजपचे डॉ. गोपाळराव पाटील यांच्या विरोधात खासदारकीची निवडणूक लढवत होते. अटल बिहारी वाजपेयी यांची लातूरात सभा झाली होती. त्या वेळी वाजपेयी यांच्या तोंडून शिवराज पाटील 'अच्छे आदमी' है, असे विधान केले होते. ती निवडणूक पाटील यांनी जिंकली होती. राजकारणात कुरघोडी करणे, एकमेकांचे पाय ओढणे, पाठ फिरली की विरोधात बोलणे असे प्रकार काही नवीन नाहीत. त्याला शिवराज पाटील अपवाद होते. १९९१ ला नगरपालिका निवडणुकीत चाकूरकर यांना विरोध म्हणून विलासराव देशमुख यांनी काँग्रेसच्या विरोधात स्वतः मंत्री असताना उमेदवार देत राजीव मंच या नावाखाली निवडणूक लढली. काँग्रेसचे उमेदवार पाडले. एस. आर. देशमुख यांना नगराध्यक्ष केले. त्याच एस. आर. देशमुख यांना पुढे करून आजच्या राजीव गांधी चौक येथे बसवेश्वर यांचा पुतळा बसवण्याचे निश्चित झालेले असताना रातोरात एस आर देशमुख यांनी त्याठिकाणी राजीव गांधी यांचा पुतळा आणून बसवला आणि मोठा गोंधळ लातुरात झाला.

यात शिवराज पाटील चाकूरकर यांना लिंगायत समाजात बदनाम करण्याचा आणि त्या वेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीत चाकूरकरांना फटका बसावा असा हेतू होता. २००४ ला तर विलासराव देशमुख आणि गोपीनाथ मुंडे यांनी मिळून रूपाताई पाटील निलंगेकर यांना चाकूरकर यांच्या समोर उभा करून पराभव केला, हे जगजाहीर होते. अगदी लातूर शहरातील बाबासाहेब आंबेडकर पार्कवर झालेल्या कार्यक्रमात शिवराज पाटील चाकूरकर व्यासपीठावर असताना मुंडे यांनी मी आणि विलासराव देशमुख यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांना कसे लोकसभा निवडणुकीत पाडले, याची जाहीर कबुली दिली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून चाकूरकर यांनी एक शब्द आपल्या भाषणात काढला नाही. किंवा नंतरदेखील त्या निवडणुकीचा कोठे उल्लेख केला नाही. कोणाच्या विरोधात बोलणे, किंवा लूज टॉक करणे, अगदी आपल्या विरोधकांविषयी देखील अपशब्द काढणे हेदेखील चाकूरकर यांच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य राहिले.

**



# 'नियत- समाजातील विश्वासघाताचा वाढता कहर'!





श्री. धनंजय शेटये

आजच्या विकल होत चाललेल्या समाजव्यवस्थेत जर सर्वात मोठा आणि हृदयद्रावक बळी कोणी ठरत असेल, तर तो आहे 'विश्वासार्हता' आणि माणसा-माणसांतील निष्ठावंत 'नियत'! बदललेल्या जमान्यात, 'विश्वास' ही गोष्ट आता दोन आत्म्यांचे भावनिक बंधन राहिलेली नाही, ती निव्वळ एक स्वस्त आणि तकलादू आर्थिक व्यवहाराची 'डील' बनली आहे.

'सत्य' हे आहे की, सुमारे सत्तर टक्के लोक आपल्या वागणुकीतून हे सिद्ध करत आहेत की 'विश्वास' हा शब्द आता शब्दकोशातून हद्दपार होण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे.

**विश्वासघाताची सार्वत्रिक 'कीड'**

कुटुंब असो, मैत्रीचा घट्ट धागा असो, लग्नाच्या सप्तपदीतील वचने असोत, किंवा राजकीय सत्ता-समीकरणे; सर्वत्र 'विश्वासाचा' संपूर्ण दिवाळखोरपणा सुरू आहे! रक्ताच्या नात्यांपासून ते राजकारणाच्या सर्वोच्च शिखरापर्यंत - सर्वत्र फसवणुकीची पाळेमुळे इतकी खोलवर रुजली आहेत की, मूळ माणुसकीच सुकून गेली आहे.

मुलं आई-वडिलांच्या त्यागाला तिलांजली देत आहेत.

जिवलग मित्र 'जिव्हाळ्याची' पाठ मोडत आहेत.

प्रेमातील शपथा केवळ शब्दांचे फुगे ठरत आहेत.

**राजकारण.. निष्ठा नावाचे 'जुने चलन'**

राजकारणाचा खेळ तर उघडपणे चाललेला विश्वासघाताचा आणि अनैतिकतेचा नग्न बाजार बनला आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत, 'पैशांसाठी मत की मतांसाठी पैसे?' हा प्रश्न इतका विषारी बनला आहे की, सामान्य नागरिकाला खरा 'राजकीय हेतू' आणि 'व्यवहार' यातील अंतर ओळखणे निव्वळ अशक्य झाले आहे. निष्ठा, एकनिष्ठता, आदर्शवाद हे शब्द आता व्यवहारिक राजकारणाच्या 'तिजोरीत' असलेली जुनी, कालबाह्य चलने ठरत आहेत!

**'नीती-अनीतीच्या सीमारेषांचा विध्वंस...!!'**

पूर्वी देवाची, धर्माची, किंवा अदृश्य शक्तींची भीती माणसाला पापापासून रोखायची; पण आज...? आज कोणत्याही 'धाक' या संकल्पनेचा समाजातून संपूर्ण निःपात झाला आहे. आजच्या पिढीला शिक्षेची भीती नाही, कारण शिक्षा होईपर्यंत मनसोक्त 'सुखभोग' करून घेण्याची विकृत प्रवृत्ती बळावत चालली आहे.

**याचा थेट परिणाम..**

भ्रष्टाचार.... व्यवस्थेच्या प्रत्येक नसेत भ्रष्टाचाराची कीड खोलवर गेली आहे.

नैतिकतेचे पतन...पैशासाठी 'मूल्यांची' घाऊक दरात विक्री! गुणवत्तेला दुय्यम स्थान: आज योग्यता, पात्रता, गुणवत्ता या गोष्टी केवळ कागदावरील निरुपयोगी नोंदी ठरल्या आहेत.

**झटपट श्रीमंतीची 'अंधाधुंदी'!!**

नवतरुणाईत अल्पावधीत श्रीमंत होण्याचा आणि कुठल्याही मार्गाने पुढे जाण्याचा अंधारलेला 'ट्रेन्ड' वाढताना दिसतोय. कष्ट, मेहनत, नीतिमत्ता या संकल्पनांना फालतू आणि 'आउटडेटेड' समजण्याचे प्रमाण चिंताजनक आहे. जेव्हा नीती आणि अनितीची सीमारेषा पुसली जाते, तेव्हा समाज विकृत मार्गांनी पुढे सरकतो.

**'मतांचा 'बाजार' आणि लोकशाहीची 'बोली'.**

लोकशाहीचा पाया उखडणारे हे 'मतांचे बाजार' किती निंदनीय आहेत! निवडणुकीच्या तोंडावर मतांचा बाजार सजतो आणि मतदार काहीशा किरकोळ पैशांसाठी आपली मूल्ये, विचार आणि भविष्यातील विकासाचा 'मताधिकार' विकायला सिद्ध होतो. पाच वर्षांसाठी 'पाचशे रुपयांचा मोबदला' ते आजचा 'दहा ते पंधरा हजारांचा दर'... मतदाराच्या किंमतीत वाढ झाली, पण नीतीत नाही! याचा अर्थ काय? कुटुंबातील बेरोजगारी, विभागातील आरोग्य सुविधांचा अभाव, शैक्षणिक उन्नतीची दुरवस्था... हे सगळे प्रश्न एका बिर्याणीच्या पाकिटासमोर आणि पन्नास रुपयांच्या पेट्रोलसमोर गौण ठरतात! आपणच विकलेल्या मतांचा परिणाम आपणच का भोगायचा?

ही आहे या चक्रव्यूहाची मूळ समस्या. निकृष्ट, अयोग्य आणि गुणहीन लोक भ्रष्ट व्यवस्थेच्या माध्यमातून सत्ता, नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांवर कब्जा मिळवत आहेत. खरी गुणवत्ता आणि मेहनत करणारी तरुणाई बाहेर उभी राहते आणि मग आपण 'व्यवस्थेविरुद्ध' आवाज उठवतो. पण विसरला जातो तो मूलाधार: या स्थितीला खतपाणी आपणच घातले आहे.

**'नियत बिघडली की समाज बिघडतो'.**

जेव्हा पैशाच्या मोहात माणूस इतका अडकतो की 'मूल्यं, कर्तव्य, निष्ठा' या संकल्पना कालबाह्य ठरतात, तेव्हा समाज बदलत नाही; समजुतींची 'नियत' विकलांग होते! आज कोणत्याही क्षेत्रात 'सच्चाई' शोधताना खोटेपणाच्या खाचखळग्यात अडखळत चालावे लागते आहे. राजकीय 'निष्ठा' पूर्णपणे लयास गेली आहे. पैसा हे सत्ता स्थापनेचे एकमेव माध्यम बनले आहे. मुठभर लोकांच्या हाती सत्ता केंद्रित झाल्यावर मनमानी कारभार होणारच! आज देशात अशिक्षित, भ्रष्टाचारी राजकारणकर्ते सुशिक्षित आणि बुद्धिमान नागरिकांना 'विकत' घेत आहेत.

**शेवटचा आणि धारदार वार**

जोपर्यंत सळसळत्या, जहाल आणि बेधडक विचारांची तरुणाई राजकारणाच्या या घाणेरड्या दलदलीत उतरून सकारात्मक बदलासाठी संघर्ष करत नाही; तोपर्यंत ही 'बदललेली नियत' आणि विश्वासघाताचा 'कहर' असाच वाढत राहील.

यापुढे मताधिकार विकणार नाही, तर तो देशाच्या प्रगतीसाठी, रोजगारासाठी, आरोग्यासाठी आणि शैक्षणिक उन्नतीसाठी 'निवडणूक' करेन, ही शपथ घेणे गरजेचे आहे! **




निलेश साठे

मला मनापासून वाटतं आपण कोणीतरी मोठं व्हावं. सेलिब्रिटी व्हावं. रस्त्याने चाललं तर पब्लिकचा अवतीभवती घोळका तयार व्हावा. आपली एक वेगळीच छाप असावी असं मला नेहमी वाटतं. त्यासाठी मी नाना प्रयत्न करत असतो. एकदा माझ्या वाचनात आलं होतं की आपली जशी संगत असते तसेच आपण बनतो. तुम्ही पाच करोडपती लोकांच्या संगतीत राहाल तर सहावा करोडपती तुम्ही असणार. तुम्ही पाच व्यवसायिकांच्या संगतीत राहाल तर सहावा व्यावसायिक तुम्ही असाल. तुम्ही शरीर बळकट करणाऱ्या पाच व्यायामपटू सोबत राहल तर सहावा व्यायामपटू तुम्ही असाल. हे वाक्य माझ्या मनाला खूपच भिडलं. आणि मी तसा प्रयत्नही करू लागलो.

मी प्रथम करोडपती लोकांच्या सानिध्यात येण्याचा प्रयत्न केला. पण यांनी मला त्यांच्यात येऊच दिलं नाही. त्यांच्या घोळक्यात शिरण्याचा प्रयत्न केला तर मला ते असा कोपर मारायचे चल हो मागे, चल हो मागे. एकानं तर लाथ पण घातली. चल हो तिकडे म्हणत,तसा लांब कुठेतरी जाऊन पडलो. मी तो नाद सोडला आणि गरीबाच्या घोळक्यातून मिसळलो. इथं काहीच टेन्शन नाही. इथे सगळे आपल्यासारखेच आपल्यातलेच. अरे आ ना भाई चल ना आज पार्टी करते हैं.

अरे पण माझा पगार नाही झाला. तेरे को बोला क्या मै कुछ, बोला क्या? तू खाली चल. मग आम्ही मस्त एन्जॉय करतो. ज्याचा पगार होईल त्यानं त्या दिवशी पार्टी द्यायची. भलेही पाचव्या दिवशी अरे यार पाचशे रुपये दे ना.खर्चाचे वांदे आहेत रे एकदम. गॅस पण संपला यार टायमाला. मग आम्ही ह्याच्या त्याच्याकडून उसनवारी घेऊन महिना कसा तरी काढतो. पगार झाला की ज्याच घेतलं त्याला देऊन टाकायचं हा आमचा लिखित नियम.

परिस्थिती सुधारावयाची आहे तर काहीतरी वेगळं करावं लागणार होतं हे मनात होतच. चला म्हटलं काहीतरी व्यवसाय करून पहावा. मग व्यवसायिकांच्या गर्दीत शिरण्याचा प्रयत्न केला. आपली सुरुवात शून्यातून. कशाचं काहीच माहित नाही. एकाला विचारलं अरे भाई तू माल कुठून आणतोस? तो आपला सख्खा भाऊबंध. माल भलेही मस्जिद बंदर वरून आणत असेल पण मला सांगणार, अरे भाई आपला माल डायरेक्ट सुरत वरून येतो ना. अर्धा माल दिल्लीवरून पण येतो. आपली ओळख आहे ना रे तिकडं. आज बिजनेस करतोय काय? पंचवीस तीस वर्षाची ओळख आहे आपली.

अरे यार मला भी छोटा मोठा व्यवसाय करायचा होता.

अरे भाई कशाला या झंझट मध्ये पडतो. गप नोकरी करतोय तिकडेच कर सुखा सुखी रहा. तुला काय वाटलं हे सहज मिळतंय. हे जे मोठं घर गाडी बघतोय ते काय असंच आलंय? पहाटे तीनला उठून स्टेशन ला जायला लागतं माल आणायला. फिर ये बीएमसी वाले का टेन्शन पोलीस वाले का टेन्शन और ये छपरी लोग घुमते है उसका टेन्शन अलग. और इतना सब झंझट मारी करके बचता क्या है? कुछ बचता नही भाई. मै कैसा कैसा कर रहेलाय. कभी कभी खाने के भी वांदे हो जाते है. टाईम ही नही मिलता. उपर से तेरे पास भांडवल है क्या? चल भांडवल कैसे भी कहा से भी तू लायेगा पण तेरे पास जगाह है क्या? नॉलेज है क्या? तू ये लोग को मॅनेज कैसे करेगा.? फिर तेरा धंदा चलेगा तो ठीक नही तो तू तो गया ना बेटा. जा अपना नोकरी कर ले और खुश रह जा.

मग मी पुन्हा माझ्या मित्रांकडे येतो. एक जण म्हणतो उद्या आपण पिकनिकला चाललोय. शनिवारी संध्याकाळी निघायचं आहे शनिवारची रात्र काढायची रविवारची रात्र काढायची सोमवारी आपण आपल्या कामावर.

किती किती काढलेत? मी.

तुला काय दुबईला जायचंय काय? पाचशे रुपये खिशात ठेव फक्त. इथेच जायचंय कर्जतला. मस्तपैकी डोंगरदऱ्यातून फिरू कोंबडी कापू एक दिवस नदीतलं मासे खाऊ रातभर खाऊ पिऊ मस्त धमाल करू.

आमची तब्येत म्हणजे हाडाची काडं आन बो....... बोटं तिडतीडीत. मग म्हटलं शरीर कमवायचं. मोठ्या उत्साहाने व्यायाम शाळेत नाव टाकलं. व्यायाम शाळेत प्रवेश केला अन सगळी व्यायाम शाळाचं हसायला लागली. तिथले सगळे घामाघुन झालेले बॉडी बिल्डर जो तो माझ्याकडेच पाहत होता . मी आपले डंबेल उचलले तेवढ्यात पाठीमागून आवाज आला,

ए.भाई ए. मी मारतोय ते.

मी डंबेल खाली ठेवले आणि बाजूला उभा राहिलो. तसा दुसरा एक आवाज आला.

अरे ए बाजूला हो ना. त्यानं मला दरडावत आपलं पिळदार शरीर आरशात पाहिलं. मी गेलो एका कोपऱ्यात आणि उठा बशा मारायला सुरुवात केली. तेवढ्यात एक मास्तर आले आणि म्हणाले.

पहिला दिवस आहे ना. उठा बशा नको मारू. तिकडे त्या बाजूला जा. आणि दोनशे सूर्यनमस्कार मार.

मी मोठा इमानदार हळूहळू करत दोनशे सूर्यनमस्कार मारले. पहिल्याच दिवशी. काहीच वेळात जाणवलं की मला माझा हात रुमाल सुद्धा उचलता येत नाही. घरी जाऊन जो झोपलो तीन दिवसानंतरच उठलो. पुन्हा कधीही व्यायाम शाळाचं तोंड पाहिलं नाही.

इकडे आमची पेदाड गँग खाऊन पिऊन मस्त. व्यायाम नाही आणि काही नाही. काम करत असतानाच शरीराची जी काही धावपळ होईल तोच त्यांचा व्यायाम खाण्यापिण्याचा कुठलाही नियम पाळत नाहीत. कोणत्याही वेळी काहीही खातात. सुट्टीचा दिवस मस्त एन्जॉय करतात.

सालं... कधी कधी वाटतं हे आपण गरीब आहे तेच खूप बरं आहे. मुक्त मनाने कुठेही फिरू शकतो. कितीही वेळ टाईमपास करू शकतो. आपल्याला कोणी काही विचारतही नाही. कधी कधी विचार येतो आज जसं आपण चौपाटीला दोन दोन चार चार तास निवांत बसू शकतो तसे अमिताभ बच्चन बसू शकतील का. मुकेश अंबानी बसू शकतील का. भले आपल्याकडे पैसा कमी आहे पण स्वातंत्र्य किती आहे आपल्याला. बस की मग अजून काय पाहिजे. सुख आहे समाधान आहे हा थोडासा गरजा कमी कराव्या लागतात आणि कधीतरी मन मारून जगावं लागतं पण त्यातही थोडी मजा आहेच की. **

# माय एक आणा दे, बंद होणार...?

**मुंबईसारख्या शहरात भिकाऱ्यांच्या अनेक टोळ्या सक्रिय आहेत, हे पोलिसांनी केलेल्या विविध छाप्यांमध्ये उघड झाले आहे. महिला आणि मुलांचा वापर भीक मागण्यासाठी केला जातो. लहान मुले आणि महिलांच्या मानवी तस्करीसह अनेक सेक्स रॅकेट भीक मागण्याच्या धंद्यात आहेत. त्यामुळे या व्यवसायाला गुन्हेगारी पार्श्वभूमीची किनार आहे. म्हणूनच या समस्येचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन राज्य सरकारकडून हा कायदा कठोर केला जात असेल, तर त्याचे स्वागतच करायला हवे.**





**शिवाजी चौगुले**

भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, उघड्या नागड्यांना वस्त्र, बेघरांना आसरा हेच पुण्यकर्म आहे, अशी संत गाडगे महाराज यांची शिकवण. प्राचीन काळापासून भारतात भिक्षा मागणे हे आजच्यासारखे तुच्छ मानले जात नव्हते, ती धार्मिक आणि आध्यात्मिक जीवनाशी निगडित एक प्रथा म्हणून स्वीकारली गेली होती. वैदिक काळात आणि त्यानंतर बौद्ध आणि जैन धर्माच्या आचरणानुसार, तपस्वी आणि भिक्षू यांना भिक्षा देण्यासाठी गृहस्थांनी उदार भावनेने दिलेले दान म्हणजेच भिक्षा हे पुण्य मानले जात असे. जनतेच्या मनात बिंबलेल्या पुण्यकर्माच्या संस्कारामुळेच आजही रस्त्यातून जाताना कुणी मदतीसाठी हात पुढे केला, तर त्याला पैसे किंवा वस्तुरूपात मदत करण्याची भावना असते. मात्र, याच शुद्ध भावनेचा गैरफायदा करून भिक्षेचा धंदा करणाऱ्या टोळ्या महाराष्ट्रातच नव्हे; देशातील अनेक राज्यात कार्यरत झाल्या आहेत. हा गैरप्रकार रोखण्यासाठी देशातील २२ राज्यांमध्ये भिक्षेकरी विरोधी कायदा अस्तित्वात आहे. भारतात आजही भीक मागणे हा सामाजिक गुन्हा मानला जात नाही. तथापि, बॉम्बे प्रिव्हेंशन ऑफ बेगिंग ॲक्ट, १९५९ आणि इतर राज्यांमधील तत्सम कायदे स्थानिक प्राधिकरणांना सार्वजनिक ठिकाणी भीक मागताना आढळलेल्या व्यक्तींना ताब्यात घेण्याची आणि त्यांचे पुनर्वसन करण्याची परवानगी देतात.

भारतीय दंड संहितेनुसार भीक मागण्याच्या उद्देशाने अल्पवयीन मुलाचे अपहरण करणे किंवा त्यांना अपंग करणे हा गुन्हा आहे. भिक्षा मागणे म्हणजे काय आणि अल्पवयीन म्हणून कोण पात्र आहे हे देखील या कलमांनुसार परिभाषित केले आहे. भीक मागण्यासाठी मुलाला कामावर ठेवणे किवा त्याचा वापर करणे हे बेकायदेशीर आहे. या कायद्यामुळे पोलिसांनी भीक मागायला लावणाऱ्या अनेक टोळ्यांचा पर्दाफाश केला आहे. भिक्षेकरी विरोधी कायद्यामुळेच आतापर्यंत अनाथ मुलांचे झालेले शोषण रोखता आले आणि मुलांवरील अत्याचारापासून त्यांना संरक्षण मिळाले, ही बाब नव्याने सांगण्याची गरज नाही.राज्यात 'भीक' या शब्दावरून पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्रात भीक मागण्यावर प्रतिबंध घालणारे विधेयक बुधवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. हे विधेयक सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे, असा दावा सरकारच्यावतीने करण्यात आला असला, तरीही सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या आमदारांनी विधेयकांतील 'महारोगी' या शब्दावर आक्षेप नोंदवला. विधेयकाबाबत सदस्यांना दिलेल्या माहिती पुस्तिकेतील स्पष्टीकरण अपुरे आणि गोंधळात टाकणारे आहे, अशी तक्रार सभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडे नोंदविण्यात आली. त्यामुळे विधेयकातील त्रुटी आणि सदस्यांच्या सूचनांवर चर्चा करण्यासाठी शनिवारी सभापतींच्या दालनात याबाबत विशेष बैठक बोलावली आहे. या तांत्रिक मुद्द्यांवरील चर्चेनंतर विधेयकांचे कायद्यात रूपांतर होईल, यात शंका नाही. देशपातळीवर विचार केल्यास, भीक मागण्याला गुन्हा ठरवणारा कोणताही केंद्रीय कायदा नाही. परंतु, काही राज्यांनी भीक मागण्यावर बंदी घालणारे कायदे केले आहेत. १९५९ च्या मुंबई भीक प्रतिबंधक कायद्यामुळे पोलिसांना भिकाऱ्यांना अटक करण्याचे अधिकार दिले गेले आहेत. पहिल्या गुन्ह्यासाठी ३ वर्षांपर्यंत आणि दुसऱ्या गुन्ह्यासाठी १० वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. भीक मागणे बेकायदेशीर कृत्य म्हणून घोषित करत, नवी दिल्ली, गुजरातसह अन्य काही राज्यांनीही हाच कायदा स्वीकारला. मात्र, राजस्थानने एक अनोखा कायदा केला. भिकाऱ्यांना भीक मागण्याऐवजी त्यांचे पुनर्वसन करण्यास प्रोत्साहन देत आहे. २०१२ साली लागू करण्यात आलेल्या कायद्याद्वारे भिकाऱ्यांना शिक्षा करून तुरुंगात टाकण्याऐवजी त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा राजस्थान सरकारचा उद्देश होता. तो किती सफल झाला हा वेगळा विषय ठरतो.

राज्याला भिकारीमुक्त करण्यासाठी भिकाऱ्यांना अटक करण्याची मोहीम अनेक वर्षे राबवली जाते. 'महाराष्ट्र भिकारी प्रतिबंधक कायदा, १९६०' अंतर्गत भिकाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई केली जाते. या अटक कारवाईत ८० टक्के भिकारी त्यांच्या असहाय्यतेमुळे नव्हे तर व्यवसाय म्हणून भिक्षा मागत आहेत, अशी धक्कादायक बाब पुढे आली आहे. मुंबईसारख्या शहरात भिकाऱ्यांच्या अनेक टोळ्या सक्रिय आहेत, हे पोलिसांनी केलेल्या विविध छाप्यांमध्ये उघड झाले आहे. महिला आणि मुलांचा वापर भीक मागण्यासाठी केला जातो. लहान मुले आणि महिलांच्या मानवी तस्करीसह अनेक सेक्स रॅकेट भीक मागण्याच्या धंद्यात आहेत. त्यामुळे या व्यवसायाला गुन्हेगारी पार्श्वभूमीची किनार आहे. म्हणूनच या समस्येचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन राज्य सरकारकडून हा कायदा कठोर केला जात असेल, तर त्याचे स्वागतच करायला हवे. दुसऱ्या बाजूने विचार केला, तर भिक्षा मागणे ही एक सामाजिक आणि आर्थिक समस्या आहे; जी समाजात खोलवर रुजलेली आहे. धर्माच्या परिघावर असलेले अनेक समाजघटकांची उपजीविका ही भिक्षेवर आधारित आहे. त्यात पोतराज, डोंबारी, देवदेवतांच्या नावाने घरोघरी भिक्षा मागणारे सुद्धा आलेच. त्यात या कायद्यामुळे अडचण होणार नाही ना? ही बाबही तपासून पाहावी लागणार आहे. मुंबईसारख्या शहरात ग्रामीण भागातून मुली, स्त्रिया रेल्वे स्थानक परिसरात पोट भरण्यासाठी भीक मागताना दिसतात. त्यामुळे, रोजगाराचा अभाव, शिक्षण, गरिबी आणि इतर विविध कारणे त्यात लपलेली आहेत. याचाही विचार करण्याची गरज आहे. 'भिक्षेकरी कायदा' नावाने विधिमंडळात मंजूर झालेला एक जुना कायदा आहे, जो महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ म्हणून ओळखला जातो; या कायद्यामुळे भीक मागणे हा गुन्हा ठरतो आणि भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाला अधिकार मिळतात. त्यांना ताब्यात घेणे, प्रशिक्षण देणे व रोजगार देणे यांसारख्या तरतुदींचा समावेश त्यात आहे.

हा देशातील पहिला भिक्षा प्रतिबंधक कायदा असून भिकारी आणि भिक्षा देणारे दोघेही यात गुन्हेगार ठरतात. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या सुधारित कायद्यामुळे भीक मागण्याच्या नावाखाली टोळ्या चालविणाऱ्यांना लगाम बसला आणि देशाचं उभं हणारं 'दरिद्री' हे चित्र रोखलं गेलं तरी खूप झालं.

**

# 'फिनिक्स' अक्षय

# अक्की




"अक्की" हे संतोष परांजपे लिखित पुस्तक पुण्याच्या सकाळ मीडियाने, देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला सुप्रसिद्ध अभिनेता, दिग्दर्शक महेश मांजरेकर यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. अक्षय आणि महेश यांची २०१९मध्ये प्रथम भेट झाली. त्याच्या विलक्षण आजारामुळे, त्यांचे लक्ष वेधले गेले. त्यांच्या मते, "हे पुस्तक केवळ अक्षयच्या संघर्षाची गोष्ट नाही. तर प्रत्येक कुटुंबाची कथा मांडते. हे कुटुंब आपल्या प्रिय माणसांसाठी झगडते, त्यांना उभं करण्यासाठी आपलं सगळं काही पणाला लावते." शेवटी ते लिहितात, 'हे पुस्तक सगळ्यांनी वाचलं पाहिजे. कारण ही केवळ अक्षयच्या जीवनाची गोष्ट नाही, तर संघर्षातून मार्ग काढणाऱ्या प्रत्येकाच्या जिद्दीची कहाणी आहे. परांजपे कुटुंबाने दिलेली शिकवण आपल्या सर्वांसाठीच एक प्रेरणा आहे.'

पुस्तक परीक्षण
प्रा. शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

१० ऑक्टोबर, १९९५ रोजी अक्षयचा जन्म झाला. त्याच्या जन्माने त्याच्या आई-वडिलांना आणि आजी आजोबांना अतिशय आनंद झाला. त्याच्या बाललीला पाहत सर्व रमून गेले होते. अक्षय साडेतीन वर्षांचा असताना त्याला अचानक,१०४ डिग्रीपर्यंत ताप आला. पाच दिवसानंतर ताप अचानक गेला. नंतर सर्वजण, त्यांच्या दैनंदिन कामकाजात व्यग्र झाले होते. त्यानंतर ६ डिसेंबर २००१ रोजी अक्षयला 'आकांक्षा' ही बहीण झाली. काही काळानंतर अक्षयच्या शाळेतून निरोप आला की, अक्षयला नीट ऐकू येत नाही. डॉक्टरना दाखवल्यावर अक्षयला श्रवण यंत्रांशिवाय ऐकू येणार नाही हे समजले. त्यानंतर अक्षयचे शिक्षण सुरू होते. २०१० मध्ये अक्षय दहावीला असताना, पुन्हा आजारी पडला आणि त्याला विल्सन हा, अत्यंत दुर्मीळ आजार असल्याचे समजले. अनेकांच्या प्रयत्नांनी, अंबानी रिसर्च सेंटरमध्ये तपासण्या होऊन त्याचे औषधोपचार सुरू झाले. त्यासाठी त्याच्या आईवडिलांना अक्षयसह मुंबईला वेळोवेळी जावे लागत होते. मुंबईतील नातेवाईकांनीही अक्षयच्या उपचारांसाठी मोलाची मदत केली. २०११ ते २०१४ हा कालावधी, मुख्यत्वे अक्षयच्या आयुष्यातील अतिशय वाईट होता. २०१४ नंतर अक्षयमध्ये बऱ्यापैकी सुधारणा झाली. दैनंदिन महत्त्वाची कामे तो स्वतः करू लागला. जी कामे आधी घरातील सर्वांच्या मदतीने करावी लागत होती. २०१२ मध्ये अक्षयच्या वडिलांनी त्याला संगणक घेऊन दिला. संगणकावरील विविध गोष्टी अक्षय प्रामुख्याने स्वप्रयत्नाने शिकला. संगणकाच्या आधारे त्याने अनेक मित्र जोडले, पुस्तके वाचली. अक्षय १७ वर्षांचा झाल्यावरही, त्याच्या आजारपणामुळे त्याला चालता येत नव्हते. त्याच्या वडिलांना त्याला मुंबईला उपचारांसाठी जाताना, त्याला लहान मुलासारखे पाठीवर उचलून न्यावे लागत होते. आजूबाजूचे लोक टकामका पाहत, मात्र कोणीही मदत करायला पुढे येत नव्हते. फक्त तुझे आईबापच हे सर्व करणार आहेत. याची जाणीव ठेव असे त्याला, वडील सांगत असत. बारावीची परीक्षा अक्षयने बाहेरून दिली. त्यावेळीही बारावी परीक्षेसाठी बोर्डाचा अडसर कसा निर्माण झाला हे वाचून वाचकाला शासकीय कारभारातील गलथानपणा जाणवतो आणि त्यामुळे एका अपंग तरुणाला कसा त्रास झाला याची दुःखद जाणीव होते. आजारपणामुळे अक्षयची चार शैक्षणिक वर्षे फुकट गेली होती. बारावी परीक्षा अक्षय उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाला. कॉलेजमधील दिवसांमध्येही त्याने उत्तम यश प्राप्त केले. याच काळात त्याला प्रेमभंगाचे दुःख सहन करावे लागले. त्याविषयीही त्याच्या वडिलांनी सविस्तरपणे लिहिले आहे.

अक्षयच्या फोटोग्राफीच्या छंदाला त्याच्या आजोबांनी प्रोत्साहन दिले. त्याला उत्तम, महागडा कॅमेरा घेऊन दिला. सतत संपूर्ण शरीर हलत असूनही फोटो काढण्यासाठी अक्षय स्थिर होत असे. त्याने फोटोग्राफी कलेत आपली प्रगती साधली. त्याची अप्रतिम छायाचित्रे पाहून त्याला विविध चित्रपट, नाट्यसृष्टीतील अभिनेत्यांनी प्रोत्साहन दिले. घरातील लोकांच्या प्रोत्साहनातून अक्षयने पुण्याला ब्लॉक घेतला आणि स्टुडिओ स्थापन केला. या धडपडीच्या काळातच, अक्षयच्या आईला लिम्फोमा कॅन्सल झाला. दीर्घकाळ औषधोपचार घेतल्यानंतर अक्षयची आई बरी झाली. अक्षयनेही त्याच्या आयुष्याचे उद्दिष्ट निश्चित केले. त्याचे जीवन हे कॅमेरा आणि फोटोमय झाले आहे. संपूर्ण देह हलत असतानाही, फोटो काढण्यासाठी मात्र त्याला एक क्षण स्थिर होण्याचे वरदान लाभले आहे. अक्षयने आपल्या जीवनाविषयी स्वतंत्रपणे लिहिले आहे. त्यामधून त्याची सकारात्मक विचारसरणी दिसून येते. ऐकणे आणि बोलणे या दोन महत्त्वाच्या क्रिया त्याच्या आयुष्यातून वजा झाल्या. त्याचे बाबा, आई आणि धाकटी बहीण, आकांक्षा यांच्यामुळेच तो आजच्या अवस्थेपर्यंत आल्याची त्याला जाणीव आहे. अजूनही त्याला दररोज तीन गोळ्या घ्याव्या लागतात. फोटोग्राफीतील आपले कौशल्य दाखविण्याची संधी त्याला पुण्यामध्ये कशी प्राप्त झाली हे त्याने सविस्तरपणे स्पष्ट केले आहे. अक्षयविषयी त्याच्या आईने, त्याची धाकटी बहीण आकांक्षा आणि आजोबा, अन्य नातेवाईक, मित्र यांनी स्वतंत्रपणे लिहिले आहे. त्यामधून अक्षयच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू वाचकांसमोर उलगडतात. मैत्र जीवांचे, या भागात अक्षयचे चाहते आणि मित्र यांनी, त्याच्याबद्दल आपले मनोगत मांडले आहे. त्यामध्ये सचिन पिळगावकर, मुरलीधर मोहोळ, प्रवीण तरडे, वैभव जोशी, गुरु ठाकूर, संदीप पाठक, श्रीरंग देशमुख, भाऊ कदम, शरद पोंक्षे यासारख्या मान्यवरांचा समावेश आहे. अक्षयच्या शिक्षिका, डॉ. अलका मांडके यांचे अक्षयविषयीचे लेख वाचनीय झाले आहेत.

अक्षयविषयी शेवटी डॉ. अन्नू अग्रवाल यांनी लिहिलेला, सविस्तर इंग्रजीतील लेख, अक्षयच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू व्यक्त करतो. तसेच विल्सन या आजाराविषयी सविस्तर विवेचनही करतो. अक्षयला झालेल्या दुर्मीळ आजारामुळे, तसेच परांजपे कुटुंबीयांवर वेळोवेळी आलेल्या विविध संकटांमुळे, ते विविध प्रकारचे आध्यात्मिक उपाय करतात. बाबा, महाराज यांना शरण जातात. मात्र वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक संशोधनामुळे आणि मुंबईतील अंबानी हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेल्या सुयोग्य उपचारांमुळे अक्षय आणि त्याची आई, दोघेही शारीरिक दुखण्यातून वाचले आहेत, याची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. हे पुस्तक सर्वच वाचकांना प्रेरणा देणारे आहे. शारीरिक व्याधी, अपंगत्व या सर्वांवर जीवनध्येय साध्य करण्याच्या तीव्र इच्छेने प्रेरणा प्राप्त झालेली व्यक्ती कशी मात करू शकते, याचे दर्शन या पुस्तकातून होते आहे. पुस्तकातील विविध कृष्णधवल छायाचित्रे अक्षयच्या जीवन कहाणीला पूरक ठरतात. पुस्तकाचे कव्हर वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामधून अक्षयच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू स्पष्ट होतात.

**

**पुस्तकाचे नाव : अक्की**
**लेखक : संतोष परांजपे**
**प्रकाशक : सकाळ मीडिया प्रा.लि. पुणे**
**८१५९८८१५/८८८८४९०५०**
**प्रथमावृत्ती : जून २०२५**
**पृष्ठे : १७४, मूल्य : रु.२९९/-**

# जंगलं निर्माण करण्याची गरज?

आज बिबट्या आला, बिबट्या आला म्हणून दहशत आहे. बिबट्या कुठेही पाहायला मिळतोय. गावात, शहरात आणि कुठेही. कारण जिथे चिंता आहे. तिथे चीता येणारच आणि तो चिता रचणारच. हे सारस्वत सत्य आहे.

मृत्यू हे एक निमित्त आहे. ज्याचा जन्म होतो. त्याचं मरणही ठरलेलं असतंच. तसंच आता बिबट्याच्या हालचालीनुसार घडतांना दिसणं अशक्यप्राय गोष्ट नाही. माणसाचं मरण जर बिबट्यानं असेल आणि ते शहरातच असेल तर बिबट्या शहरात येणारच व त्या माणसाला मारणारच. कारण मृत्यू हा माध्यम शोधतो. कुणी आजारानं मरतात तर कुणी अपघातानं मरतात. कुणी आत्महत्या करुन मरतात तर कुणाचा खुन होतो. कुणी साप चावूनही मरतात तर कुणी साधा एखादा किडा चावल्यानं मरतात. त्यातच आता मृत्यूचं माध्यम हे बिबट्या ठरलंय. त्यामूळं घाबरण्याची गरज नाहीच. मात्र खबरदारी घेण्याची गरज आहे व त्या खबरदारीच्या दृष्टिकोनातून पावले उचलण्याची गरज आहे. ती पावलं म्हणजे जंगलतोड थांबवणं व जंगलं निर्माण करणं. ज्यातून बिबटे वा कोणतेही वन्यप्राणी मानवी वस्तीत येणार नाहीत.

जंगलतोड थांबविणे ही काळाची गरज आहे. तसंच जंगलतोड थांबवून जंगल निर्माण करणंही काळाची गरज आहे. कारण बिबट्या मानवी वस्तीत शिरत आहे व ही एक चिंतेची बाब आहे. तो माणसांना क्षती पोहचवीत आहे. असे जर सुरु राहिले तर तो दिवस दूर नाही की ज्या दिवशी त्याचं मानवी वस्तीतच अधिवास निर्माण होईल व संपुर्ण मानव नष्ट होईल.

ते जंगल. पुर्वीचं ते जंगल अती समृद्ध असून त्या जंगलात सर्व प्राणी गुण्यागोविंदानं राहात असत. त्यातच त्या जंगलाकडे माणसाची कुनजर पडली व माणसानं लाकूड प्राप्त व्हावं. यासाठी जंगलातील झाडं तोडणं सुरु केली. मग हळूहळू जंगलं कमी झाली व त्या जंगलातील प्राणी हे माणसाच्या वस्तीत शिरायला लागले.

वन्यप्राण्यांनाही माणसांची भीती वाटत होती. विचार होता की माणूस नावाचा प्राणी महाभयंकर आहे. तो आपली शिकार करतो. तो आपल्याला गुलाम करतो व गुलाम करुन नेवून कारागृहात अर्थात पिंजऱ्यात बंद करतो. म्हणूनच



ते जंगलात राहणे पसंत करायचे. जंगलाच्या बाहेर पडायचे नाहीत. मात्र

**अंकुश शिंगाडे**

माणूस जेव्हा सर्वप्रथम जंगलात शिरला. ज्याची भीती वन्यप्राण्यांना वाटत होती की ही माणसं महाभयंकर आहेत. आपल्याला पकडून नेतात. आपल्याला गुलाम करतात. आपली शिकार करतात. ती भीती नष्ट झाली. जेव्हा माणूस जंगलात शिरला. तो प्राण्यांच्या अगदी जवळ गेला. त्यातच त्यानं लाकूड मिळविण्यासाठी अख्खं जंगलच नष्ट केलं. ज्यातून जंगल नष्ट झालं व त्याच जंगलात असणारे वन्य प्राणी हे जिकडे रस्ता मिळेल, तिकडे जायला लागले. ज्यात तृणभक्षक प्राणी होते आणि हिंस्र प्राणीही होते. ज्यात बिबट्याही होताच.

बिबट्या मानवी वस्तीत शिरला. आज तो माणसालाच क्षती पोहोचवीत आहे. तो लोकांची गुरंढोरं नेवू लागला आहे. त्यातच लोकांची लहानलहान मुलंही खावू लागला आहे. त्यातच बिबट्या मानवी वस्तीत धुमाकूळ घालत आहे. त्याचा बंदोबस्त करावा. अशी आरडाओरड होत आहे. बिबट्या मानवी वस्तीत शिरला. तो मानवी वस्तीत धुमाकूळ घालत आहे. तो माणसांचे गुरेढोरे खात आहे. मुलंही खात आहे. अशी आरडाओरड व त्यातून त्याचा बंदोबस्त. हे सगळं बरोबर आहे. परंतु खरं सांगायचं झाल्यास तो मानवी वस्तीत का शिरलाय? का शिरतोय? याचा विचार कोणीच करायला तयार नाही. मात्र बिबट्याच्या नावानं आरडाओरड होते. खरंच याला जबाबदार आहोत आपण. तो मानवी वस्तीत शिरलाय. त्याचं कारण आपण त्यांच्या वस्तीत शिरलो होतो. बिबट्याचा अधिवासाबाबत विचार केल्यास तो पुर्वीपासूनच जंगलातच होता. तो मानवी वस्तीत यायचा नाही. कारण त्याचं पोट हे जंगलातच भरायचं. याचंही एक कारण म्हणजे त्यावेळेस जंगलात विविध प्रकारचे प्राणी असायचे. ते प्राणी तो मारायचा व त्यावर तो स्वतःची गुजराण करायचा. मात्र माणसानं आपल्या स्वार्थासाठी म्हणजेच आपल्या अधिवासासाठी जंगलं तोडली. त्यानंतर तिथं अधिवास करणारे व तृणांवर जगणारे प्राणी जंगलच नसल्यानं व त्यांना लपायला जागा नसल्यानं ते गावात, शहरात, शेतात जिकडे जागा मिळेल तिकडे गेले. त्यामुळंच अशा बिबट्यांना जंगलात तृणभक्षक प्राणी खायला न सापडल्यानं त्यांनी आपला अधिवास सोडला व ते मानवी वस्तीकडे फिरले. आता ते आपल्याला दिसतात. त्याला जबाबदार कोण? आपणच ना. आपण जंगलं तोडायला नको होती आणि तोडली तर त्यांच्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून तसंच जंगल त्यांच्यासाठी आजुबाजूला निर्माण करायला हवं होतं. परंतु आपण तसं केलं नाही.

बिबट गाववस्तीत आला. त्याचं कारण जंगलांचं सिमीतीकरण. जंगल तोडतांना आपण कधीच विचार केला नाही की आपण जंगल तर तोडतोय. परंतु या जंगलातील प्राणी कुठे जातील? बिबटे दिसलेच नसते, जर ते जंगल नष्ट करण्यापुर्वी आपण त्या जंगलातील सर्वच प्राण्यांचा विचार करुन त्या प्राण्यांना दुसऱ्या जंगलात हस्तांतरीत केलं असतं तर..... कदाचीत ते तिथं रमलेही असते व मानवी वस्तीत आले नसते. परंतु आपलं कुठंतरी चुकलंय. आपण त्यांचा अधिवास तर नष्ट केलाय. परंतु त्यांना आपण दुसरा पर्यायी स्वरुपाचा अधिवास निर्माण करुन दिलेला नाही. मग ये मानवी वस्तीत येणार नाहीत तर काय? आता आपण त्यांच्या वस्तीत येण्याबाबत कुरकूर का करावी?

आज वनमंत्री महोदयांना बिबट्याच्या मानव वस्तीत दिसण्याबाबत चिंता आहे. ते त्या गोष्टीला गंभीर समस्या मानतात. त्यावर मात करण्यासाठी ते कितीतर करोड रुपयाच्या बकऱ्या जंगलात सोडून म्हणतात. ज्यातून बिबट्यांचं पोट भरेल व तो मानवी वस्तीत भटकणार नाही. परंतु हे जरी खरं असलं तरी आजचा मानव चालाख आहे. तो जसा चोरुन लपून जंगलातील लाकूड मिळविण्यासाठी जंगलातील लाकूड तोडू शकतो. तसा तो जंगलात सोडलेल्या बकऱ्या चोरुन आपल्या घरी नाही आणणार हे कशावरुन ठरवावे? अर्थातच ही गोष्ट पाहिजे तेवढी सोपी नाही. म्हणतात की कितीतरी बकऱ्या सोडल्या की प्रश्न मिटला. परंतु खरंच या गोष्टीनं प्रश्न मिटेल काय? ही शंकाच आहे.

विशेष बाब ही की आपलं जे त्या काळात चुकलं. ती चूकच झाली आपल्या हातून. परंतु ती चूक आपण सुधारु शकतो. जर आपण त्यांच्यासाठी कुत्रीम स्वरुपाची जंगलं निर्माण केली तर...... आपल्याला जर ते प्राणी मानवी वस्तीत येवू नये, असे जर वाटत असेल तर एकच काम करावं लागेल. ते काम म्हणजे झाडं लावणं. झाडं रस्त्यानं लावायची नाहीत तर कितीतरी हेक्टरचा पट्टा हा जंगल भाग म्हणून निर्माण करावा लागेल. ज्या भागात शेती होत नाही. ज्या भागात तृणभक्षक वा सर्वच प्रकारचे प्राणी अगदी गुण्यागोविंदानं राहू शकतील. तेव्हाच कोणतेच हिंस्र प्राणी मानवी वस्तीत येणार नाहीत. हे तेवढंच खरं. केवळ बकऱ्या जंगलात सोडून प्रश्न सोडवता येणार नाही. **

# छत्रपती शिवरायांच्या पराक्रमाचा दिल्लीत होणार जागर !

असे म्हणतात, 'जी पिढी आपला इतिहास विसरते ती रसातळाला जाते'. कोणत्याही देशाचा इतिहास केवळ शालेय पाठयपुस्तकांची पाने भरण्यासाठी नसतो तर त्या इतिहासामागे कित्येक पिढ्यांचा जाज्वल्य पराक्रम आणि राष्ट्रप्रतीचा अपरिमित त्याग लपलेला असतो. आपल्या राष्ट्राच्या रक्षणासाठी प्राणार्पण करण्याची सिद्धता असणारे आणि त्यासाठी घरादाराचा त्याग करणारेच इतिहास घडवतात. या इतिहासाचे पारायण करून पुढच्या पिढीने आपल्या राष्ट्राच्या आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी पुढे यायचे असते. आपले परमभाग्य म्हणून आपण परमपवित्र भारतभूमीत जन्माला आलो आहोत ज्या भूमीने मागील कित्येक पिढ्या तिच्या रक्षणासाठी हसत हसत बलीवेदीवर चढताना पाहिल्या आहेत. ही भूमी महापराक्रमी योद्ध्यांची आहे ज्यांनी बलाढ्य शत्रुलाही नामोहरम करून याच भूमीत गाडले आहे. ही भूमी क्रांतिवीरांची आहे ज्यांनी भारतमातेला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवले. ही भूमी त्या रणरागिणींची आहे ज्यांनी 'अबला' ही ओळख पुसून प्रसंगी लाखोंच्या सैन्याचे नेतृत्व केले आहे. रणचंडीच्या रूपाने शत्रूवर त्या तुटून पडल्या आहेत. अशा या जाज्वल्य इतिहासाचा आजच्या पिढीला विसर पडत चालला आहे. मोबाईल आणि इंटरनेटच्या जाळात अडकलेला आजचा तरुण सदासर्वकाळ मान वाकवून मोबाईल गेम्स खेळत, रिल्स आणि वेब सिरीज पाहत तासनतास घालवताना दिसत आहे. देशासाठी प्राणार्पण करणारे क्रांतिकारक आणि देशभक्त

**जगन घाणेकर**

नव्हे तर तोकडे कपडे घालून वावरणाऱ्या नट्या आणि ऑनस्क्रीन मद्य रिचवणारे, गुंडगिरी करणारे नट आजच्या पिढीचे रोल मॉडेल्स बनू लागले आहेत. शालेय शिक्षणात नैतिक मूल्यांचे आणि धार्मिक शिक्षण दिले जात नसल्याने पाश्चिमात्य देशांत साजरे केले जाणारे डेज हेच आजच्या पिढीचे सण उत्सव बनू लागले आहेत. इंग्रज भारतातून जाऊन ७८ वर्षे उलटली मात्र त्यांनी घालून दिलेली शिक्षण पद्धती आपण आजही त्यागलेली नसल्याने आपल्यावरही पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव पडलेला आहे. आनंदाचे क्षण आपण गोडधोड करून नव्हे तर केक कापून साजरे करू लागलो आहोत, आपल्या दुकानांचे आणि आस्थापनांचे उद्घाटन श्रीफळ वाढवून नव्हे, तर रिबीन कापून करू लागलो आहोत. सकाळी उठल्यावर 'कराग्रे वसते लक्ष्मी....' आज किती ठिकाणी म्हटली जाते? सायंकाळी दिवे लागणीला शुभंकरोती करोती, रामरक्षा किती घरांत म्हटली जाते? अनेक घरांत सायंकाळी दिवे लागणीला चालू केला जाणारा टीव्ही रात्री झोपतानाच बंद केला जातो. या दरम्यान विविध वाहिन्यांवर चालणारे डेली सोप काय शिकवतात, तर नात्यांमध्ये सूड कसा उगवावा, एकमेकांची संपत्ती कशी बळकवावी, अनैतिक संबंध कसे जोपासावेत आणि ते कसे लपवावेत, लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहणे, विवाहबाह्य संबंध, लग्नापूर्वीचे शरीरसंबंध या सर्व गोष्टी यांमध्ये अति सामान्य करून दाखवल्य जातात. हल्लीच्या वेब सिरीजमध्ये खुलेपणाने दाखवली जाणारी शयनगृहातील दृश्ये, एकमेकांशी बोलताना केला जाणारा शिव्यांचा मुक्त वापर, अतिरंजित करून दाखवली जाणारी हिंसक दृश्ये या सर्वांचा परिणाम कुटुंबातील लहान आणि किशोरवयीन मुलामुलींवर होत असतो. शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यासम सनातन राष्ट्र स्थापण्यासाठी जनतेला दिशा देणारा शंखनाद महोत्सव भविष्यात दिल्लीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल यात दुमत नाही !

# मेस्सीच्या कोलकाता भेटीला गालबोट

## ।। संतप्त प्रेक्षकांनी मैदानावर फेकल्या बाटल्या ।। दहा मिनिटात स्टेडियम सोडले

**। कोलकाता । वृत्तसंस्था ।**

**महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या बहुचर्चित कोलकाता भेटीला गोलबोट लागले. मेस्सी स्टेडियममध्ये १० मिनिटांपेक्षा कमी वेळ उपस्थित होता. यामुळे त्याची एक झलक पाहण्यासाठी तासंतास वाट पाहणाऱ्या अनेक चाहत्यांची निराशा झाली. यावेळी त्यांनी अधिकारी आणि राजकारण्यांना लक्ष्य करून घोषणाबाजी करत मैदानावर बाटल्या फेकल्या. अचानक घडलेल्या प्रकाराने मैदानावर काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला. या कार्यक्रमाचे नियोजन नियोजन अत्यंत खराब होते, असा आरोप या चाहत्यांनी केला आहे.**



मेस्सीचे अभूतपूर्व उत्साहात स्वागतस्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी कोलकात्याच्या आयकॉनिक सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दाखल झाला. अर्जेंटिनाचा दिग्गज खेळाडूची एक झलक पाहण्यासाठी तासन्तास वाट पाहणाऱ्या चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह होता.

फुटबॉलप्रेमींनी अभूतपूर्व उत्साहात मेस्सीचे स्वागत केले. लिओनेल मेस्सीने खचाखच भरलेल्या सॉल्ट लेक स्टेडियममध्ये प्रवेश करता चाहत्यांनी एकच जल्लोष केला. त्याच्या जयघोषाने स्टेडियम दणाणून गेले. उभे राहून चाहत्यांनी झेंडे फडकावले आणि एकसुरात त्याचे नाव घेत घोषणा दिल्या. स्टेडियमवरील वातावरणा एक चैतन्य निर्माण झाले.

शाहरुख खान आणि अबरामने घेतली लिओनेल मेस्सीची भेटफुटबॉल आयकॉन लिओनेल मेस्सीने गोट इंडिया टूर २०२५ च्या भागांतर्गत कोलकात्यातील लेक टाऊन येथील श्री भूमी स्पोर्टिंग क्लबमध्ये आपल्या ७० फुटी पुतळ्याचे आभासी अनावरण केले.

बॉलिवूड सुपरस्टार शाहरुख खान आणि उरुग्वेचा फुटबॉलपटू लुईस सुआरेझ यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. त्यामुळे परिसरामध्ये चाहत्यांची प्रचंड गर्दी जमली होती. फुटबॉल आणि बॉलवूडमधील दोन आयकॉन एकत्र आल्याने चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. शाहरुख आपला धाकटा मुलगा अबराम खान याच्यासोबत कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचला आणि दोघांनीही मेस्सीसोबत छायाचित्रे काढण्यासाठी पोझ दिली.

अर्जेंटिनाचा आयकॉन पाहण्याच्या आशेने तासन्तास वाट पाहणाऱ्या अनेक चाहत्यांना त्याची व्यवस्थित झलक न मिळाल्याने निराशा झाले. काही चाहत्यांनी पोस्टरचे फलक फाडले, बाटल्या फेकल्या. यामुळे स्टेडियमवर काही काळ प्रचंड तणाव निर्माण झाला.

सुरक्षा व्यवस्था वाढ करण्यात आली. स्टेडियमवरील परिस्थिती सोशल मीडियावर व्हायरल झाली, ज्यात झालेल्या गोंधळाचे चित्र स्पष्ट झाले. भारतीय फुटबॉल चाहत्यांसाठी ऐतिहासिक आणि आनंदी असा हा क्षण गालबोट लागून संपुष्टात आला. कार्यक्रमासाठी आलेल्या स्टार फुटबॉलपटू लिओनेल मेस्सीच्या चाहत्यांनी आयोजकांवर आपला तीव्र रोष व्यक्त केला. एका चाहत्याने सांगितले की, या कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत वाईट होते. मेस्सी फक्त १० मिनिटांसाठी आला. सर्व नेते आणि मंत्री त्याच्याभोवती गर्दी करून उभे होते. घटनेबद्दल सोशल मीडियावर व्यक्त होतांना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी म्हणाल्या, सॉल्ट लेक स्टेडियमवर जे गैरव्यवस्थापन पाहायला मिळाले, त्याने मी अत्यंत व्यथित आणि धक्कादायक आहे. मी स्वतः हजारो क्रीडाप्रेमी आणि चाहत्यांसह या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी स्टेडियमकडे जात होते. या दुर्दैवी घटनेबद्दल लिओनेल मेस्सी तसेच सर्व क्रीडाप्रेमी आणि चाहत्यांची मी मनापासून माफी मागते.

### स्टेडियममध्ये गोंधळ मोठा गोंधळ

सॉल्ट लेक स्टेडियममध्ये मेस्सीचे चाहते प्रचंड उत्साह दाखवताना दिसले, परंतु त्यांनी गोंधळही निर्माण केला. मेस्सीची एक झलक पाहण्यासाठी चाहते स्टेडियमच्या ब्रॅकेटिंगवर चढण्याचा प्रयत्न करताना दिसले. यामुळं काही चाहते संतप्त झाले आणि त्यांनी खुर्च्या आणि पाण्याच्या बाटल्या फेकण्यास सुरुवात केली. साल्ट लेक स्टेडियममधील खराब व्यवस्थेमुळे चाहत्यांचा राग भडकला. लिओनेल मेस्सी मैदान लवकर सोडल्याने काही चाहते नाराज झाले. स्टेडियममधील परिस्थिती लवकर बिकट झाली, ज्यामुळे कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली. महान खेळाडूला पाहण्यासाठी तासंतास वाट पाहणाऱ्या अनेक चाहत्यांना एक झलकही न मिळाल्याने निराशा झाली, कारण त्यांनी २०००० ते २५००० रुपये खर्च करुन उपस्थित राहावे लागले होते, ज्यामुळे आणखी गोंधळ निर्माण झाला.

---

# निवडक

## हार्दिकची विक्रमाकडे वाटचाल

**चंदीगड :** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याकडे क्रिकेट जगताचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या सामन्यात भारताचा स्टार अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्या एक अनोखा इतिहास रचण्यासाठीही सज्ज झाला आहे. पंड्या या सामन्यात जो विक्रम करणार आहे, तो टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये यापूर्वी मोजक्याच खेळाडूंनी केला आहे. मात्र, हार्दिक जेव्हा या यादीत सामील होईल, तेव्हा तो इतरांपेक्षा सर्वात वेगळा ठरणार आहे. आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० मध्ये फक्त १ विकेट घेताच हार्दिक पंड्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १०० बळींचा टप्पा पूर्ण करेल. १०० बळी घेताच, तो टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये १०० षटकार आणि १०० बळी मिळवणारा जगातील चौथा खेळाडू ठरेल. त्याच्या अप्रतिम फलंदाजी आणि गोलंदाजीच्या जोरावर हार्दिक हा सामना आपल्या नावावर करून भारतीय क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव सुवर्णाक्षरांनी कोरतो का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



## भारतीय महिलांचा टी-२० संघ जाहीर

**नवी दिल्ली :** श्रीलंकेविरुद्ध रंगणाऱ्या आगामी पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर करण्यात आला. गुनालन कमलिनी आणि वैष्णवी शर्मा यांचा भारताच्या टी-२० महिला संघात प्रथमच समावेश करण्यात आला आहे. श्रीलंका महिला संघ डिसेंबरच्या अखेरीस भारत दौऱ्यावर येणार आहे. यामध्ये ५ टी-२० सामन्यांचा समावेश आहे. २१ ते ३० डिसेंबर या कालावधीत हे पाच सामने होतील. २१ व २३ तारखेला विशाखापट्टणम येथे, तर २६, २८ व ३० डिसेंबरच्या लढती तिरुवनंतपुरम येथे होतील. त्यानंतर ९ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या काळात महिला प्रीमियर लीग म्हणजेच डब्ल्यूपीएलचे चौथे पर्व रंगणार आहे. मग भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. १५ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत हा दौरा असेल. त्यामध्ये ३ टी-२०, ३ एकदिवसीय व १ कसोटी सामन्याचा समावेश आहे. दरम्यान, विश्वचषकाचा भाग असलेल्या उमा छेत्री, राधा यादव यांना टी-२० संघात स्थान लाभलेले नाही. तसेच यास्तिका भाटियासुद्धा अद्याप दुखापतीतून सावरलेली नाही. १७ वर्षीय कमलिनी आयपीएलमध्ये मुंबईकडून खेळते, तर वैष्णवीला मात्र लिलावात कोणीही खरेदी केले नाही. पुढील वर्षी महिलांची टी-२० विश्वचषक स्पर्धा इंग्लंडमध्ये होणार आहे. त्यामुळे आता महिला संघाचे लक्ष टी-२० सामन्यांवर अधिक असेल.



## अंशुमनची पॅरासायकलिंगमध्ये चमक

**सातारा :** बँकॉक (थायलंड) येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय रोड एड ट्रॅक पॅरासायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत येथील ब्लॉसम स्कूलमधील अंशुमन योगिता अमोल धुमाळ याने सी-१ श्रेणीत देशाचे प्रतिनिधित्व केले. या स्पर्धेत त्याने उत्कृष्ट कामगिरी केली. या कामगिरीच्या जोरावर त्याची तैवान येथे होणाऱ्या जागतिक रोडएड ट्रॅक पॅरासायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अंशुमन याने मिळविलेल्या यशामुळे साताऱ्याचे नाव रोडएड ट्रॅक पॅरासायकलिंगमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर कोरले गेले आहे. या स्पर्धेत ११ देशांतील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेत अंशुमनने सी-१ श्रेणीत उत्कृष्ट गुण मिळवले. त्याला हैदराबाद येथे आदित्य मेहता फाउंडेशनच्या वतीने प्रशिक्षण दिले जात आहे. याबरोबरच मोहित भट्टड आणि पालकांचे त्यास वेळोवेळी मार्गदर्शन लाभत असते. अंशुमन याचे मूळगाव सातारा तालुक्यातील मर्ढे हे आहे. वडील अमोल हे टॅक्स कन्सल्टंट आहेत, तर आई योगिता या कलाशिक्षिका आहेत. या यशाबद्दल त्याचे विविध क्षेत्रातील मान्यवरांसह क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले.



## भारताचा उरुग्वे सामना बरोबरीत



**नवी दिल्ली :** एफआयएच हॉकी ज्युनियर महिला विश्व चषकातील ९/१२ पात्रता फेरीत निर्धार, संयम आणि कौशल्याच्या बळावर भारताने उरुग्वेला शूटआऊटमध्ये ३-१ ने नमवत मैदानात आपली ताकद सिद्ध केली. सामन्याच्या पहिल्याच मिनिटापासून भारताने चेंडूवर हुकूमत गाजवली. सततचा दबाव, सर्कलमध्ये घुसखोरी आणि वेधक आक्रमण उरुग्वेचा बचाव पुरता ढासळू लागला. १९व्या मिनिटाला मनीषाने विजेसारखा शॉट मारत भारताला १-० अशी आघाडी दिली आणि पहिल्या हाफमध्ये भारताने आपला हल्ला आणखी प्रखर केला. तिसऱ्या क्वॉर्टरमध्ये उरुग्वेचे दोन पेनल्टी कॉर्नर निष्फळ ठरले, तर अखेरच्या क्वॉर्टरमध्ये गोलरक्षक निधी भिंतीसारखी उभी राहिली. ४९ व्या मिनिटाला तिने केलेला अफलातून बचाव निर्णायक ठरला. मात्र सामना संपायला फक्त दोन सेकंद असताना मिळालेल्या पेनल्टी स्ट्रोकवर जस्टिना अरगुईनने गोल करत सामना बरोबरीत सोडवला.

---

## विराट खेळणार विजय हजारे ट्रॉफी

**। बंगळूर । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू विराट कोहली २४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विजय हजारे राष्ट्रीय एकदिवसीय स्पर्धेसाठी दिल्लीच्या संभाव्य संघात करण्यात आला आहे. कोहलीने दिल्ली क्रिकेट असोसिएशनला (डीसीए) आपण खेळणार असल्याचे कळविले आहे. तो तब्बल १५ वर्षांनंतर विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळताना दिसणार आहे. त्याने या स्पर्धेत शेवटचा सहभाग २०१० मध्ये सर्व्हिसेसविरुद्धच्या सामन्यात घेतला होता. कोहलीने या हंगामात यापूर्वी दिल्लीकडून रणजी ट्रॉफीचे सामनेही खेळले आहेत. कोहली टेस्ट आणि टी-२० मधून निवृत्त झाले आहे. आता केवळ एकदिवसीय क्रिकेटवर लक्ष केंद्रित करत आहेत. बीसीसीआयने सर्व तंदुरुस्त खेळाडूंना, जे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत व्यस्त नाहीत, त्यांना देशांतर्गत स्पर्धांमध्ये खेळण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्देशामुळेच कोहलीचा समावेश निश्चित झाला आहे.



कोहली २०२७ च्या आयसीसी टी-२० विश्वचषकावर लक्ष ठेवून आहे, ज्यासाठी त्याला ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये आपली लय कायम ठेवायची आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या नुकत्याच संपलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत कोहलीने दोन शतके आणि एक नाबाद अर्धशतकासह ३०२ धावा केल्या, तसेच 'प्लेअर ऑफ द सीरिज'चा पुरस्कार पटकावला आहे.

## नाखरे शाळा 'खो-खो'त विजयी

**। पावस । प्रतिनिधी ।**

पावस-गोळप उर्दू शाळांच्या केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा नाखरे नं. १ ने चमकदार कामगिरी केली. मोठ्या गटात मुलींचा खो-खो संघ विजयी तर कबड्डी संघ उपविजयी ठरला आहे. रत्नागिरी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून वार्षिक क्रीडा महोत्सव आयोजित केला जातो. हिवाळी क्रीडा स्पर्धा उत्साहात झाल्या. शिक्षण विभागाकडून आयोजित स्पर्धांच्या पहिल्या टप्प्यात पावस-गोळप उर्दूच्या केंद्रस्तरीय स्पर्धा रनपार येथे झाल्या. या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा नाखरे नं. १ ने चमकदार कामगिरी केली. यामध्ये मोठ्या गटात मुली खो-खो संघ विजयी तर कबड्डी संघ उपविजयी ठरला.

## किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, तसेच मुंबईखो-खोसंघटना आणि श्रीसमर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा २५ ते २८ डिसेंबर २०२५ दरम्यान मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा येथे उत्साहाच्या वातावरणात पार पडणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव यांनी दिली.

श्री समर्थ व्यायाम मंदिरच्या शतकोत्तर वाटचालीत हा क्रीडोत्सव आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. नुकत्याच पूर्ण झालेल्या १०० वर्षांच्या वारशाला सन्मान देत युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, स्पर्धात्मकता आणि भारतीय खेळांची परंपरा जिवंत ठेवण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे.



**■ २५ ते २८ डिसेंबर दरम्यान होणार सामने**

या राज्य अजिंक्यपद स्पर्धेतून हरियाना येथे होणाऱ्या ३५व्या राष्ट्रीय किशोर-किशोरी अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडला जाणार असल्याने राज्यभरातील जिल्ह्यांतून तरुण खेळाडूंच्या तयारीला चांगलीच धावपळ सुरू झाली आहे.

१४ वर्षाखालील (५फेब्रुवारी २०१२ किंवा त्यानंतर जन्मलेले) खेळाडूंची पात्रता निश्चित करण्यात आली असून, सहभागाची नोंदणी २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत ई-मेलद्वारे करावी लागणार आहे. खेळाडूंची २४ डिसेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उपस्थिती अनिवार्य असेल. फक्त असोसिएशनशी संलग्न जिल्ह्याचे खेळाडू या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. मुंबईत होणारी ही स्पर्धा राज्यातील तरुण खो-खोपटूंसाठी सुवर्णसंधी ठरणार असून, राष्ट्रीय पातळीवर चमकण्यासाठी ही स्पर्धा निर्णायक पाऊल ठरेल, असे डॉ. जाधव म्हणाले.

## नीताला जलतरण स्पर्धेत सुवर्णपदक

**कल्याण :** भूतान येथील टीम्पू येथील आंतरराष्ट्रीय स्पर्धेत संयुक्त भारत खेळ फेडरेशनतर्फे भारताचे प्रतिनिधित्व नीता बोरसे यांनी केले. नीताने जलतरण स्पर्धेत विविध अंतरात तीन सुवर्ण व एक रौप्यपदक मिळवले. नीता एक गृहिणी असून विविध खेळांची आवड त्यांना आहे. नीता यांनी आपले घर सांभाळत जलतरण सराव केला असून विविध देशांमध्ये त्या खेळल्या आणि पदकेही मिळवली. बिर्ला कॉलेजचे फिजिकल डायरेक्टर यज्ञेश्वर बागराव यांचे बोरसे यांना मार्गदर्शन लाभले. बिर्ला रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य दुबे यांनी नीता बोरसेंचे अभिनंदन करून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## राष्ट्रीय मिल मजदूर संघाची कबड्डी स्पर्धा २०२५

# इंशोअर कोट, शिवशक्ती महिला आंबेकर चषकाचे मानकरी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

इंशोअर कोट (पुणेरी फलटण), शिवशक्ती महिला यांनी अनुक्रमे पुरुष व्यावसायिक व महिला गटात आंबेकर चषक पटकविला. शिवशक्तीला मात्र या विजयासाठी ५-५ चढायाच्या डावापर्यंत झुंजावे लागले. इन्शुअर कोटचा अभिषेक गुंगे व्यावसायिक पुरुषांत, तर शिवशक्तीची शुभदा खोत महिलात स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरले. दोन्ही खेळाडूना प्रत्येकी रोख रु. दोन हजार व चषक देऊन सन्मानीत करण्यात आले. ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे राष्ट्रीय मिल मजदूर संघ, मुंबई यांच्या विद्यमाने ग. दि. आंबेकर सप्ताहनिमित्त आ. सचिन अहिर यांच्या मार्गदर्शनाखाली कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या अंतिम दिनी झालेल्या व्यावसायिक पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात इंशोअर कोट (पुणेरी फलटण) संघाने न्यू इंडिया इन्शुरन्सचा प्रतिकार ४१-१२ असा सहज संपुष्टात आणत ग. दि. आंबेकर चषक व रोख रु. पंधरा हजार आपल्या खात्यात जमा केले. उपविजेत्या संघाला रोख रु. दहा हजार व चषकावर संतुष्ट व्हावे लागले. प्रो-कबड्डी खेळाडूचा भरणा असलेल्या इंशोअर कोट संघाने सुरुवातीपासुन आक्रमक खेळ करीत पूर्वार्धातच २ लोण देत २५-०५ अशी भक्कम आघाडी घेतली. या २० गुणांच्या आघाडीने इंशोअर कोटने आपला विजेतेपदाचा दावा पक्का केला.





महिलांच्या अंतिम सामन्यात शिवशक्ती महिला संघानी आपला पारंपरीक प्रतिस्पर्धी डॉ. शिरोडकर संघाचा कडवा प्रतिकार ५-५ चढायात ४३-३८ (९-५) असा मोडून काढत रोख रु. सात हजार व आंबेकर चषक आपल्याकडे खेचून आणला. उपविजेत्या संघाला रोख रु. पाच हजार व चषकावर समाधान मानावे लागले.

याअगोदरझालेल्याव्यावसायिक पुरुषांच्या उपांत्या सामन्यात इंशोअर कोट ने मुंबई पोस्टलला ४५-१३ असे, तर न्यू इंडिया इन्शुरनसने युनियन बँकेला ३१-२७ असे पराभूत करीत अंतिम फेरी गाठली होती. महिलांत शिवशक्तीने अमर हिंदला ४५-१३ असे, तर डॉ. शिरोडकरने मुंबई पोलीस जिमखाना संघाला ४७-२८ असे चीत करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. न्यू इंडियाचा रजत सिंग व्यावसायिक पुरुषांत, तर डॉ. शिरोडकरची कशिश पाटील महिलांत स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचे खेळाडू ठरले. इन्शुअर कोटचा अथर्व धुमाळ व्यावसायिक पुरुषांत, तर शिरोडकरची श्रावणी घाडीगावकर महिलांत स्पर्धेतील उत्कृष्ट पकडीचे खेळाडू ठरले. चारही खेळाडूंना प्रत्येकी रु. एक हजार व चषक देऊन गौरविण्यात आले.

---

## खेळाडूंच्या स्वप्नांवर उदासीनतेची धूळ | सुविधा अभावी खेळाडू हतबल

# माणगाव क्रीडा संकुल भग्नावस्थेत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरातील क्रीडा विकासाचा कणा मानले जाणारे माणगाव क्रीडा संकुल आज अक्षरशः भग्नावस्थेत गेले असून, येथील खेळाडूंमध्ये तीव्र असंतोषाची भावना पसरली आहे. कधीकाळी खेळाडूंच्या सरावाने गजबजलेले हे संकुल आज दुर्लक्ष, उदासीनता आणि निष्क्रियतेचे प्रतीक बनले आहे. संकुलातील खेळांचे व व्यायामाचे साहित्य मोडकळीस आले असून, काही साहित्य अडगळीत तर काही थेट भंगारात पडले आहे. परिणामी,नव्या साहित्याच्या प्रतीक्षेत असलेले खेळाडू आजही रिकाम्या हाताने सराव करत आहेत.



क्रीडा संकुलाच्या इमारत असुरक्षित अवस्थेत दिसून येत आहे. पावसाळ्यात छतामधून पाणी गळत असल्याने आतील भागाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. संरक्षण भिंत नसल्यामुळे मौल्यवान क्रीडा साहित्य चोरीला गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. शासनाकडून कोणतीही नियमित देखभाल, दुरुस्ती किंवा सुरक्षा व्यवस्था नसल्याने हे संकुल अक्षरशः वाऱ्यावर सोडल्याचे चित्र आहे. या क्रीडा संकुलाचे भूमिपूजन २००४ साली झाले होते, तर उद्घाटन २००९ मध्ये तत्कालीन मंत्री सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले होते.

### शासनाच्या उदासीनतेवर संताप

एकंदरीत शासन खेळ आणि खेळाडूंकडे गंभीरपणे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. यामुळे खेळाडूंचे कधीही भरून न येणारे नुकसान होत असून, क्रीडा विकासाची प्रक्रिया मागे पडत आहे. माणगाव क्रीडा संकुलाची तातडीने दुरुस्ती, नवीन क्रीडा साहित्याची उपलब्धता, सुरक्षा भिंत, प्रशिक्षकांची नेमणूक व नियमित देखभाल यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे.

क्रीडा क्षेत्राच्या विकासाची मोठी स्वप्ने दाखवून उभारण्यात आलेले हे संकुल मात्र उद्घाटनानंतर हळूहळू दुर्लक्षित होत गेले. विशेष म्हणजे, या संकुलासाठी धवलारकर या दानशूर व्यक्तीने शासनाला जमीन दान दिली होती. मात्र आज त्याच जागेवर उभे असलेले संकुल खेळाडूंना उपयोगी पडत नसल्याने दानशूर दात्याच्या योगदानालाही अन्याय होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

मध्यंतरी कोकण विभागीय क्रीडा संकुल माणगाव येथे मंजूर केल्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र ही घोषणा आजतागायत हवेतच विरून गेली असून, प्रत्यक्षात कोणतीही ठोस हालचाल दिसून आलेली नाही. त्यामुळे खेळाडूंच्या अपेक्षांचा भंग झाला असून, शासन केवळ घोषणा करून जबाबदारी झटकत असल्याचा आरोप होत आहे.

### खेळाडूंची घुसमट

माणगाव व परिसरातील अनेक खेळाडू आजही राज्य व राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. मात्र हे यश त्यांनी क्रीडा संकुल, आधुनिक सुविधा किंवा प्रशिक्षकांशिवाय, केवळ स्वतःच्या जिद्दीतून मिळवले आहे. पुरेशा मैदानांचा अभाव, सरावासाठी साधनसामग्री नसणे आणि स्पर्धांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अनेक खेळाडू मोठ्या स्पर्धांपासून वंचित राहत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)